रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ९७ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, शनिवार, दि.१३ सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

**अलिबाग-नागाव प्रॉपर्टी विकणे आहे**

अलिबाग नागाव हायवे टच, लक्झरीयस् प्रॉपर्टीज, ३१ गुंठे रेडी टू बिल्ड प्लॉट Suitable for फार्महाऊस/रिसॉर्ट/हॉटेल/ स्विमिंग पूल, नागाव बीच १.२ कि.मी., प्राईम लोकेशन, इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, ५०+ नारळ, सुपारी आणि हापूस आंब्याची झाडे, उत्तम कनेक्टिव्हिटी, परमंट कंपाउंड, क्लिअर टायटल, एंजन्ट सुद्धा चालेल.

मालक : ९७६९१०८१७०




## राज्यात 34 जि.प. अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर

### सदस्य संख्या 59

# रायगडसाठी ‘सर्वसाधारण’



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**राज्यातील ३४ जिल्हा परिषदांसाठी अध्यक्षपदाचे आरक्षण शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटासाठी जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या सदस्यपदांची मुदत संपल्यानंतर गेल्या सव्वा तीन वर्षांपासून जिल्ह्याचा कारभार प्रशासनामार्फत सुरु आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर ही प्रतीक्षा लवकरच संपण्याच्या वाटेवर असल्याचे चित्र आहे. अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने आता लवकरच जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**

> **प्रदीर्घ कालावधीनंतर जिल्हा परिषद निवडणूक होणार आहे. अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाल्यामुळे महायुतीमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा शेतकरी कामगार पक्षाला चांगल्या पद्धतीने होईल, असा विश्वास आहे.**
>
> **– सुरेश खैरे,** शेकाप जिल्हा चिटणीस तथा जि.प. माजी सदस्य

पनवेल महानगर पालिका स्थापन होण्यापूर्वी जिल्हा परिषदेचे ६१ सदस्य होते. परंतु, महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर दोन सदस्य कमी झाले. त्यामुळे ५९ जागांसाठी २०१९ साली निवडणूक झाली. निवडणुकीच्या निकालानंतर रायगड जिल्हा परिषदेमध्ये शेतकरी कामगार पक्ष २३, शिवसेना १८, राष्ट्रवादी ११, काँग्रेस व भाजप प्रत्येकी तीन असे बलाबल होते.

### 2019 सालचे राजकीय बलाबल

**५९ जागांसाठी २०१९ साली निवडणूक झाली. निवडणुकीच्या निकालानंतर रायगड जिल्हा परिषदेमध्ये शेतकरी कामगार पक्ष २३, शिवसेना १८, राष्ट्रवादी ११, काँग्रेस व भाजप प्रत्येकी तीन असे बलाबल होते.**

रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्यपदांचा कार्यकाल २२ मार्च २०२२ ला संपला. तेव्हापासून रायगड जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनाद्वारे जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा कारभार चालविला जात आहे. सुरुवातीला किरण पाटील प्रशासन अधिकारी म्हणून काम पाहात होते. त्यांची बदली झाल्यावर भरत बास्टेवाड यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या प्रशासन अधिकारी म्हणून जबाबदारी आली. आता गेल्या काही महिन्यांपासून प्रशासक म्हणून नेहा भोसले काम पाहात आहेत. प्रशासनामार्फतच आजपर्यंत जिल्हा परिषदेचा कारभार सुरु आहे. सव्वा तीन वर्षे होऊनदेखील जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणीवर गेल्यामुळे प्रदीर्घ कालावधीनंतर आजही जिल्हा परिषदेमध्ये लोकप्रतिनिधी नाहीत, असे चित्र आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुका शासन कधी घेणार याकडे पान २ वर

## राज्यभर मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई :** काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने राज्यभरात पुन्हा हजेरी लावली आहे. शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सर्वत्र हलक्या सरी कोसळल्या. अशातच हवामान विभागाने पुढील आठवडाभर १७ जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील १७ जिल्ह्यात १३ ते १८ सप्टेंबर या कालावधीत अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांसह रायगड, कोल्हापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, लातूर, नांदेड, बीड, परभणी, हिंगोली आणि यवतमाळ या जिल्ह्यात मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याच्या अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## मुंबई हायकोर्ट बॉम्बने उडविण्याची धमकी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

राजधानीत बॉम्ब धमक्यांचा सिलसिला थांबण्याचं नाव घेत नाहीये. शुक्रवारी दिल्ली उच्च न्यायालयाला ईमेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली. या मेलमध्ये न्यायालयाच्या आवारात, विशेषतः न्यायाधीशांच्या कक्षात आणि इतर भागांत स्फोटके ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच दुपारच्या नमाजानंतर स्फोट होईल, असा इशाराही देण्यात आला. दरम्यान, दिल्लीपाठोपाठ आता मुंबई हायकोर्टलही बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याची माहिती आहे. त्यामुळे आजची सुनावणी स्थगित केली आहे.

# आज शेकाप भवनमध्ये वक्तृत्व स्पर्धा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**




शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि.१३) अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी साडेआठ वाजता होणार आहे.

मीनाक्षीताईपाटीलरायगडच्याच नव्हे तर, संपूर्ण महाराष्ट्राच्या झुंजार नेत्या होत्या. राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांची कामगिरी मोलाची राहिली आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण राहावे, यासाठी शेकापच्या वतीने त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाग, पुरोगामी युवक संघटना अलिबाग, शेकाप सांस्कृतिक सेल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ वक्तृत्व स्पर्धा १३ सप्टेंबरला होणार आहे. या स्पर्धेसाठी ४५ स्पर्धकांनी नोंदणी केली आहे.

‘स्थानिक प्रश्नांचे राज्यस्तरीय नेतृत्व मीनाक्षीताई पाटील, येवा कोकण आपलोच असा-पण विकासाचं काय?, सावित्रीच्या लेकी चालल्या पुढे, पान २ वर




# रियालयन्सचा मनमानी कारभार

- **मागण्या पूर्ण न करताच कंपाऊंडचे काम सुरू**
- **झोतिरपाडातील शेतकरी, ग्रामस्थांचा संताप**

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**


(छायाचित्र : धम्मशील सावंत)

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनीच्या संलग्न बेणसे झोतिरपाडा ग्रामपंचायत हद्दीत नवीन प्रकल्पाची उभारणी होत आहे. रिलायन्सचा नवा प्रकल्प उभारत असताना येथील स्थानिक, भूमीपुत्र, शेतकरी, पशुपालक, मत्स्यव्यावसायिक यांच्या मागण्यांची आणि तक्रारींची रिलायन्स व्यवस्थापनाकडून लेखी स्वरूपात दखल व पूर्तता होणार असल्याची विश्वासार्ह हमी आजवर दिली गेलेली नाही. तर, आंदोलनातील एकही मागणी मान्य न करताच कामे वेगाने पूर्ण करण्याचा सपाटा सुरू असल्याने येथील स्थानिक जनतेत असंतोष उफाळून आला आहे. शेतकरी व स्थानिकांनी शुक्रवारी (दि. १२) कंपाऊंडचे काम सुरू असल्याच्या ठिकाणी जाऊन जाब विचारला. पान २ वर

# कोर्लईत बेकायदा वाळू उत्खननाचा फटका

### समुद्र किनाऱ्याची धूप, रस्ता गेला वाहून

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे समुद्रकिनारी बेकायदेशीर वाळू उत्खननामुळे मोठ्या प्रमाणात बंधाऱ्याची धूप झाली असून, तेथील किनारीलगत असलेला डांबरी रस्ता वाहून गेल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार देऊनही अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

कोर्लई गावाला अंदाजे दोन कि.मी.चा समुद्रकिनारा लाभला आहे. या किनाऱ्यावर काही वर्षांपूर्वी अर्ध्या भागात नव्याने दगडी बंधारा बांधण्यात आला. पान २ वर



# एसटी बसचा ब्रेक फेल

- **चालकाच्या धाडसामुळे शेकडो जीव वाचले**
- **नादुरुस्त बसेस पुरवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ**

**| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |**

महागाववरून सकाळी ८.३० वाजता पालीकडे सुटलेली एस.टी. बस (क्र. एमएच २० बीएल ३८४७) ही कवेळे आदिवासी वाडीजवळील नागमोडी वळणावर पोहोचताच अचानक ब्रेक फेल होऊन थरारक घटना घडली. बसमधील शेकडो प्रवासी मृत्यूच्या छायेत असताना वाहनचालक गणेश करमरकर व वाहक रतिलाल गांगुर्डे यांनी प्रसंगावधान दाखवत पान २ वर




## महाडमध्ये दोन समाजामध्ये तणाव

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धार्मिक भावना दुखावणारा आक्षेपार्ह मजकूर व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवर ठेवणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीत आरोपी (रा. करंजखोल, ता. महाड) याने १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२.४५ वाजता व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवर एका समाजाच्या श्रद्धास्थानांविषयी अश्लाघ्य व घाणेरडी भाषा वापरून मजकूर पोस्ट केला असल्याचे नमूद केले आहे.

या पोस्टमुळे फिर्यादी तसेच स्थानिक समाजातील नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून, दोन समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सपोनि शिवराम खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने कारवाई करण्यात आली.सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून, अटक करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. घटनास्थळी पोलिसांनी गस्त सुरू ठेवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे महाड शहराध्यक्ष पराग वडक यांनी दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करीत, आरोपीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.




# पडद्यामागील कलाकार

## श्री. विनोद दामोदर रुईकर

### वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

नुकत्याच पार पडलेल्या ‘राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार सोहळा २०२५’मध्ये रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामधील थळ गावचे सुपुत्र कलाकार श्री. विनोद दामोदर रुईकर यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

भारत इतिहास संशोधन मंडळ, सदाशिव पेठ पुणे येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्या दरम्यान अनेक मान्यवर उपस्थित होते. सिने अभिनेत्री, अभिनेते, साहित्यिक, व्याख्याते यांच्या हस्ते पुरस्कार वितरण केले गेले.

महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा मानबिंदू असलेली सामाजिक चळवळ साऊ ज्योती सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य आयोजित विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कलावंतांचा पुरस्कार देऊन व त्यांचे मनोगत जाणून घेऊन हा सोहळा आनंदात पार पडला.

याप्रसंगी श्री. विनोद दामोदर रुईकर यांना त्यांच्या कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**श्री. विनोद दामोदर रुईकर यांच्या विषयी थोडक्यात :**

श्री. विनोद दामोदर रुईकर रायगड जिल्ह्यातील अलिबाग मधील थळ या गावात राहणारा एका सामान्य कुटुंबात जन्मलेला असामान्य कलाकार(विशेष करून बांबू क्षेत्रांतील कारागिरी). कारण आजतागायत या कलाकाराने त्यांची कारकीर्द नावलौकिक वाढवत संपूर्ण जिल्ह्याचे व आपल्या कुटुंबाचं नाव एका अशा उंचीवर नेऊन ठेवले आहे, जिथपर्यंत जाणं काही मोजक्याच माणसांना जमू शकत. असा हा काही भाग्यवानांपैकी एक कलाकार म्हणजेच श्री. विनोद दामोदर रुईकर

श्री. विनोद दामोदर रुईकर हे बुरुड समाजातील असून, बालपणापासूनच ते मेहनती आणि नाविन्यपूर्ण गोष्टी करून त्यामध्ये काहीतरी वेगळेपण करण्याच्या प्रयत्नात असत. अशातच त्यांनी बांबू या निसर्गरम्य वातावरणातील बेटाला एक नवी ओळख निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला आहे. होय, बांबू हा दिसायला कसाही असला तरी त्यापासूनही आपण अनेक इको फ्रेंडली दर्जेदार आणि टिकाऊ वस्तू बनवू शकतो याचा प्रत्यय श्री. विनोद दामोदर रुईकर यांनी संपूर्ण रायगडवासियांना करून दिला आहे. त्यामुळे बऱ्याच अंशी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर कमी होऊन पर्यावरणाच्या दृष्टीने एक पाऊल जागृतेकडे पडले आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे कोकणवासियांच्या आणि महाराष्ट्राच्या लाडक्या बाप्पाचा उत्सव अतिउत्साहात पार पडला. त्यावेळी श्री. रुईकर यांनी बांबू पासून तयार केलेल्या माखरांना भरपूर मागणी होती.

आज संपूर्ण रायगड जिल्ह्यमध्ये बांबूपासून अनेक नवनवीन वस्तू बनवणे, नाटकाचे सेट लावणे, बांबूची घरे बनविणे, गणपती मकर व दिवाळी कंदील बनविणे तसेच आपल्याला आपल्या सोयीनुसार कोणतीही वस्तू जशी हवी, तशी ते बांबूपासून तयार करून देऊ शकतात. आणि या वस्तू टिकाऊ व मजबूतही असतात तसेच पर्यावरणपूरकही.

अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने बांबू या वनस्पतीचा संपूर्ण अभ्यास करून बांबूचा प्रसार आणि प्रचार संपूर्ण रायगडभर केला आहे. त्यासाठी त्यांनी मोफत प्रशिक्षण शिबिरे घेतली. अनेकांना बांबूचे महत्त्व पटवून दिले. सरकारी योजना व बांबूचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन युवा वर्गाला स्वयंरोजगाराचे एक साधन निर्माण करून दिले आहे. जसे बालपणी एक होतकरू आणि कष्टाळू मुलाला थळमधील राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (RCF LTD) या केंद्रशासित कंपनीत त्यांच्या हुशारीच्या आणि मेहनतीच्या जोरावर संधी दिली गेली. त्या संधीचे त्यांनी सोने केले. व समाजाप्रती आपणही देणे लागतो या भावनेने ते आजतागायत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या ते अनेकांना निष्ठेने मदत करीत असतात.

श्री. विनोद दामोदर रुईकर यांनी अलिबागमधील अलिबाग –रेवस रोडलगत) राजमाळा येथे बांबूवर प्रक्रिया करून त्यापासून केलेले कलाविष्कार, बांबूचे वेगळेपण, जादूसदृश्य असे बांबू उत्पादन करणारे कलादालन उभे केले आहे. ज्याचं नाव ‘रुईकर्स बांबू आर्ट गॅलरी’ अलिबाग असून, या दालनात स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच अनेकांना कठीण प्रसंगी ते स्वतः स्वतःची महत्त्वाची कामे बाजूला ठेवून, सदैव इतरांची मदत करण्यात तत्पर असतात. अशा या मनुष्यरुपी देव माणसाला नक्की भेट द्या. कारण, श्री. विनोद दामोदर रुईकर हे मनुष्य जीवनातील पडद्यामागील अदृश्य असे सर्वोत्कृष्ट कलाकार आहेतच, याची प्रचिती अनेकांना त्यांच्या कार्यातून दिसून येते.

**पुरस्कारांचा वर्षाव :** ● रायगड भूषण पुरस्कार २०११, ● कुलाबा जीवनगौरव पुरस्कार २०१४, ● राज्यस्तरीय कला भूषण पुरस्कार २०१८, ● शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४, ● महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कार २०२५, ● राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार २०२५, ● महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव पुरस्कार :

सलग वर्षानुवर्षे बांबूचे नेपथ्य लावून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्रत्येक वर्षी मिळवण्याचा मान त्यांनी त्यांच्या मेहनतीतून मिळवला आहे. व कला क्षेत्रात एक नवी क्रांती घडवून आपली एक नवी छाप उमटविली आहे.

अशा प्रकारे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कलाक्षेत्र अशा एकंदरीत सर्वच क्षेत्रात श्री. विनोद दामोदर रुईकर यांनी निःस्पृहपणे कार्य केले व वर्षानुवर्षे ते कार्य अखंडपणे सुरूच ठेवले, त्याचच फळ म्हणून त्यांना अनेक वेळा गौरवण्यात आले आणि त्यांचे कार्यही वाढतच राहीले. अशा या कलावंताचे त्रिवार अभिनंदन! अभिनंदन! अभिनंदन!

या कार्याने प्रेरित होऊन समाजातील अनेक व्यक्ती बांबूच्या क्षेत्रात रोजगारनिर्मिती करून बेरोजगारीचा भेडसावणारा प्रश्न कमी करून पर्यावरण रक्षण करण्यास हातभार लावतील व एक सुजाण नागरिक म्हणून आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडतील, ही अपेक्षा.

धन्यवाद!

**(प्रसाद नरेंद्र अमृते)**

# मालमत्ता कर वाढीविरोधात जनतेतून उद्रेक

## जनसुनावणी तात्काळ रद्द, संतप्त नागरिकांकडून निषेध



**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

**पाली नगरपंचायत प्रशासन आणि नगररचनाकार कार्यालय अलिबाग यांच्या माध्यमातून मालमत्ता करवाढीच्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. १२) भक्तनिवास क्रमांक १ मध्ये जनसुनावणी ठेवण्यात आली होती. मात्र, या जनसुनावणीत जुलमी मालमत्ता करवाढीविरोधात पालीकर जनतेत प्रचंड असंतोष व संताप पाहावयास मिळाला. जुलमी करवाढ रद्द करावी, या मागणीसह पाली नगरपंचायत प्रशासनाचा नागरिकांनी यावेळी निषेध व्यक्त केला.**

पाली गावचे नगरपंचायतीत रूपांतर झाले आहे. मात्र, नगरपंचायत होऊन पालीचा सर्वांगीण शाश्वत विकास होईल, अशी जी अपेक्षा जनतेला होती, ती अपेक्षा धुळीस मिळाली आहे. पालीत अद्याप कुठल्याही पायाभूत नागरी मूलभूत सुविधा देण्यात पाली नगरपंचायत अपयशी ठरली आहे. पालीकरांना स्वच्छ व मुबलक पिण्याचे पाणी, सांडपाण्याचा निचरा, वाहतूक कोंडीसह अन्य समस्येची सोडवणूक नगरपंचायत प्रशासनाकडून होत नाही, विकासाच्या अपेक्षांचा जनतेचा पूर्णपणे भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे या जनसुनावणीत नागरिकांचा संताप अनावर झाला. त्यामुळे सदरची जनसुनावणी रद्द करण्यात आली. यावेळी संतप्त नागरिकांनी गदारोळ करीत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना कपिल नारायण पाटील म्हणाले की, आम्ही सर्व पालीकर नागरिक आमच्या समस्या मांडत आहोत. पाली नगरपंचायतप्रशासनाकडून प्रस्थापित करवाढ ही गेल्या ऑक्टोबर २०२४ मध्ये नोटीसीमार्फत देण्यात आली होती. आज जनसुनावणी घेण्यात आली, या मालमत्ता करवाढीला आमचा तीव्र विरोध आहे. जनतेला कोणत्याही पायाभूत नागरी सुविधा मिळत नाहीत. शुद्ध पाणी योजना नाही, प्रत्येकाच्या घरात गढूळ पाणी पुरवठा होत आहे, सार्वजनिक उद्यान नाही, वाहतूक कोंडीची समस्या गंभीर आहे, अतिक्रमणरहित रस्ते आहेत, आम्ही सतत तक्रारी करून नगरपंचायत दुर्लक्ष करीत आहे, सदरची करवाढ २०० टक्के, ६०० टक्के, ८०० टक्के जुलमी आहे.

सदरची सुनावणी वेगवेगळ्या वेळेत घेण्यात आली आहे. यामागे षड्यंत्र काय, एकत्रित जनसुनावणी घ्यावी, अशी मागणी आम्ही करीत आहोत. पाली नगरपंचायत क दर्जाची असून, कोणत्याही करवाढीस पात्र नाही. तरी, ही करवाढ का केली जाते, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. विनायक सोनकर म्हणाले की, आम्ही हायवेलगत राहात नाही, गल्लीत राहतो, लाकडी घरात राहतो, मात्र आमचे स्लॅबचे घर दाखवून सातपट करवाढ केली आहे, याचा निषेध करतो.

या जनसुनावणीवेळी नगर रचनाकार थोनटे, नगरपंचायत मुख्याधिकारी माधुरी मडके, नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार आदींसह पालीकर नागरिक मोठ्या संख्येने होते.

> **कर आकारणीकरिता जे झोनिंग झाले आहे, त्याचे रिझोनिंग करून कर आकारणी करावी तसेच नागरिकांच्या मागणीप्रमाणे कमीत कमी कर आकारणी करावी, असा प्रयत्न नगरपंचायतीतील सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन येत्या सर्वसाधारण सभेत करआकारणी कमीत कमी व्हावी अशी मागणी आम्ही करणार आहोत. लोकभावनांचा आदर करीत शक्य ते सर्व प्रयत्न आम्ही करू.**
> **– पराग मेहता, नगराध्यक्ष**

> **आजची मालमत्ता कर वाढीसंदर्भातील जनसुनावणी रद्द करण्यात आली आहे. ही जनसुनावणी पुन्हा एकदा घेण्यात येईल. यावेळी उपस्थित पालीकर जनतेने समस्या व हरकती मांडल्या. त्या अनुषंगाने पाली नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा होईल, त्या सभेत याबाबत निर्णय घेण्यात येतील.**
> **– माधुरी मडके, मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत**

## दिबा मानवंदना कार रॅली

**| उरण | प्रतिनिधी |**

भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आणि धर्मवीर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने लोकनेते दिबा पाटील साहेबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवार, दि. १४ सप्टेंबर रोजी 'दिबा मानवंदना कार रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीचा उद्देश नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दिबा पाटील यांचे नाव देण्याची मागणी केंद्र व राज्य शासनापर्यंत पोहोचविणे हा आहे. रॅलीचे प्रस्थान सकाळी १० वाजता भिवंडी माणकोली येथून होणार असून, ठाणे व नवी मुंबईमार्गे पुढे जासई येथे दुपारी २ वाजता रॅलीचा समारोप होणार आहे. मार्गातील ठाणे, कळवा, ऐरोली, रबाळे, घणसोली, वाशी, नेरूळ, बेलापूर, उलवे, पनवेल आदी ठिकाणी ग्रामस्थ व सामाजिक संस्था रॅलीचे भव्य स्वागत करणार आहेत. लोकनेते दिबा पाटील यांच्या त्यागातून लाभलेल्या १२.५ टक्के भूखंडधारकांसह नवी मुंबईतील सर्व नागरिकांना रॅलीत सहभागी होऊन कृतज्ञता व्यक्त करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पाली नगरपंचायतीत सत्तेची अस्थिरता कायम




## साडेतीन वर्षांत चौथे नगराध्यक्ष

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

पाली नगरपंचायतीत गेल्या साडेतीन वर्षांच्या कालावधीत राजकीय उलथापालथींचा सिलसिला सुरूच असून, नुकत्याच पार पडलेल्या निवडीत चौथ्या नगराध्यक्षाची निवड करण्यात आली आहे. या सततच्या बदलांमुळे प्रशासनात अस्थिरता निर्माण झाली असून, विकासकामांवर त्याचा प्रत्यक्ष परिणाम जाणवू लागला आहे.

नगराध्यक्षपदावर वारंवार होणारे बदल, काही नगरसेवक व नगराध्यक्षांचे सदस्यत्व रद्द होणे, पहिल्या नगराध्यक्षांचा राजीनामा, तसेच नगरसेवक पदासाठी झालेल्या पोटनिवडणुका या सर्व घडामोडींनी पाली नगरपंचायतीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, या राजकीय अस्थिरतेमुळे अनेक महत्त्वाची विकासकामे रखडली आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी योजनांना गती मिळण्याऐवजी अडथळे निर्माण होत आहेत. प्रशासनात सातत्याचा अभाव असल्यामुळे निर्णयप्रक्रिया आणि निधी वितरणात विलंब होत आहे. पाली नगरपंचायतीत सत्तेच्या खुर्चीसाठी सुरू असलेली रस्सीखेच जनतेच्या अपेक्षांशी विसंगत ठरत असून, लोकप्रतिनिधींनी विकासाला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.



बाजारपेठेत वाहतुकीचा खोळंबा झालेला दिसून येत आहे. (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

# मुरूड बाजारपेठेत वाहतुकीचा खोळंबा

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड शहरातील मुख्य बाजारपेठेतील वळणाच्या रस्त्यावर दुतर्फा दुचाकी पार्किंग होत आहे. यामुळे एसटी तसेच मोठी वाहने येथून बाहेर पडताना मोठी कसरत करावी लागते. कधी कधी मोटारसायकल व एसटी चालक शाब्दिक चकमक होत आहे. परिणामी, वाहतुकीचा कायम खोळंबा होत आहे. वाहतूक नियंत्रणाकरिता ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. जसे गणेशोत्सवावेळी वाहतुकीसंदर्भात नियम केले जातात, तेच नियम कायमस्वरूपी करावे जेणेकरून शहरातील पादचाऱ्यांना वाहतुकीचा त्रास होणार नाही, अशी मागणी मुरुडकरांकडून करण्यात येत आहे.

## नवी मुंबईत साकारतोय इंटरनॅशनल मरीना प्रकल्प

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबई शहराच्या लौकिकात भर घालणारा आणि सागरी पर्यटनाला चालना देणारा नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रकल्प आता प्रत्यक्षात आकार घेऊ लागला आहे. बेलापूर सेक्टर १५ येथे महाराष्ट्रातील पहिला असा हा प्रकल्प उभा राहणार आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने सर्व आवश्यक परवानग्या मिळवून आता प्रकल्पाच्या कामाला वेग दिला आहे. हा प्रकल्प नवी मुंबईतील पहिलाच मरीना प्रकल्प ठरणार असून, मुख्यमंत्र्यांच्या प्रगतिशील उपक्रम यादीमधील हा एक उपक्रम आहे.

# चोरी करून चोर थेट मैत्रिणीसोबत गोव्याला

## ● नेरळ चोरी प्रकरणातील आरोपीला गोव्यातून अटक

**| नेरळ | वार्ताहर |**

नेरळ शहरात पाच दिवसांच्या गणपती विसर्जनच्या दिवसी सायंकाळी चोरी झाल्याची घटना घटली होती. या चोरी प्रकरणातील चोर मात्र चोरी करून थेट मैत्रिणीसोबत गोवा फिरत असल्याची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली. नेरळ पोलिसांनी या आरोपीला गोव्यातून अटक केली आहे.




नेरळ शहरात चोरी करणारा शहवान फरयाझ शेख (३३) असे त्याचे नाव असून, हा कल्याण भिवडी, दांडेकरवाडी नवीवस्ती, ठाणे जिल्हा) याला नेरळ पोलिसांच्या पथकाने गोव्यातून अटक असून, त्याने चोरलेली रोख रक्कम खर्च करत तो आपल्या मैत्रिणीसोबत गोव्यात फिरत मौजमजा करत होता. याची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली होती.

२ सप्टेंबर रोजी नेरळ येथील राजेंद्र गुरुनगरमधील अंबिका अपार्टमेंटमध्ये ही मोठी चोरी झाली होती. गणेश संनगरे यांच्या पहिल्या मजल्यावरील घराचे लोखंडी कपाट फोडून तब्बल सात तोळे सोने व सहा लाख रुपये रोख असा ऐवज चोरून नेण्यात आला होता. दोन गंठण, चैन, ब्रेसलेट, अंगठी आणि रोकड असा मुद्देमाल लंपास झाला होता. चोरीसाठी वापरलेला लोखंडी रॉडही घटनास्थळाजवळ सापडला होता.

या घटनेनंतर तात्काळ तक्रार दाखल होताच नेरळ पोलिसांनी चार शोधपथके तयार करून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज व डॉग स्कॉडच्या मदतीने आरोपीचा शोध घेण्यात येत होता. घटनास्थळी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड व नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे यांनी पाहणी केली होती. पोलिसांनी काटेकोर तपास करून आरोपीचा माग काढला आणि अखेर गोव्यातून त्याला ताब्यात घेतले. नेरळ पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## कॉ. ए.एम. पाटील यांचे निधन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ ठाणे अध्यक्ष कॉम्रेड ए.एम. पाटील यांच्या निधनाने महाराष्ट्रातील लाखो अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका तसेच असंख्य कामगार, सहकारी व हितचिंतक यांच्यावर शोककळा पसरली आहे.



ए.एम. पाटील यांनी प्रसिद्ध कामगार नेते, सर्व श्रमिक संघ, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ, बांधकाम कर्मचारी संघ आणि अशा अनेक युनियनचे प्रणेते, अध्यक्ष म्हणून संघटनांची पदे भूषविली आहेत. तसेच त्यांनी कित्येक दशके अंगणवाडी सेविकांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा देत त्यांचे प्रश्न शासनाच्या दरबारी मांडून त्यांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी झटले व झगडले आहेत. त्यासाठी आक्रमक पवित्रा घेत लाखो अंगणवाडी सेविका मदतनीस यांना सोबत घेत संपूर्ण महाराष्ट्रभर नव्हे तर, दिल्लीच्या तख्तापर्यंत त्यांनी कित्येक मोर्चे, उपोषण, चळवळी, पदयात्रा करीत शासनाला सळो की पळो करून सोडले व न्याय मिळवून देण्यासाठी अध्यक्ष या नात्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

अंगणवाडी सेविकांना ५० रुपये मानधनावावरून आज १५०००/- मानधनापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी कित्येक खस्ता खात सेविकांना न्याय मिळवून दिला आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ ठाणेच्या रायगड जिल्हा प्रतिनिधी जिविता पाटील यांनी आमचा आधारवड हरपला या शब्दात दुःख व्यक्त केले आहे.

# उरण-करंजा रस्त्याचे निकृष्ट काम

## ● अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, ग्रामस्थ संतप्त

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण-करंजा रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी ठेकेदाराची पाठराखण करत कामाकडे दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे.



ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, या कामाचा ठेकेदार हा एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी असल्याने, राजकीय दबावामुळे शासकीय अधिकारी कारवाई करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराला उघड संरक्षण मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

पावसाळ्यानंतर सुरू झालेल्या या कामात ठेकेदाराकडून नियमांचा भंग करून निकृष्ट साहित्य वापरले गेले. परिणामी, काही दिवसांतच रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. ग्रामस्थांनी ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची जोरदार मागणी केली आहे.

करंजा परिसरातील ग्रामपंचायतीसह इतर शासकीय कामांतही भ्रष्टाचार होत असल्याच्या चर्चा सुरू असून, उरण पंचायत समितीकडे वारंवार तक्रारी करूनही आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. उलट, अधिकारीवर्गाकडून ठेकेदारांची पाठराखणच केली जात असल्याचा आरोप आहे.

# अंजुमन कॉलेजमध्ये शिक्षक दिन उत्साहात



**| रोहा | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू हायस्कुल आणि कनिष्ठ विद्यालयात बुधवारी (दि. १०) रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात कुरआन पठणाद्वारे करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी हमद व नात गायन करुन कार्यक्रमात रंगत आणली.

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत सुंदर भाषणे, कविता आणि गीते सादर केली. भावी पिढी म्हणजे विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांनी घेतलेली मेहनत आणि त्यांचे योगदान आणि मार्गदर्शन या विषयावर प्रकाश टाकत शिक्षक हेच राष्ट्राचे शिल्पकार असल्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिली. या कार्यक्रमात शाळेचे प्राचार्य नजीउल्ला खान, युसुफ झई यांनी शिक्षकांचा त्याग आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी घेतली मेहनत व त्यांच्या भूमिकेची माहिती करून देत सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता दहावी व इ. बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच अध्यापनाची जबाबदारी निभावणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यरांच्या हस्ते सन्मानचिन्हे व भेटवस्तू देऊन त्यांना गौरविण्यात आले.

पान १ वरून

## रायगडसाठी 'सर्वसाधारण'

वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे डोळे लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा आता संपण्याच्या मार्गावर आहे.

मागील काही महिन्यांपूर्वी लोकसंख्या वाढ विचारात घेऊन प्रभाग रचना करण्यास सांगितले होते. परंतु, २०२१ मध्ये जनगणना न झाल्याने ती प्रभाग रचना रद्द करून २०११ च्या जनगणनेनुसार प्रभाग रचना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार प्रभाग रचनेचा कार्यक्रम पार पडला. प्रभाग रचनेनंतर आरक्षण जाहीर कधी होणार याकडे लक्ष लागून राहिले होते. अखेर रायगड जिल्ह्यातील अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. अध्यक्षपदासाठी 'सर्वसाधारण' आरक्षण पडले आहे. या आरक्षणामुळे काहींचा हिरमोड झाला असून, काहींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जिल्ह्यातील ५९ जागांसाठी जिल्हा परिषदेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वेगवेगळ्या राजकीय पक्षांतील नेते आणि कार्यकर्ते मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी कामाला लागले आहेत.

**राज्यातील जि.प.मध्ये असे असेल आरक्षण**

राज्यातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे आरक्षण जाहीर झाले असून, ठाणे -सर्वसाधारण (महिला), पालघर- अनुसुसूचित जमाती, रायगड-सर्वसाधारण, रत्नागिरी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सिंधुदुर्ग - सर्वसाधारण, नाशिक -सर्वसाधारण, धुळे -नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), नंदूरबार-अनुसूचित जमाती, जळगाव - सर्वसाधारण, अहिल्यानगर अनुसूचित जमाती (महिला), पुणे -सर्वसाधारण, सातारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सांगली - सर्वसाधारण (महिला), सोलापूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग, कोल्हापूर- सर्वसाधारण (महिला), छत्रपती संभाजीनगर -सर्वसाधारण, जालना - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), बीड- अनुसूचित जाती (महिला), हिंगोली -अनुसूचित जाती, नांदेड - नागरिकांचा मागास प्रवर्ग, धाराशिव - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), लातूर-सर्वसाधारण (महिला), अमरावती - सर्वसाधारण (महिला), अकोला - अनुसूचित जमाती (महिला), परभणी-अनुसूचित जाती, वाशिम अनुसूचित जमाती (महिला), बुलढाणा-सर्वसाधारण, यवतमाळ सर्वसाधारण, नागपूर-नागरिकांचा मागास प्रवर्ग, वर्धा-अनुसूचित जाती, भंडारा-नागरिकांचा मागास प्रवर्ग, गोंदिया - सर्वसाधारण (महिला), चंद्रपूर-अनुसूचित जाती (महिला), गडचिरोली -सर्वसाधारण (महिला) आरक्षण पडले आहे.

## रिलायन्सचा मनमानी कारभार

आमच्या मागण्या आधी पूर्ण करा, अशी जोरदार मागणी केली.

नव्याने प्रकल्प उभारत असताना हा प्रकल्प नेमका कोणता आहे? मानवी व सजीव सृष्टीस किती अपायकारक व घातक आहे, लाखो वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे, यावर पर्यावरणाचा समतोल राखणारी कोणती व्यवस्था केली आहे? याची माहिती कोणतीही जनसुनावणी घेऊन देण्यात आलेली नाही. येथील जनतेला शेतकऱ्यांना विश्वासात न घेता, स्थानिकांच्या मूलभूत प्रश्न तक्रारी व समस्यांची सोडवणूक न करता प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. अशातच या नव्या प्रकल्प निर्मितीत साधारणतः ४० ते ५० फूट मातीचा भराव करण्यात आला आहे. हे मातीचे ढिगारे कोसळून येथील पशुधन नष्ट होत असल्याने शेतकरी पशुपालक चिंतेत सापडले आहेत. तर, पावसाळ्यात या अवाढव्य मातीच्या भरावाने महापुराची स्थिती ओढवून सभोवतालच्या गावात व घरात पुराचे पाणी शिरून जीवितहानी व वित्तहानी होण्याची भीती वाढली आहे. शेतकरी पशुपालक यांना शेतावर जाण्या-येण्याकरिता पूर्वापार वहिवाट व दळणवळणाचे साधन नष्ट करण्याचा डाव रिलायन्स व्यवस्थापनाने आखला असल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे, रविवारी सुट्टीच्या दिवशी तार कपांऊंडचे काम अतिवेगाने केल्याचा संताप पशुपालक आसिफ मोमीन व शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

शेतकरी, पशुपालक व मत्स्यव्यावसायिक यांना व वाहनांना जाण्या-येण्यासाठी आवश्यक तितका रुंद रस्ता ठेवण्यात आला नाही. अरुंद रस्त्यावरून अग्निशमन बंब, रुग्णवाहिका, शेतकऱ्यांची साहित्य ने-आण करणारी वाहने कशी नेणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. बेणसे सिध्दार्थ नगर येथील विविध जनहितार्थ मागण्यांसाठी आमरण उपोषणास बसलेले आंदोलक योगेश अडसुळे यांनी सांगितले की, उपोषणाच्या कोणत्याही मागण्या पूर्ण केल्या गेल्या नाहीत. उपोषणदरम्यान मागण्यांच्या अनुषंगाने पेण तहसीलदार, पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक व रिलायन्सचे अधिकारी, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत दिलेले आश्वासन पूर्ण न करताच बेणसे सिध्दार्थ नगर गावाला लागून तारेचे कपांऊंड केले जात आहे, त्यामुळे मी मागण्यांच्या पूर्ततेसाठी पुन्हा आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा योगेश अडसुळे यांनी दिला आहे.

जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत कपांऊंडचे काम थांबवावे, अशी जोरदार मागणी बेणसे झोतिरपाडा, बेणसे सिध्दार्थ नगर येथील शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, यासंदर्भात रिलायन्स व्यवस्थापनाची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

## आज शेकाप भवनमध्ये वक्तृत्व स्पर्धा

संघर्षातून आत्मनिर्भरतेकडे, नफरत के बाजार मे मोहोब्बत बेच रहा हूं मै, सकारात्मक बदलाची सुरुवात-व्यक्तीच्या प्रयत्नातून समाजापर्यंत, रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला रोख ११ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला रोख आठ हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला रोख पाच हजार रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकाला रोख तीन हजार रुपये व चषक तसेच पाचव्या क्रमांकाला रोख दोन हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येकी एक हजार रुपये व चषक अशी पाच उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जाणार आहेत.

## कोर्लईत बेकायदा वाळू उत्खननाचा फटका

परंतु, उर्वरित भागात बंधारा नसल्याने उधाणाच्या पाण्याने बंधाऱ्याची मोठ्या प्रमाणावर धूप होत आहे. तेथील किनाऱ्यालगत कोर्लई ते बोर्लीकडे जाणारा डांबरी रस्तासुद्धा अर्धा वाहून गेला आहे. रहदारीचा असलेला रस्ता पूर्णपणे वाहून गेल्यास तेथून जाणे-येणे जिकिरीचे होईल, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तरी, संबंधित विभागाने कोर्लई समुद्रकिनारी लवकरात लवकर धूपप्रतिबंधक बंधारा बांधावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

कोर्लई समुद्रकिनारी बेकायदेशीररित्या वाळू उत्खन्नन केले जात आहे व त्यामुळेच समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात धूप होत असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले. याबाबत कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ यांनी दुजोरा दिला असून, कोर्लई समुद्र किनाऱ्यावर होत असलेल्या वाळू उत्खननाबाबत अनेकदा शासन दरबारी तक्रार निवेदन देण्यात आले आहे. मात्र, संबंधितांच्या दुर्लक्षतेने बेकायदेशीर वाळू उत्खनन थांबविले जात नाही. परिणामी, कोर्लई समुद्रालगत मोठ्या प्रमाणात धूप होऊन तेथील अर्धा डांबरी रस्ता वाहून गेला आहे. कोर्लई येथील बेकायेदशीर वाळू उत्खननाबाबत मुरूड तहसीलदार यांना तक्रार निवेदन ग्रामपंचायत कोर्लईच्यावतीने देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

## एसटी बसचा ब्रेक फेल

गाडी सुरक्षित थांबवली आणि प्रवाशांचा जीव वाचवला. या घटनेनंतर प्रवाशांचा एसटी महामंडळाच्या कारभारावर रोष उसळला आहे.

ग्रामीण भागातील मार्गावर नेहमीच नादुरुस्त व जीर्ण बसेस पाठवून एस.टी. महामंडळ प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत असल्याची प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अपघात टळला म्हणून महामंडळाला सुटकेचा श्वास सोडता येणार नाही. प्रवाशांचे प्राण धोक्यात घालणाऱ्या अशा बेफिकीर व निष्काळजी धोरणावर तातडीने कारवाई व्हावी, अन्यथा प्रवाशांचा संताप मोठ्या आंदोलनात परिवर्तित होईल, अशी चर्चा प्रवाशांमध्ये रंगली आहे.

दरम्यान, वाहनचालक गणेश करमरकर यांच्या धाडसी कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांनी जीवावर उदार होत गाडी थांबवली नसती, तर या अपघातात कित्येक बळी गेले असते, असा सूर प्रवाशांनी व्यक्त केला. मात्र, चालक व वाहकांच्या धाडसामुळे मृत्यूच्या दाढेतून शेकडो प्रवासी थोडक्यात सुटले.

# स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील
# राजकारण व महिला सक्षमीकरणातील दीपस्तंभ

स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील यांचा जीवन परिचय करुन घेणे व करुन देणे ही एक अवघड; परंतु तेवढीच आव्हानात्मक बाब आहे. कारण, लहानपणापासूनच त्यांनी संघर्ष कसा असतो व तो कसा यशस्वीपणे करायचा, याचे बाळकडू घेतेलेले. स्व. ना.ना. पाटील यांच्यापासून सुरु झालेला संघर्षाचा वारसा पाटील बंधूंनी समर्थपणे वाढविला. हा वारसा नंतरच्या पिढीनेही चालू ठेवलेला आहे. अशा या संघर्षातून राजकीय, सामाजिक स्तरावर नवीन वैचारिक वारसा निर्माण करणाऱ्या व स्वतःच्या तेजस्वी अशा व्यक्तिमत्त्व व विचाराने अगदी विरोधकांच्या मनातदेखील उच्च स्थान प्राप्त करणाऱ्या माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील होय. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी हा शब्दप्रपंच.

स्व. मीनाक्षीताई पाटील यांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजे श्रीमती सुलभा प्रभाकर पाटील यांच्या माहेरी, रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भडवळ या गावी दि.१३ सप्टेंबर १९४८ रोजी झाला. मीनाक्षीताईंना लहानपणापासून 'बेबी' हे टोपण नाव होते. त्या बेबीताई म्हणूनच रायगडात जास्त ओळखल्या जात. त्यांच्या घरी कोणताही कार्यकर्ता आल्यास बेबीताई आहेत का? अशी चौकशी करत असे, हे मी स्वतः अनुभवले आहे.

मीनाक्षीताई पाटील यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे, तर उच्च शिक्षण जनता मंडळाच्या अलिबाग येथील महाविद्यालयात झाले. खरे तर, बेबीताईंनी वकील व्हावे, ही पाटील कुटुंबियांची इच्छा होती. परंतु, त्या काळात मुलींसाठी आजच्यासारख्या शैक्षणिक सुविधा नव्हत्या, शिवाय काही सामाजिक कौटुंबिक अडचणींमुळे बेबीताई वकिलीचे शिक्षण घेऊ शकल्या नाहीत. जर त्यावेळीस त्यांना वकिलीचे शिक्षण खरंच लाभले असते, तर महाराष्ट्राला ॲड. दत्ता पाटलांसारखा आणखी एक आक्रमक वकील पाटील घराण्याने दिला असता, यात शंका नाही.

असे म्हटले जाते की, कोणत्याही कामात निपुण व्हायचे झाल्यास त्याची पूर्वतयारी व सराव लागतो. अशी पूर्वतयारी व सरावदेखील राजकारणाच्या पार्श्वभूमीवर मीनाक्षीताईंचा सुरु होता. बालपणापासूनच प्रभाकर पाटील यांच्या तालमीमध्ये त्या तयार झाल्या होत्या. शेतकरी कामगारे पक्षाचे स्वरुप महाराष्ट्रात नेहमीच विरोधी पक्ष म्हणून राहिलेले आहे. विरोधी पक्षाला नेहमीच जागरुक राहून सरकारवर, सरकारी धोरणांवर वचक ठेवावा लागतो. अन्यथा लोकशाहीमधील सरकार हुकूमशाही किंवा एकाधिकारशाही पद्धतीने चालवते, म्हणून लोकशाही जागृत ठेवण्यासाठी सभा, संमेलन, मोर्चे, संप, हरताळ, बंद यासारख्या सनदशीर मार्गाच वापर करावा लागतो. राज्यात शेतकरी कामगार पक्ष विरोधी पक्ष असल्याने शेतकरी कामगार पक्षाने जनमत जागृतीसाठी वेळोवेळी अनेक आंदोलने केलेली आहेत. रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्ष या दृष्टीने आघाडीवर होता व सध्याही आहे. त्यामुळे विविध आंदोलने, अन्याय निवारणार्थ उपक्रम या रायगड जिल्ह्यात प्रभाकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली केले गेले होते. या सर्व बाबींचा संस्कार मीनाक्षीताईंवर झाला, त्यांनी लहानपणापासूनच या कामात स्वतःला झोकून दिले होते. राजकारणासोबत समाजकारणातही त्या पुढे होत्या. शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रथमतः त्यांनी १९६८ मध्ये भूविकास बँकेत नोकरी करणे पसंत केले होते. परंतु, त्यांची समाजाबाबतची ओढ व राजकीय वातावरणातील संस्कार यामुळे त्यांनी नोकरीचा त्याग केला. दरम्यान,



प्रा. महेश बिऱ्हाडे

१९७७-७८ साली प्रथमतः पोयनाड आंबेपूर ग्रामपंचायतीवर सदस्य म्हणून, नंतर आंबेपूर ग्रामपंचायतीच्या पहिल्या महिला सदस्या व पहिल्या महिला सरपंच म्हणून निवडून आल्या. त्यांच्या कारकीर्दीमध्ये ग्रामपंचायत आंबेपूर एक रायगड जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण पंचायत म्हणून नावारुपास आली.

१९७९ साली जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीवर तज्ज्ञ सदस्य म्हणून त्यांची निवड करण्यात आली होती. १९७५ साली त्या रायगड जिल्ह्याच्या मराठी पत्रकार संघाच्या पहिल्या महिला अध्यक्षा बनल्या होत्या. तब्बल पंधरा वर्षे त्या पत्रकार संघाच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संघाचा कायापालट होऊन अनेक नवीन उपक्रम 'रायगड पॅटर्न' म्हणून प्रसिद्ध झालेले आहे. आपल्या राजकीय वाटचालीमध्ये मीनाक्षीताई १९९२ मध्ये वैजाळी या जिल्हा परिषद मतदारसंघातून बहुमताने निवडून आल्या. याच रायगड जिल्हा परिषदेमध्ये मीनाक्षीताईंनी संसदीय कार्यप्रणालीचे प्राथमिक धडे घेतले. अनेक समस्या मांडून, कित्येकांना न्याय मिळवून दिला. अचंबित करणारे विचार मांडले. म्हणून त्या जिल्हा परिषदेला स्वतः विद्यापीठ म्हणत असत.

१९९५ साली त्यांना शेतकरी कामगार पक्षाने अलिबाग-उरण मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत प्रचंड मतांनी त्या निवडून आल्या. निवडून आल्यानंतर त्यांनी मतदारसंघामध्ये अनेक लोकोपयोगी कार्ये केली. विधानसभेचे असे एकही अधिवेशन नव्हते, ज्यामध्ये मीनक्षीताईंचा आवेश व रौद्रावतार पाहायला मिळाला नाही. अल्पावधीतच एक व्यासंगी व अभ्यासू आमदार म्हणून त्यांना मान्यता मिळाली. परिणामी, २००० च्या निवडणुकीमध्ये त्या पुन्हा विधानसभेवर अलिबाग-उरण मतदारसंघावर निवडून गेल्या. याच काळात त्यांना मत्स्य व बंदर विकास खात्याच्या राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या कार्यकाळामध्ये जे निर्णय घेतले, त्याप्रसंगी त्यांनी सर्वसामान्य मच्छिमार बांधवांना नजरेसमोर ठेवून निर्णय घेतले. बंदर खात्याचे काम करत असताना कोकणातील बंदरांच्या दृष्टीने आवश्यक असे विकासात्मक निर्णय घेऊन बंदरांच्या विकासाला चालना दिली. मात्र, सरकारमध्ये राहून शेतकरी कामगार पक्षाच्या तत्त्वांविरोधी निर्णय सरकार घेत असल्याचे दिसून आल्यावर शेतकरी कामगार पक्षाने आदेश दिल्याबरोबर शेतकरी कामगार पक्षाच्या इतर मंत्र्यांबरोबर मीनाक्षीताईंनी देखील मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

२००४-०५ च्या निवडणुकीत मीनाक्षीताईंना पराभूत करण्यासाठी विरोधकांनी नामी युक्ती वापरली; ती म्हणजे, नामसाधर्म्य असलेलल्या अनेक मीनाक्षी पाटील नावाच्या डमी उमेदवार विरोधकांनी निवडणुकीत उभ्या केल्या, त्यामुळे मतविभाजन होऊन मीनाक्षीताईंना फार थोड्या मतांनी पराभूत व्हावे लागले. अर्थात, पराभव पचवायलादेखील फार धैर्य व अंतःकरण लागते. मीनाक्षीताईंनी हा पराभव सहज पचवला. अर्थात, पराभवानंतर शांत बसतील, त्या मीनाक्षीताई कसल्या? त्यांनी पुन्हा नव्याने पक्षसंघटना मजबूत करत, कार्यकर्त्यांचे जाळे विणून २००९ च्या निवडणुकीत पुनर्रचित अलिबाग-मुरुड मतदारसंघातून पुन्हा एकदा प्रचंड मतांनी विधानसभेवर निवडून आल्या. आजच्या विधानसभेत अत्यंत धाडसी कणखर व सरकारला सळो की पळो करुन सोडणाऱ्या आमदार म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

समाजिक बाबतीत महिलांच्या ज्या समस्या आहेत; जसे हुंडाबळी, लैंगिक अत्याचार, स्त्रीभ्रूणहत्या याबाबतीत महिला आमदार म्हणून मीनाक्षीताईंनी अक्षरशः रौद्ररूप धारण केलेले विधानसभेने अनेकदा पाहिलेले आहे. यासंदर्भात विधानसभेत त्यांनी एकदा भाजपचे गोपीनाथ मुंडे यांना, आता तुमचा आवेश कोठे गेला? असे प्रश्न विचारून निरूत्तर केले होते. आश्रमशाळेतील मुलींवर झालेल्या बलात्काराबाबत विधानसभेत जी चर्चा झाली, त्याबाबत बोलताना मीनाक्षीताईंनी सभागृहाला हेलावून सोडले होते. त्यासंदर्भात आ. गिरीष बापट यांनी असे लिहिले आहे की, अगदी दगडालादेखील रडू येईल, असे मीनाक्षीताईंचे भाषण होते. सध्याच्या स्त्रीभ्रूण हत्येसंदर्भात महिलांविषयी अत्याचाराच्या संदर्भात गृहखात्याचेही त्यांनी वाभाडे काढले होते. स्व.मीनाक्षीताई हे व्यक्तिमत्त्व एक आगळे व्यक्तिमत्त्व होते. स्मरणशक्ती ही दैवी देणगी त्यांना लाभलेली. त्यांच्या राजकीय वाटचालीमध्ये त्यांना प्रभाकर पाटील व दत्ता पाटील यांच्यासारख्या धुरंधर राजकारण्यांचे मार्गदर्शन जरुर लाभले होते. त्यांची प्रेरणा व प्रेमही मिळाले होते; परंतु यशस्वी होण्यासाठीची वाटचाल त्यांनी स्वतःच केलेली आहे. 'यशस्वीतेसाठी केवळ वारसा किंवा मार्गदर्शन उपयोगी नसते, स्वकर्तृत्व नसेल तर असे सर्व घटक गौण ठरतात'. आज स्व. मीनाक्षीताई आपल्यात नाहीत, हे स्वीकारणे जरी जड जात असले, तरी कालमहिमा अगाध असल्याने ते स्वीकारावे लागते. पण, त्यांनी दिलेले प्रेम, प्रत्येकाच्या पाठीवर दिलेली शाबासकी किंवा कोणत्याही कामाचे केलेले तोंडभरून कौतुक आणि त्यांचा विचार यामुळे स्व. मीनाक्षीताई आजही आपल्यातच आहेत, असे वाटते. अशा प्रेमळ, मातृतुल्य स्व. मीनाक्षीताई पाटील यांना त्रिवार लाल सलाम!

## निवडक

### रसायनीत महिलांसाठी विविध प्रशिक्षण शिबिर संपन्न

**रसायनी** : रसायनी परिसरातील तुराडे ग्रामपंचायतमधील महिलांसाठी नुकताच सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये महिलांना ब्युटी पार्लर व आर्थिक साक्षरता यांबाबत प्रशिक्षण देण्यात आले.ज्या महिलांना आपली कला व्यावसायिक दृष्टीने सादर करायची आहे, अथवा काहींना घरातूनच आपल्या कौशल्याने आर्थिक उत्पन्न निर्माण करायचे आहे. यांसाठी ओटीकर कंपनी, संहिता आणि स्पेरूल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व तुराडे ग्रामपंचायतीच्या सहकार्याने ग्रामपंचायत हद्दीतील महिलांसाठी ३० दिवसीयप्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले गेले. यामध्ये महिलांना ब्युटी पार्लरचे प्राथमिक प्रशिक्षण देऊन किट देण्यात आले. तर, आपली आर्थिक बचत कशी करावी, बचत केल्याचे फायदे, कोणकोणत्या माध्यमातून बचत करावी? अशा विविध मुद्यांच्या आधारावर आर्थिक साक्षरता प्रशिक्षणही यावेळी देण्यात आले. एकंदरीत या शिबिरासाठी तुराडे गाव, कष्टकरी नगर, मुकुंदवाडी, ठाकूरवाडी येथील एकूण ८० महिलांनी या शिबिरात सहभाग घेतला होता. सहभाग घेतल्याप्रकरणी महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



### उलवे येथील शाळेमध्ये जनजागृती

**नवीन पनवेल** : ईट प्ले रीड ऑर्गनायझेशन मार्फत उलवे शाळेमध्ये जनजागृती करण्यात आली. उत्साहवर्धक उपक्रमात, ईट प्ले रीड या ना-नफा संस्थेने निरोगी खाणे, आनंदी खेळ आणि उत्सुक वाचनाला नवीन उंचीवर नेण्याचे ध्येय हाती घेतले आहे. अलीकडेच, संस्थेने दैनंदिन जीवनात या महत्त्वाच्या घटकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी उलवेमधील शकुंतला रामशेठ ठाकूर शाळेला भेट दिली. टीमच्या सदस्यांनी तेथील विद्यार्थी व शिक्षक यांना एक सादरीकरण दिले. सादरीकरणाने केवळ सकस आहाराचे फायदे अधोरेखित केले नाहीत तर खेळाचा आनंद आणि उत्सुक वाचनाच्या परिवर्तनीय शक्तीवरही भर दिला. या संदेशांना बळकटी देण्यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये लक्षवेधी प्ले कार्ड आणि डायरीचे वाटप केले. ही सामग्री संस्थेच्या मूलभूत मूल्यांची दैनंदिन स्मरणपत्रे म्हणून काम करते आणि मुलांना त्यांच्या कल्याणासाठी सर्वांगीण दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रोत्साहित करते. ईट प्ले रीड टीमने पोहोचलेल्या मुलांचा आत्मविश्वास वाढला आहे.

## एनएमएमटीकडून पनवेलमधील
# प्रवाशांची अडवणूक!

| दीपक घरत |
| पनवेल ग्रामीण |

पालिका हद्दीतील खांदेश्वर रेल्वे स्थानक ते पनवेल रेल्वे स्थानकादरम्यानच्या मार्गांवर एनएमएमटीकडून ५९ क्रमांकाची बस सेवा सुरु आहे. एनएमएमटी प्रशासनाकडून या मार्गांवरील बसच्या संख्येत घट करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या मार्गांवर दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी फरफट होत आहे. बस सेवा पूर्ववत करण्यात यावी अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. तशा स्वरुपाचे मेल देखील काही प्रवाशांनी एनएमएमटी प्रशासनाकडे केले आहेत.



**पनवेल मनपा हद्दीत बस फेऱ्यांमध्ये कपात, खांदेश्वर-पनवेल रेल्वे स्थानक मार्गावर प्रवाशांची गैरसोय**

पनवेल महापालिका हद्दीत गाड्या वाढविणे ही आमची प्राथमिक जबाबदारी नसून, नवी मुंबई पालिका हद्दीत बससेवा सुरळीत ठेवण्याला आम्ही प्राथमिकता देत असल्याचे मत एनएमएमटी प्रशासनाचे महाव्यवस्थापक योगेश कडूसकर यांनी व्यक्त केल्याने प्रवाशांची होणारी गैरसोय सध्या तरी दूर होण्याची शक्यता धुसर झाली आहे. पालिकेच्या स्थापनेपूर्वीपासून नवी मुंबई पालिकेच्या परिवहन विभागाकडून पनवेल परिसरातील सिडकोने विकसित केलेला भाग आणि इतर विभागात सार्वजनिक परिवहन सेवे मार्फत बससेवा पुरवली जात आहे. सध्या एनएमएमटी मार्फत पनवेलमधील २३ वेगवेगळ्या मार्गिकांवर बससेवा पुरवली जात आहे. ही सेवा पुरवण्यासाठी एनएमएमटी विभागाला मोठा तोटा सहन करावा लागत असल्याची माहिती एनएमएमटी विभागाकडून देण्यात आली आहे. २०१६ साली स्थापित पनवेल पालिकेची स्वतःची परिवहन सेवा नसल्याने नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेला होणारा तोटा भरून काढण्यात पनवेल पालिकेने हातभार लावावा असे म्हणणे एनएमएमटी प्रशासनाचे आहे.

**एनएमएमटी अधिकाऱ्यांशी साधणार संपर्क**

खांदेश्वर रेल्वे स्थानक ते पनवेल रेल्वे स्थानक दरम्यान धावणाऱ्या बस सेवेवर परिणाम झाला असल्यास याबाबत एनएमएमटीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

> बस सेवेसाठी होत असलेला तोटा भरून काढण्यासाठी काही रक्कम पनवेल पालिकेने द्यावी अशी विनंती करण्यात आली आहे. स्वतःची परिवहन सेवा सुरु करण्यासाठी पालिकेचे प्रयत्न सुरु आहेत.या करता एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. एजन्सी कडून अहवाला प्राप्त होताच एनएमएमटी विभागाला होणारी तूट भरून द्यायची आणि ती किती द्यायची याचा निर्णय घेणे शक्य होणार आहे. – कैलास गावडे अधिकारी, पनवेल पालिका.

> नवी मुंबई पालिका हद्दी बस सेवा नियमित ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी आमची आहे.त्या मुळे तसे प्रयत्न आम्ही करत आहोत. पनवेल पालिका हद्दीत बस सेवा पुरवण्यासाठी होणारा तोटा भरून काढण्यात पनवेल पालिकेने सहकार्य करावे जेणे करून बस सेवा पूर्ववत करणे आम्हाला देखील सोयीचे होईल.
> – योगेश कडूसकर, महाव्यवस्थापक. एनएमएमटी

**स्वतंत्र परिवहन सेवेसाठी पनवेल पालिकेचे प्रयत्न**

२०१६ साली घोषित पनवेल पालिकेची स्वतःची परिवहन सेवा सुरु करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.या करता अहवाल तयार करण्यासाठी एजन्सीची नियुक्ती पालिकेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. एजन्सी कडून आलेल्या अहवाला नंतर एनएमएमटी विभागाला होणारी तूट भरून द्यायची आणि ती किती द्यायची याचा निर्णय घेणे शक्य होणार असल्याचे मत पनवेल पालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

## पनवेल-वलप रस्त्याची दयनीय अवस्था

**शेकापचा आंदोलनाचा इशारा**

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल-वलप रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून पाच दिवसाच्या आत कामाला सुरुवात केली नाही तर रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल असा इशारा शेतकरी कामगार पक्षाच्या माजी नगरसेविका प्रज्योती प्रकाश म्हात्रे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.



पनवेल-वलप रस्ता टेंभोडे गावासमोर तसेच पाले बुद्रुक आणि गणेशनगर गावाजवळ रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाला आहे. तसेच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य आहे. येथून प्रवास करताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागते. तसेच अनेक अपघातदेखील होत आहेत. याचा त्रास रस्त्यावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होत आहे. तळोजा एमआयडीसीला शॉर्टकट म्हणून तळोजात जाणारे अनेक कामगार या रस्त्याचा वापर करतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून रस्त्याची दुर्दशा झाल्याने त्याचा त्रास त्यांना होत आहे. पाच दिवसाच्या आत कामाला सुरुवात करावी आणि खड्डे बुजवावेत, अशी मागणी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे प्रज्योती प्रकाश म्हात्रे, माजी नगरसेविका, शेकाप यांनी केली आहे

> रस्त्यांसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत नागरिकांची कैफियत मांडण्याचा प्रयत्न केला. तसेच येथील खड्डे भरण्यासाठी त्यांना सूचित केले. रस्त्याचे पॅचेस सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे. काही दिवसात कामाला सुरुवात होणार आहे.
> – प्रज्योती म्हात्रे, माजी नगरसेविका

## वाळंजवाडीच्या वळणावरची साईडपट्टी जीवघेणी

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

कोलाडपासून सुतारवाडी पर्यंत रहदारीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असताना आता ठिकठिकाणीच्या रस्त्याच्या साईडपट्ट्या सुद्धा धोक्याचा इशारा देत आहेत. वाळंजवाडी रस्त्याच्या वळणावर असलेली साईडपट्टी अत्यंत धोकेदायक झाली आहे. या साईडपट्टीला मोठा भगदाड पडले आहे.



केंद्रीय मंत्री अमित शहा ज्यावेळी सुतारवाडी येथे आले होते. त्यावेळी या साईडपट्ट्या व खड्डे बुजविले गेले होते. मात्र आता या साईडपट्ट्यांनी आणि खड्ड्याने उग्ररूप धारण केलेले दिसत आहे.

नागरिकांची काहीच काळजी सार्वजनिक बांधकाम विभागाला नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. यावर्षी गणपती येऊन गेले सुद्धा तरी साईडपट्ट्या बुजवण्याचे धाडस सार्वजनिक बांधकाम विभागाने दाखविले नाही.

एखादा मोठा अपघात झाल्यावरच सार्वजनिक बांधकाम विभाग जागे होईल काय असा प्रश्न जनतेला पडलेला आहे.

**पर्यटकांमध्ये रस्त्यांबाबत नाराजीचा सूर | प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची मागणी**

# निदान चालण्यायोग्य तरी रस्ते बनवा!

| मुकुंद रांजणे |
| माथेरान |

नयनरम्य पर्यटनस्थळ आणि विशेष म्हणजे शांत वातावरण, शुद्ध हवा, प्रेमळ स्थानिक लोक तसेच पॉईंट्सवरील देखावे पाहण्यासाठी भटकंती करणाऱ्या पर्यटकांना माथेरानच्या लाल मातीच्या रस्त्यावरून पायी चालत जाण्याची हौस आजही यत्किंचितही कमी झालेली नाही. त्यामुळेच खासकरून असंख्य पर्यटक हे पॉईंट्सकडील लाल मातीच्या रस्त्यावरची सैर चालत चालत करण्यात धन्यता मानतात. यामुळे हे रस्ते निदान चालण्यायोग्य तरी बनवा, अशी



मागणी होत आहे.

जंगलातून मार्गक्रमण करताना एक वेगळाच आनंद, अनुभव त्यांना येत असतो. पावसाळ्यात पक्षांचा किलबिलाट, शुभ्र निर्झरांचा खळखळाट मनाला ताजेतवाने करतो. त्यासाठी वर्षाऋतुमध्ये सुध्दा पायी चालणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते.

दरवर्षी पावसाचे प्रमाण अधिक असते त्यामुळेच नगरपरिषदेच्या माध्यमातून जागोजागी मातीचे बंधारे टाकून पावसाळी पाणी गटारात जाण्यासाठी सोय केली जाते. काही ठिकाणी गटारांची साफसफाई झालेली नाही. ज्या-ज्या ठिकाणी बंधारे टाकण्यात आले आहेत

ते बंधारे कमकुवत असल्याने अतिवृष्टीमुळे पाणी रस्त्यावरून वाहते त्यामुळे रस्त्यांची पूर्णपणे दुर्दशा झालेली पहावयास मिळते. दगडधोंड्यांच्या या रस्त्यात चालणे जिकरीचे बनले असून अपघाताच्या घटनादेखील घडत असतात.

> पावसाळ्यात माथेरान याच ठिकाणी पायी चालत फिरण्याचा खूपच मनसोक्त आनंद मिळतो. सनसेट पॉईंटवरून येताना मॅलेट स्प्रिंग पॉईंटच्या चढणीवर आमच्या कुटुंबातील एका सदस्यांचा या दगडगोट्याच्या रस्त्यावर चालताना पाय मुरगळला.कसेबसे आम्ही रेल्वे स्टेशन पर्यंत पोहोचलो. इथले नैसर्गिक सौंदर्य खूपच सुंदर आहे फक्त इथले रस्ते सुस्थितीत असावेत. – आदिनाथ कापसे, पर्यटक मुंबई

> स्थानिक प्रशासनाने पेवर ब्लॉकचे रस्ते वगळून आवश्यक ठिकाणी टप्प्याटप्प्याने प्रेक्षनीय स्थळाकडे जाणाऱ्या मार्गांवरील डबर बाजूला करून पडलेल्या खड्ड्यामध्ये माती भरून खड्डे भरले तर बंगल्याकडे जाणाऱ्या माळी कामगारांना व निसर्गाचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांना या रस्त्यावरून चालण्यास सोयीचे होईल.कारण पॉईंटकडे जाणाऱ्या रस्त्यांची बिकट अवस्था असल्याने बहुतेक पर्यटक अर्ध्यातून माघारी फिरतात व त्यांचा हिरमोडही होतो.याचा स्थानिक प्रशासनाने गांभीर्याने विचार करायला हवा.
> –चंद्रकांत जाधव
> माजी उपनगराध्यक्ष माथेरान

### जवाहर नवोदय विद्यालयात सुवर्णसंधी

**रायगड :** पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर, तालुका माणगाव, जिल्हा रायगडच्या सत्र २०२६-२०२७ करिता इयत्ता अकरावी (विज्ञान शाखा) निवड परीक्षेचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २३ सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे. परीक्षा दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे होणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व परीक्षार्थी, पालक, सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन डॉ. प्रशांत राघमवार प्राचार्य ,जवाहर नवोदय विद्यालय, रायगड यांनी केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- नागावमधील होम स्टे/वाडी सांभाळण्यासाठी पर्मनंट जोडपे हवे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८२०६०९४५०.
- Teachers Required : Full Time/Part Time Teachers are to be appointed Subjects : Science, Maths, English. Std : 8th,9th. Job location : Alibag. Attractive Salary. Apply : shikshaknokri@gmail.com
- "जन्नावर हॉस्पीटल" अलिबाग-मध्ये कामसाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सरकारचेच कारस्थान?

आधी मराठ्यांनी आंदोलनाचा इशारा द्यायचा, मग जरांगे किंवा कोणीतरी आठ दिवस उपोषण करायचे, मग राज्य सरकारने काहीतरी तोडगा काढायचा, जरांगे यांनी विजय झाला असे म्हणायचे, त्या तोडग्याला विरोध म्हणून मग ओबीसींनी आंदोलनाला विरोध करायचा आणि या दरम्यान कोणीतरी कोर्टात जाऊन कोणत्याही बदलाची प्रक्रिया बंद पाडायची असे चक्र गेले जवळपास तीन वर्षे या राज्यात सुरू आहे. त्याचा ताजा अंक सध्या आपल्यासमोर चालू आहे. जरांगे यांच्या यंदाच्या उपोषणाचा शेवट हैदराबाद गॅझेट लागू करण्याने झाला. मराठ्यांचा मोठा विजय मिळाला, आमचे सरकारशी वैर संपले असे जरांगे यांनी जाहीर केले. पण मग ओबीसी संघटनांनी उचल खाल्ली. त्यांचे नागपुरात उपोषण चालू होतेच. जरांगे यांच्या उपोषणाकडे चुकूनही न फिरकलेले मुख्यमंत्री नागपुरात ओबीसींच्या भेटीला गेले. त्यानंतर त्यांचे उपोषण संपले. मात्र मागण्या चालूच राहिल्या. आता तर, छगन भुजबळ यांनी हैदराबाद गॅझेटबाबतचा जीआर मागे घ्या अन्यथा अराजक माजेल असा भयंकर इशारा दिला आहे. भुजबळ हे मंत्री असूनही असे कसे काय बोलू शकतात असे कोणी विचारण्याचा प्रश्नच येत नाही. कारण, लोकशाहीचे सगळे अर्थच बदलून गेले आहेत. ओबीसींच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून आणि मंत्रिमंडळासमोर विषय न ठेवताच सरकारने परस्पर हा निर्णय घेतला आहे असा भुजबळ यांचा आरोप आहे. एकीकडे आपल्याला फडणवीस यांच्याविषयी आदर आहे असे ते म्हणतात, पण दुसरीकडे विरोधी पक्षनेत्यासारखे ते सरकारवर घणाघाती आरोप करतात हे अजब आहे. अशा स्थितीत एक तर भुजबळांनी सरकारच्या निषेधार्थ पदाचा राजीनामा द्यायला हवा किंवा सरकारने तरी शिस्तभंगाची कारवाई म्हणून त्यांना काढून टाकायला हवे. पण राज्यात विरोधक अगदीच तुरळक असल्याने आता सरकारातील लोकांनी मुक्तपणे आपापली मते मांडायची व टीका करायची असा नवा पायंडा या निमित्ताने भाजपने सुरू केला आहे. खऱ्या प्रश्नांकडे लक्ष जाऊ नये म्हणून असल्या नाटकी कलगीतुऱ्यांमध्ये लोकांना व मिडियाला अडकवून ठेवण्याचे हे कारस्थान असावे असा संशय यामुळे येतो.

## हा संघर्ष आता थांबवा

वरवर पाहता भुजबळ सरकारच्या निर्णयाविरुद्ध टीका करीत असले तरी फडणवीस व भाजप यांना हवे तेच बोलत आहेत. जरांगे यांनी मुंबईत जे शक्तिप्रदर्शन केले त्यामुळे मराठ्यांसाठी काहीतरी केले असे दाखवणे फडणवीसांना भाग होते. त्याकरिता हैदराबाद गॅझेटचा तोडगा काढण्यात आला. आम्ही तेव्हा याच स्तंभात म्हटल्यानुसार त्या तो तोडगा म्हणजे निव्वळ धूळफेक होती. त्यातून मराठ्यांच्या हाताला काहीही नवीन लागले नाही. हैदराबाद गॅझेटमध्ये जिल्हा किंवा फार तर काही तालुक्यात मराठा किंवा कुणबी जातीचे हजार वा दहा हजार लोक आहेत अशी केवळ संख्या आहे. कोणाचीही नावे नाहीत. त्यामुळे मराठ्यांना त्याचा आधार मिळाला असे म्हणणे ही फसवणूक होती. मात्र या जीआरचा दुसरा भाग थोडा संदिग्ध होता. त्यानुसार कोणाही व्यक्तीने आपण १९६७ पूर्वीपासून याच गावात राहत असल्याचे प्रतिज्ञापत्र दिले व जुजबी काही पुरावे सादर केले तर गावपातळीवरची एक समिती त्याला कुणबी दाखला देऊ शकेल अशी तरतूद त्यात करण्यात आली आहे. यामुळे सरसकट सर्व मराठ्यांना कुणबी म्हणून दाखले मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे असा जरांगे यांचा दावा आहे. प्रत्यक्षात ते तितके सोपे आहे का हा प्रश्नच आहे. कारण, गावपातळीवरील समिती व आणि तिच्यावरची अपील समिती यांना कायद्याची चौकट ओलांडून जाता येणार नाही. कारण, नंतर ही प्रकरणे न्यायालयात जाऊन ताशेरे येऊ शकतात, दंड किंवा शिक्षाही होऊ शकते. तरीही काही गावांमध्ये सरसकट कुणबीकरण होण्याचा धोका नाकारता येत नाही. ओबीसींची भीती हीच आहे. पण याबाबत ठोस काहीही सांगण्याऐवजी दोन्ही बाजू आगीत तेल ओतल्याप्रमाणे रोजच्या रोज भरमसाठ वक्तव्ये करीत आहेत. यासाठी खरे तर गावपातळीवर सर्वजातीय पंचांची समिती स्थापन करून तिने या प्रक्रियेकडे लक्ष ठेवावे व पुरावे नसताना कोणालाही याचा फायदा घेऊ देऊ नये असे करता येऊ शकेल. पण सरकारला हा प्रश्न पेटता ठेवण्यातच अधिक रस आहे असे दिसते.

## वातावरण गढूळ

दरम्यान, हैदराबाद गॅझेटला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयात सादर झालेल्या आहेतच. या जीआरला स्थगिती मागण्यात आली आहे. ती मिळाली तर हा वाद ठप्प होईल. ती मिळाली नाही तर याचिकाकर्ते सर्वोच्च न्यायालयात जातील. तोवर इकडे शाब्दिक मारामाऱ्या चालू राहतील. मात्र यामुळे राज्यातील सामाजिक वातावरण विनाकारण गढूळ बनते. सध्या एकीकडे जरांगे, दुसरीकडे ओबीसींचे नेते म्हणवणारे गणेश हाके आणि तिसरीकडे गुणवंत सदावर्ते इत्यादी फूत्कार टाकत आहेत. त्यांची भाषा ऐकून आता तलवारी घेऊन फौजा लढायलाच निघणार आहेत असे कोणाला वाटावे. यामध्ये फडणवीस, अजितदादा आणि एकनाथ शिंदे सोईस्कररीत्या गप्प आहेत. जरांगे यांना देण्यात आलेल्या पहिल्या जीआरमध्ये पात्र कुणबींना दाखला द्या असा शब्द होता. तो नंतरच्या सुधारित जीआरमधून काढून टाकण्यात आला आहे. यामुळे सरसकट सर्वांना कुणबी प्रमाणपत्र व नंतर सर्व प्रकारचे आरक्षण मिळेल अशी भीती ओबीसींना वाटते. त्यातही राजकीय आरक्षणासाठीच ही सर्व धडपड चालू आहे असा अनेकांचा आरोप आहे. दुसरीकडे, हैदराबाद गॅझेटच्या जीआरमुळे काहीच नवीन मिळालेले नसल्याचा दावा बाळासाहेब सराटे, विनोद पाटील इत्यादी लोक करीत आहेत. ओबीसी समाजाच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी मराठ्यांना तर काहीच मिळालेले नाही असे म्हणत राहायचे व दुसऱ्या बाजूने जीआरचा फायदा उठवत राहायचे अशी ही दुहेरी रणनीती तर नाही ना अशी शंका घेण्यास वाव आहे. कारण, मराठा आरक्षणाच्या मागणीकर्त्यांमध्ये आजवर अशी फूट पडलेली नाही. त्यामुळे फूट पडल्याचे दाखवून ओबीसींमध्ये गोंधळ उडवून देण्याचा हा एक मार्ग असू शकतो. यामध्ये संभाजी ब्रिगेडने मात्र अत्यंत समतोल भूमिका घेतली आहे. मराठ्यांनी आर्थिक मागासांसाठीच्या म्हणजे इडब्ल्यूएसच्या दहा टक्के आरक्षणाचा अधिकाधिक फायदा घेण्यावर लक्ष केंद्रीत करावे असा सल्ला ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांनी दिला आहे. बाकीची कोणतीही आरक्षणे न्यायालयात टिकणे कठीण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ते खरेच आहे. मराठा समाजाला सध्या केंद्राचे इडब्ल्यूएस, राज्याचे एकनाथ शिंदे यांनी दिलेले एसईबीसी आणि कुणबी असल्याच्या दाखल्यांच्या आधारे ओबीसींमधील अशी तीन प्रकारची आरक्षणे उपलब्ध आहेत. न्यायालयात ते मराठ्यांच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. या स्थितीत राज्य सरकारने सर्वांना एकत्र करून सलोख्याचा मार्ग काढावा. अन्यथा, याचा कधीही भडका उडू शकतो.

विचार

# आरक्षणाच्या लढाईत नेमके किती यश?

**भागा वरखडे**

***मराठे लढाया जिंकतात, तहात हरतात असे म्हटले जाते. तेच मराठा आरक्षणाच्या लढाईत झाले. वस्तुतः शासकीय अध्यादेश म्हणजे कायदा नाही, याचे भान ठेवावे लागेल. सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीअगोदर मुत्सद्दीपणा दाखवून आंदोलनातून मार्ग काढला. अर्थात त्यामागे उच्च न्यायालयाचे ताशेरे आणि मराठा आंदोलकांची संघटनात्मक ताकद कारण असली, तरी ही लढाई अजून संपलेली नाही.***



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत पाच दिवस आंदोलन झाले. या आंदोलनाबाबत उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. आंदोलनामुळे लोकांची गैरसोय होत असली, तरी सरकारचे नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही, याची न्यायालयाला जाणीव नसावी. जरांगे पाटील यांनी फेब्रुवारी महिन्यातच पुढच्या आंदोलनाची दिशा सांगितली होती. जरांगे मुंबईत येईपर्यंत सरकारला त्यावर अध्यादेश काढता आला नाही का, हा जसा प्रश्न आहे; तसाच एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात खारघर येथे जरांगे यांच्या हाती सोपवलेल्या अध्यादेशाचे काय झाले, याचे उत्तर आता मिळाले पाहिजे. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कितीही सांगत असले, तरी मराठवाड्यातील मराठा समाजातील व्यक्तींना हैदराबादच्या गॅझेटच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र दिल्यानंतर ओबीसीतूनच आरक्षण द्यावे लागणार आहे. त्यामुळे ओबीसी समाज सरकारच्या या अध्यादेशाला उच्च न्यायालयात आव्हान देणार हे ओघानेच आले. कायद्याला आव्हान देता येते, अध्यादेशाला नाही असे कितीही सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मराठा आरक्षणाची लढाई अजून संपलेली नाही. घटनातज्ज्ञ आणि विधिज्ञ मराठा समाजाचे आरक्षण टिकवण्यासाठी एक तर आरक्षणाच्या टक्केवारीची मर्यादा उठवा किंवा ओबीसीतून आरक्षण द्या, अशी मागणी केली जात आहे; परंतु कोणताही समाजघटक नाराज होऊन त्याची परिणती मतांच्या गणितावर होऊ नये, याची काळजी सरकारने घेतली आहे. असे करताना मराठा समाजाच्या मागण्या पुर्णांशाने मान्य झालेल्या नाहीत.

न्यायालयात टिकणारे आरक्षण दिल्याचे मुख्यमंत्र्यांसह सर्वांनी सांगितले असले, तरी सरकारने आता वेळ निभावून नेली आहे, हे स्पष्ट दिसते. मराठा आरक्षणासंबंधी उपसमितीचे अध्यक्ष असलेल्या राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आलेल्या शिष्टमंडळाने आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्यावर आणि अध्यादेश दिल्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले. त्यानंतर मराठा आंदोलकांनी एकच जल्लोष साजरा केला. गुलाल उधळला; परंतु असाच गुलाल खारघरमध्येही उधळला होता, हे विसरून चालणार नाही. मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण देणे खरेच शक्य आहे का, सरकारने घेतलेला निर्णय कायदेशीर चौकटीत टिकणार आहे का, हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देता येईल का, मराठा आरक्षण देण्यासंदर्भात आणि टिकण्यासंदर्भात कोणकोणती आव्हाने आहेत असे विविध प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत आणि त्याची उत्तरे सरकारच्या अध्यादेशात मिळत नाहीत. कुणबी आणि मराठा एकच असल्याचा निर्णय मागे रत्नागिरी जिल्ह्यापुरता घेण्यात आला होता आणि तिथूनच ही मागणी सुरू झाली. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कुणबी असल्याचे प्रमाणपत्र काही जुन्या रेकॉर्ड्सनुसार मिळते; मात्र मराठवाड्यात तसे होत नाही. त्यामुळे त्यांना ती अडचण राहू नये, म्हणून सरसकट कुणबी म्हणूनच आरक्षण द्यावे, अशी मागणी जरांगे पाटील त्यांच्या सहकाऱ्यांनी केली होती. ती कायद्याच्या चौकटीत टिकण आरी नव्हती, असे सरकारचे म्हणणे होते. आरक्षण समूहाला नाही, तर व्यक्तीला कागदोपत्री पुराव्याच्या आधारे दिले जाते, हे म्हणणे आंदोलनकर्त्यांच्या गळी उतरवण्यास सत्ताधारी यशस्वी झाले.

मराठा आणि कुणबी सगळीकडे एकच समजून सरसकट आरक्षण द्या, या मागणीमुळे तांत्रिक प्रश्न आणि पेच निर्माण होतो आणि न्यायालय ही मागणी मान्य करत नाही. सामाजिक मागासलेपणाच्या निकषांमध्ये कुणबी समाज बसला, त्यामुळे त्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळाले. १९५२ पासून या विषयावर नेमण्यात आलेल्या सहा आयोगांपैकी तीन केंद्र सरकारचे आणि तीन राज्य सरकारचे होते. त्यांच्या अभ्यासात मराठा समाज मागासलेला नाही, असे म्हटले होते. त्यातील फक्त गायकवाड आयोगाने मराठा समाजाचे सामाजिक मागासलेपण सिद्ध केले आहे; परंतु डेटा विश्वासार्ह नाही, असा हवाला देत त्यांचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे आज जरी सरकारने आरक्षण देऊ केले असले, तरी पुढे ते न्यायालयात टिकवण्याचे आव्हान आहे. जरांगे पाटील यांनी हैदराबाद, सातारा आणि औंध गॅझेट लागू करण्याचा आग्रह धरला होता. त्यापैकी आता हैदराबाद गॅझेटचा स्वीकार करण्याचे सरकारने मान्य केले. आता सरकार मराठा समाजात फूट पाडण्यात यशस्वी झाल्याची पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाची भावना आहे. हैदराबाद गॅझेट लागू केले, तर मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण देता येईल. कारण १९१८ च्या निजाम शासनाच्या आदेशात मराठा समाजाची नोंद मागास म्हणून आहे. तेव्हा शिक्षण व नोकऱ्यांमध्ये निजामाने आरक्षण दिले होते. तेव्हाचे हैदराबाद गॅझेट आज कसे लागू करायचे व ते कायद्याच्या चौकटीत कसे बसवायचे हा पेच राज्य सरकारपुढे आहे. हैदराबाद गॅझेट लागू करताना राज्यघटनेतील तरतुदी आणि पाच मे २०२१ रोजीचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय याचा अभ्यास करावा लागेल. हा अभ्यास सरकारने गेल्या वर्षभरात का केला नाही, हा प्रश्नच आहे. मराठा आरक्षणासाठी ऐतिहासिक पुरावा आणि आधार म्हणून हैदराबाद गॅझेटचा संदर्भ दिला जातो. यानुसार 'इम्पीरियल गॅझेटीअर ऑफ इंडिया' या नावाचे एक डॉक्युमेंट आहे. यावर 'प्रोव्हिन्शियल सिरीज, हैद्राबाद स्टेट १९०१' असा उल्लेख आहे. हा एक ब्रिटिशकालीन दस्तावेज असून यात त्या वेळेच्या हैदराबाद स्टेटची जनगणना आहे. त्यात त्या वेळची शहरे, गावे, गावातील लोकसंख्या, त्यांची जनगणना, शहरातील वैद्यकीय, शैक्षणिक परिस्थितीची आकडेवारी, शहरातील शेती, नद्या अशा सर्व बाबींची विभागवार माहिती नमूद आहे. याचाच आधार किंवा संदर्भ घेतला जातो. त्या वेळी 'हैद्राबाद स्टेट'अंतर्गत औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी आणि उस्मानाबाद हे मराठवाड्यातील पाच जिल्हे अंतर्भूत होते. ब्रिटिशांच्या जनगणनेत जातींची नावे आणि लोकसंख्या नमूद केली आहे. यात मराठा, कुणबी या जातींचा उल्लेख स्वतंत्र नसून एकत्रित केला गेला आहे. म्हणून हैद्राबाद गॅझेटचा आधार घेतला जात आहे. गॅझेटियर लागू करा म्हणजे काय, तर त्या वेळी कुणबी म्हणून जी लोकसंख्या गणली गेली, ती लोकसंख्या ग्राह्य धरून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्या असा तो विषय आहे. वस्तुस्थिती सिद्ध करण्यासाठी पुरावे लागतात. त्यापैकी गॅझेटियर हा एक पुरावा होऊ शकतो; मात्र हा एकमात्र पुरावा कधीच होऊ शकत नाही. कारण यातून एवढेच सिद्ध करण्याचा प्रयत्न होईल, की मराठा आणि कुणबी एक आहेत. याव्यतिरिक्त ते खरोखर एक आहेत की नाहीत, हे अनेक सामाजिक संदर्भांसह पाहिले जात असते. कागदोपत्री पुरावे महत्त्वाचे असतात. जुन्या पुस्तकांमध्ये संदर्भ असतात किंवा संशोधकांनी केलेली कामे पाहिली जातात. त्याचा हा एक कागदोपत्री पुरावा आहे. सरकारने अध्यादेश काढला असला, तरी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार का, असा सवाल उपस्थित होत होता. मुख्यमंत्र्यांनी नाही म्हटले असले, तरी एकूण अध्यादेश आणि कागदपत्र पाहिली, तर कुणबी-मराठ्यांना ओबीसीमधूनच आरक्षण मिळणार असल्याचे स्पष्ट आहे. कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा या तीन वर्गांमध्ये हे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रमाणपत्रांची पडताळणी पूर्ण झाली की मराठ्यांना ओबीसीचे लाभ मिळणार आहेत. यामध्ये सरसकट मराठे येणार नाहीत, तर गरीब मराठे, अल्पभूधारक मराठे यांची सोय करण्यात आली आहे. तसेच त्रिसदस्यीय समिती ही गावपातळीवर असणार आहे. १९६७ च्या पूर्वीचे पुरावे असतील तर ते, अन्यथा एका शपथपत्रावर मराठ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. एवढी ही सोपी प्रक्रिया असली तरी ओबीसी समाजाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके तसेच ॲड. गुणरत्न सदावर्ते यांची प्रतिक्रिया पाहता आरक्षणाची लढाई अजूनही संपलेली नाही. जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ती जनरेटा आणि कायदेशीर मार्गाने लढावीच लागणार आहे.

चर्चा आजची

# शिक्षण विभागाने दिखावा थांबवावा

**वैभव पाटील**

अलिकडे सर्वत्र आलेली आधुनिकता शिक्षण संस्थांमध्येही आली. त्यामुळे शिक्षणाचा दर्जाही उंचावला. मात्र, आजच्या शिक्षण पद्धतीने ग्रामीण आणि शहरी विद्यार्थी अशी एक दरी निर्माण होत असल्याचे चित्र उभे राहत आहे. गुणवत्ता आणि बौद्धिक क्षमता असूनही त्यांना योग्य दिशा आणि ज्ञान मिळत नसल्याने जीवघेण्या स्पर्धेत ते नक्कीच कमी पडणार. शिवाय स्पर्धेत टिकायचे असल्यास आपल्या ज्ञानाची सामान्य पातळी गाठून सरशी करण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागणार हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिष्याची गरज नसावी. आपण या वर्गांमधून पास होऊन आलेलो असतानाही परत तोच सामान्य अभ्यास करण्याची वेळ आपल्यावर का येते, असा प्रश्न केल्यास, दर्जेदार शिक्षण न मिळाल्याचीच तक्रार बहुतेक जण करतील.

शिक्षक वर्ग व वातावरण याही बाबी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाच्या ठरतात. मात्र अलिकडे शिक्षक व प्राध्यापकांच्या नेमणुकाच गुणवत्तेनुसार न होता लक्ष्मीच्या जोरावर होत असल्याने कुठली आली गुणवत्ता? महागाईची झळ सर्वसामान्यांना नकळत बसत आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. या महागाईचा फटका सर्वसामान्यांना कायमच बसत आला आहे. त्यात शासनाने स्काऊड गाईडच्या गोंडस नावाखाली विद्यार्थ्यांना अनुदानाच्या स्वरुपात तीनशे रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय कौतुकास्पद असला, तरीदेखील महागाईमध्ये तीनशे रुपयांमध्ये साधा कापड घेणेदेखील परवडत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शासनाने गांभीर्याने विचार करून गणवेशाच्या अनुदानात वाढ करावी अशी मागणी होत आहे. शिक्षण विभागाने दिखावा थांबवावा अशी प्रतिक्रिया जनमानसात उमटत आहे.

जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या स्काऊट गाईडचा गणवेश देण्याचा दिखावा शिक्षण विभागाने केल्याचा प्रकार समोर येत आहे. एका गणवेशसाठी तीनशे रुपये अनुदान देण्याची हालचाल सुरु झाली आहे. सध्या महागाईच्या जगतामध्ये कापडाची किंमतच तीनशेहून अधिक रुपये असून त्याचा शिलाई खर्च तीनशेपेक्षा अधिक आहे. त्यामुळे तीनशे रुपये अनुदान देऊन विद्यार्थ्यांची थट्टाच केली जात असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच शिस्त रहावी. एक जागृत नागरिक निर्माण व्हावे, शालेय स्तरापासूनच वाहतूकीच्या नियमांची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी. जिल्हा परिषद शाळेबाबत गोडी अधिक निर्माण व्हावी यासाठी शिक्षण विभागाने जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी स्काऊड गाईड गणवेश देण्याचा निर्णय घेतला. रायगड जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या दोन हजार ५०१ शाळा आहेत. या शाळांमध्ये ८७ हजार ९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेत पाच हजार ८८८ शिक्षक असून त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले जात आहे. शाळेतील विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी शाळांमध्ये दप्तराविना शाळा सारखे उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासबरोबरच बौध्दीक व शारिरीक विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. विद्यार्थ्यांना वाहतूकीच्या नियमांची माहिती मिळावी. त्यांना शालेय स्तरापासूनच शिस्त राहवी. एक जागृत नागरिक निर्माण व्हावेत यासाठी शिक्षण विभागाने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गणवेश देण्याचा निर्णय घेतला. गतवर्षापासून हा उपक्रम हाती घेतला. गेल्या वर्षी कापड देण्याचा प्रयत्न केला होता. परंतू स्काऊटचा कापडच शाळांपर्यंत पोहचला नाही. त्यामुळे ही योजना बारगळली होती. यावर्षी कापडऐवजी थेट गणवेशासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला.

अनुसुचित जाती, जमाती मागासवर्ग व सर्वसाधारण मुलांसह सर्व वर्गातील मुली अशा एकूण ९८ हजार ५७२ विद्यार्थ्यांसाठी तीनशे रुपये प्रमाणे दोन कोटी ५७ लाख एक हजार ६०० रुपयांचा निधी शासनाकडून जिल्हा परिषद शिक्षण विभागाला पाठविण्यात आला. यामध्ये जिल्हा परिषद शाळांसह नगर परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा देखील समावेश आहे. हा निधी तालुका स्तरावर ऑगस्ट महिन्यात वितरीत करण्यात आला असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून प्राप्त झाली आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी स्काऊडचा उपक्रम कौतूकास्पद आहे. या उपक्रमाचे जिल्हा भरातून स्वागत करण्यात आले आहे. परंतु स्काऊडच्या गणवेशासाठी लागणारा अनुदान तुटपूंजा असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. त्यामुळे शिक्षकांवर आर्थिक बोजा बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. महागाईत अनेक वस्तूंच्या किंमती वाढल्या आहेत. कापडच्या किंमतीही भरमसाठ वाढल्याने सर्वसामान्यांना कापड खरेदी करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यात शिक्षण विभागाकडून स्काऊड गणवेशासाठी तीनशे रुपये अनुदान देऊन विद्यार्थ्यांची थट्टाच केल्याचे चित्र आहे. दर्जेदार कापडासाठी या अनुदानात वाढ करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

लोकसंसद

## ३० वर्षे उलटूनही 'बॉम्बे बॉम्बे' सुरूच

एका खाजगी मनोरंजन वाहिनीवरील मुलाखतीच्या कार्यक्रमात 'मुंबई'चा उल्लेख सातत्याने 'बॉम्बे' 'बॉम्बे' करण्यात आल्याने 'बॉम्बे'चा मुद्दा परत ऐरणीवर आला आहे. ४ मे १९९५ रोजी महाराष्ट्र शासनाने ठराव केल्यानंतर ६ मार्च १९९६ रोजी केंद्र सरकारची अधिकृत मान्यता मिळून या शहराचे नाव इंग्रजीसह सर्व भाषांमध्ये 'मुंबई' असे झाले. मात्र ३० वर्षांचा प्रदीर्घ काळ उलटला तरी अजूनही काही लोंकाच्या मनातील 'बॉम्बे'चे भूत उतरलेले नाही हे वास्तव आहे. विशेषतः मुंबईतील बॉलिवूडवाले. क्रिकेटचे काही समालोचक आणि समाजातील स्वतःला प्रतिष्ठित समजणारे इतर तथाकथित उच्चभ्रू लोक जाणीवपूर्वक मुंबईचा उल्लेख 'बॉम्बे' असा करतात. चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू, पुदुचेरी अशा बदललेल्या नावांचा सहजतेने उल्लेख करणारे हे लोक मुंबईचा उल्लेख मात्र 'बॉम्बे' करतात तेव्हा साहजिकच महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या आणि मुंबादेवीच्या नावाने प्रसिद्ध झालेल्या 'मुंबई' या मूळ नावासाठी प्रदीर्घ लढा देणाऱ्या मराठी जणांना वेदना होणारच. विशेष म्हणजे मुंबईत अजूनही 'बॉम्बे' हॉस्पिटल, आयआयटी 'बॉम्बे', 'बॉम्बे' स्टॉक एक्सचेंज अशा अनेक ठिकाणी 'बॉम्बे' अस्तित्वात असल्यामुळे 'बॉम्बे'चे भूत या लोकांच्या मनातून सहजासहजी उतरणार नाही, हेच खरे!

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, मुंबई**

## नेपाळमधील अराजकाचा भारतासाठी धडा

नेपाळमध्ये सध्या उसळलेले अराजक बेरोजगारीचे थेट दुष्परिणाम आहेत. शिक्षित तरुणांच्या हातात काम नसल्याने ते मोबाईलवरील ॲप्समध्ये रमले. सरकारने त्यावर बंदी घातली आणि दडपलेल्या असंतोषाचा स्फोट झाला. नेत्यांच्या संपत्तीचे आगीच्या भक्ष्यस्थानी जाणे हे जनतेच्या संतापाचेच द्योतक ठरले. यातून धडा स्पष्ट आहे बेरोजगारी हा समाजातील अस्थिरतेचा खरा पाया आहे. हाताला काम असेल तर तरुणाईची ऊर्जा राष्ट्रनिर्मितीकडे वळते; पण बेरोजगारीमुळे तीच ऊर्जा अराजकात रूपांतरित होते. भारतामध्ये परिस्थिती वेगळी आहे. येथे डिजिटल क्रांती, स्टार्ट-अप्स, सेवा क्षेत्र, औद्योगिक गुंतवणूक यामुळे रोजगाराच्या संधी वाढत आहेत. मात्र, सध्याच्या सरकारने निवडणूकपूर्व जाहीरनाम्यात दिलेल्या रोजगारनिर्मितीच्या आश्वासनांची प्रामाणिक पूर्तता करणे तितकेच आवश्यक आहे. यासोबतच नेत्यांनी आपल्या श्रीमंतीचे ओंगळवाणे प्रदर्शन टाळले पाहिजे. अन्यथा बेरोजगार तरुणांच्या डोळ्यांसमोर संपत्तीचे मिरवणे हे नेपाळप्रमाणेच संतापाला आमंत्रण देणारे ठरेल.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# स्वर्गीय मीनाक्षी ताईंच्या आठवणी आजही चिरंतर

**हरिश्चंद्र महाडिक**



स्व. मीनाक्षीताई पाटील यांना मी सन १९७५ सालापासून पाहत आलो. रणरागिणी, करारी बाणा, धारदार शब्दफेक, मनमिळावू स्वभाव या गोष्टींमुळे ताईंनी लहान थोरांपासून अनेकांना आपलेसे केले. माझे शिक्षण इयत्ता पाचवी पासून बारावी पर्यंत ना.ना. पाटील हायस्कूल पोयनाड येथे झाले.

१९८४ मध्ये ना.ना. पाटील हायस्कूलच्या आवारामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालयाची स्थापना झाली.

मला शिक्षक होण्याची इच्छा होती. मी ताईंना भेटून माझी इच्छा व्यक्त केली. ताईंनी लगेच भाऊंना म्हणजेच प्रभाकर पाटील यांना सांगून माझा डीएडला नंबर लावला. १९८६ मध्ये मी डी एड झालो. त्यानंतर पुन्हा ताईंची भेट घेतली. ताईंनी शाबासकीची थाप दिल्यानंतर सांगितले की, तू मला उद्या येऊन भेट. ताईंनी त्वरित बी. डी. कुंभार सरांना माझ्या नेमणुकीबाबत सांगितले. बी. डी. कुंभार सर त्यावेळी पिरोज बाई. प्राथमिक शाळा पेझारी पोयनाडचे व्यवस्थापक होते. विशेष म्हणजे ते मला दहावीला गणित विषय शिकवत होते. त्यांनी मला बोलावून घेतले आणि म्हणाले की तू उद्यापासून शाळेवर हजर हो. त्यावेळी माझा आनंद गगनात मावेनासा झाला. मी ताईंना भेटण्यासाठी त्यांच्या पेझारी येथील बंगल्यावर गेलो असता ताई झोपाळ्यावर विश्रांती घेत होत्या. मला पाहताच त्या म्हणाल्या, अरे तू कुंभार सरांना जाऊन भेट. मी ताईंना म्हणालो, ताई मला उद्यापासून बोलावले आहे मी तुमचा आशीर्वाद घ्यायला आलो आहे. ताईने आशीर्वाद दिला खूप मोठा व आदर्श शिक्षक हो. ताईंच्या आशीर्वादामुळे मी सण २०१२ ला आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त केला. काही दिवसांनी मी पुन्हा ताईंना भेटण्यासाठी गेलो आणि ताईंना म्हणालो. ताई मला आपल्या दैनिक कृषीवलमध्ये लिहिण्याची फार इच्छा आहे. मी नोकरी सांभाळून हे करेन. ताईंनी याही गोष्टीला लगेच होकार दिला आणि मला दैनिक कृषीवल मधून लिहिण्याची प्रथमच संधी मिळाली. त्यावेळी दैनिक कृषीवल हा छोटेखानी अंक पेझारी नाक्यावरील नागेश ऑफसेट मध्ये छापला जायचा. या वृत्तपत्रांमध्ये लिहिणारे मातब्बर मंडळी होती. म. ना. पाटील, प्राध्यापक शंकर सखाराम पाटील, कवी जगदीश बंधू, अशी मंडळी होती. माझा पत्रकारितेतील प्रवास हा प्रथम दैनिक कृषीवल मधून सुरू झाला हे मी मोठ्या अभिमानाने सांगतो. माझा शिक्षकी पेशा सांभाळून मी आवड म्हणून पत्रकारिता क्षेत्रामध्ये उतरलो. दैनिक कृषीवलमध्ये उत्कृष्ट पत्रकार म्हणून माझा पहिला सन्मान केला. त्यानंतर अनेक पत्रकारितेमध्ये पुरस्कार मिळत गेले. पत्रकारितेमध्ये स्कॉलरशिप मिळाली. हे सर्व श्रेय मी मीनाक्षीताई पाटील यांना देतो. प्रेमळ आणि हुशार व्यक्तिमत्व असलेल्या मीनाक्षीताई पाटील या राजकारणामध्ये मंत्री झाल्यानंतर त्यांना मिळालेल्या मंत्रिमंडळातील खात्यामध्ये त्यांनी रायगड जिल्ह्याची जबाबदारी अगदी व्यवस्थित सांभाळली नुसता रायगड जिल्हा नाहीतर संपूर्ण महाराष्ट्राची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली. त्या जरी राज्यमंत्री झाल्या तरी त्यांना कोणत्याही प्रकारचा गर्व झाला नव्हता. त्यांची राहणी ही साधीच होती. माणुसकी आणि प्रेमळ स्वभाव हा त्यांनी शेवटपर्यंत तसाच ठेवला. ताईंना माझा शतशः प्रणाम.

# अग्निशमन यंत्रणा कात टाकणार

## ● चार अग्निबंबांसह ५५ मीटरची शिडी लवकरच होणार दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेच्या हद्दीतील अग्निशमन यंत्रणेची सुधारणा करण्यासाठी पालिका प्रशासनाने विविध पावले उचलली आहेत. सध्या महापालिकेकडे तीन अग्निशमन केंद्रे आहेत, परंतु वाढत्या लोकसंख्येच्या मागणीनुसार आणि नवीन गृहप्रकल्प उभारणीच्या पार्श्वभूमीवर खांदेश्वर स्थानकाजवळ नवीन अद्ययावत अग्निशमन केंद्र उभारण्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. याशिवाय चार नवीन अग्निवंब आणि ५५ मीटर उंचीची शिडी लवकरच महापालिकेकडे दाखल होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या स्थापनेपूर्वी येथे एकच अग्निशमन केंद्र होते. नंतर सिडको वसाहतींचे हस्तांतरण पालिकेकडे झाल्यानंतर नवीन पनवेल आणि कळंबोली येथील अग्निशमन केंद्रही पालिकेकडे आले.



सद्यः स्थितीत पालिकेकडे तीन केंद्रे असून, १३५ कर्मचारी अग्निशमन यंत्रणेच्या कार्यासाठी तैनात आहेत. नवी मुंबई विमानतळाच्या कामांमुळे कामोठे, कळंबोली, तळोजा, रोहिंजन, घोटगाव, नावडे आणि खारघर परिसरात गृहप्रकल्पांची उभारणी सुरू आहे. यामुळे भविष्यात आग प्रतिबंधक यंत्रणांची कार्यक्षमता वाढविणे गरजेचे आहे. खांदेश्वर स्थानकाजवळील नवीन केंद्र उभारून या भागातील नागरिकांना तत्काळ अग्निशमन सेवा उपलब्ध करून देण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.

सिडकोने उभारलेली नवीन पनवेल आणि कळंबोली येथील अग्निशमन केंद्रे सुमारे ४० वर्षे जुनी आहेत. या केंद्रांच्या इमारत जीर्ण झाल्याने नव्याने बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> **भागांत नवीन गृहप्रकल्प उभारले जात असून, लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात भर पडली आहे. पालिका आयुक्त मंगेश चितळे आणि उपायुक्त कैलास गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठ्यात लवकरच नवीन अद्ययावत अग्निशमन केंद्र उभारले जाणार आहे. तसेच तळोजा घोट परिसरात अग्निशमन केंद्र उभारण्याचा पालिकेचा मनोदय आहे.**
> **-प्रवीण बोडके, मुख्य अग्निशमन अधिकारी, पनवेल महापालिका**

## सुतारवाडीतील कल्याणी- स्वप्निल यांची मुंबई पोलीस दलात निवड

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**



रोहा तालुक्यातील सुतारवाडी या ग्रामीण भागातील कल्याणी काशिनाथ मानकर, आणि स्वप्निल सुधीर घाडगे यांची पोलीस दलात कॉन्स्टेबलपदी नियुक्ती होऊन ते आपले कर्तव्य पार पाडत आहेत. याचा संपूर्ण गावाला अभिमान आहे. कल्याणी ही सध्या घाटकोपर येथे झोन ७ एस. बी आय. या विशेष शाखेमध्ये कार्यरत असून स्वप्निल हा राज्यमंत्री सदा सरवणकर यांच्या येथे कार्यरत आहे. तिने द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडी येथे दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण करून ती पुढे शिकली आणि पोलीस दलातील प्रशिक्षण घेतले. घरात तीन बहिणी आई वडील आणि एक भाऊ सामान्य परिस्थितीत असताना मोठ्या कष्टाने चिकाटीने, लहानपणापासूनचे पोलीस होण्याचे स्वप्न साकार केले. स्वप्निल यांनी ही प्रतिकूल परिस्थितीत सुतारवाडी हायस्कूलमध्ये आपले दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षण घेऊन पोलीस दलातील अवघड प्रशिक्षण पूर्ण करून आपले स्वप्न पूर्ण केले.

## शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**




कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना सतावत असलेल्या पिकांवरील विविध प्रकारचे कीड यांचा प्रतिबंध करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात तालुक्यातील ३५० हुन अधिक शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप करण्यात आले. नागपूर येथील हिल इंडिया लिमिटेड आणि रायगड जिल्हा किसान क्रांती संघटना यांच्या माध्यमातून या शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्यातील नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह येथे शेतकरी प्रशिक्षण आणि सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन किसान क्रांती संघटनेचे संस्थापक टी.एस. देशमुख, डॉ. सतीश ढोके, वंदना शिंदे, सुशांत पाटील, उत्तम शेळके, डी. डी. सोनवणे, राजाराम शिंदे, सुनील निंबाळकर, बुद्धभूषण मुनेश्वर, महेश विरले, शिवनाथ बाबा आदी मान्यवर उपस्थित होते. शेतकरी मेळाव्यात उपस्थित असलेल्या ३५० हुन अधिक शेतकऱ्यांना शेती पूरक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, मंडळ कृषी अधिकारी कर्जत दिनेशकुमार कोळी, पद्मावती गायकवाड, प्रमिला मसराम, चंद्रकांत मिस्तरी, प्रमोद बागडे आदींनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामदास माळी,भाऊ खानविलकर, शरद तवले, अनिल गवळे,सचिव एकनाथ शेळके, रवींद्र जाधव, सुरेश राणे,काशिनाथ धुळे,पंढरीनाथ दाभाडे, साधुरं पाटील, सुरेश जाधव, अरुण शेळके मदत केली.

## पर्यटकाची चारचाकी अडकली समुद्रकिनारी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**



रेवदंडा समुद्र किनाऱ्यावर पुन्हा एकदा पर्यटकांच्या बेफिकीरपणामुळे खळबळजनक प्रकार घडला. भरतीच्या वेळी समुद्राच्या वाळूत चारचाकी घेऊन जाण्याच्या निष्काळजीपणामुळे गाडी पुळणीत रुतली. घटनेची माहिती मिळताच रेवदंडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन स्थानिकांच्या मदतीने गाडी सुखरूप बाहेर काढली. मात्र, अशा बेफिकीर वर्तनाला वाव न देता चालक यश मेहता याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल गव्हाणे करीत आहेत.

रेवदंडा समुद्रकिनारी अशा घटना आता वारंवार घडू लागल्या आहेत. पर्यटक निष्काळजीपणे गाड्या वाळूत उतरवतात त्यामुळे गाड्या रुतून बसतात आणि मग पोलीस व स्थानिकांना जीव धोक्यात घालून त्या बाहेर काढाव्या लागतात. किनाऱ्याकडे जाणाऱ्या मार्गावर कुठेही 'धोक्याची सूचना' नाही, ना सावधानतेचे बोर्ड आहेत. पोलीस गस्त अभावानेच दिसते. जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप करून समुद्रकिनारी अशा घटना रोखण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी अशी जनतेची जोरदार मागणी आहे.

## नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

प्रेषित मोहम्मद सर्वांसाठी अंधांना दृष्टी मिळवून देणे हि समाज सेवी भावना नजरेसमोर ठेऊन उम्मत-ए मुस्लिम कमिटी माणगाव व लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार (दि.१६) सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत शासकीय विश्रामगृह जुने माणगाव या ठिकाणी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरजू व्यक्तींनी घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी उम्मत-ए मुस्लिम कमिटी माणगावचे अकबर परदेशी, इस्माईल पालेकर, अल्ताफदादा धनसे, बशीर करदेकर, सरफराज अफ़वारे, गुलजार खान, शादाब गैबी, शहानवाज अत्तार, फहद करबेलकर, बशीर करेल, शहाजान जलगावकर, मन्सुर मुकादम, सिराज अफ़वारे, सुहेब परदेशी, इरफान हाजीते, नदीम परदेशी, रिहान मुल्ला, आदिल गजगे, फहीम वाडेकर, मुसद्दीक जिलानी, मुन्ना येश्वीकर, हाफिज आमिर नदाफ, अफाक दांडेकर, मुस्तूफा वाडेकर, वसीम सनगे व सहकारी परिश्रम घेत असून अधिक माहितीसाठी आयोजकांकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## नागाव-चौल मंडळातील गावांमध्ये शिवार फेरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवाडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिन १७ सप्टेंबर पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोबरपर्यंत हा पंधरवाडा राज्यभर राबवण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करून पारदर्शक व जवाबदार प्रशासन उभारणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.या मोहिमेअंतर्गत कामकाज तीन महत्त्वाच्या टप्प्यांत पार पाडले जाणार आहे.

पहिला टप्प्यांत पाणंद व शिवरस्त्यांचे सर्वेक्षण, क्रमांक देणे, नोंदी व मोजणी. टप्प्यात सर्वांसाठी घरे योजनेसाठी उपलब्ध सरकारी जमीन कब्जेहक्काने वाटप, अतिक्रमणे नियमित करणे व पात्र लाभार्थ्यांना पट्टे प्रदान करणे. तिसरा टप्प्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गरजेनुसार नाविन्यपूर्ण उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या अभियानाचा भाग म्हणून नागाव व चौल मंडळातील सर्व सजेतील महसुली गावांमध्ये शिवार फेरी आयोजित करण्यात आली. यावेळी गावपातळीवरील समस्या ऐकून त्यावर त्वरित तोडगा काढण्यावर भर देण्यात आला आहे.

> **लोकांच्या सेवेसाठी प्रशासन तत्पर**
> शासनाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा मिळणार असून सेवा पंधरवाडा हा शासन व जनतेतील संवाद अधिक मजबूत करणारा ठरणार आहे.

## व्हिडिओ वेडिंग वर्कशॉपचे आयोजन

**महाड** : रायगड फोटोग्राफर ॲण्ड व्हिडिओग्राफर असोसिएशन व महाड फोटोग्राफर ॲण्ड व्हिडिओग्राफर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सिनेमॅटिक व्हिडिओ वेडिंग वर्कशॉपचे आयोजन (दि.१७) सप्टेंबर रोजी हॉटेल पी. जी. सिटी, महाड येथे सकाळी १०.३० ते सायं. ५ या वेळेत होणार आहे. वर्कशॉपमध्ये निकॉन क्रिएटर राजन झिंगाडे हे मार्गदर्शन करणार असून, टेक्निकल डेमो सेशन, हँड्स ऑन एक्सपिरीयन्स, प्रश्नोत्तरे तसेच कॅमेऱ्यांचे ॲक्सेसरी सेशन होणार आहे. पहिल्या ५० सभासदांना प्राधान्य दिले जाणार आहे.

### कार्यशाळेला सरपंच, सदस्यांसह ग्रामविकास अधिकाऱ्यांची उपस्थिती

## ग्रामपंचायतीला पारितोषिके मिळविण्याची संधी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**




राजकीय कारकिर्दीत अनेक सरपंच, सभापती, जिल्हा परिषद सदस्य व आमदार पाहिले. मात्र, जनतेचा विकास साध्य झाला नाही तर पदाचा कालावधी वाया जातो. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानामुळे ग्रामपंचायतीच्या विकासासोबतच मोठया रकमेची पारितोषिके मिळविण्याची संधी प्राप्त झाली असून ग्रामपंचायतींनी या संधीचा लाभ घेऊन गावासाठी लोकसहभागातून मोठमोठया रकमेच्या बक्षिसांमधून विकासकामे करण्याची संधी साधावी, असे आवाहनजिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी केले.

प्रारंभी गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी प्रास्ताविकामध्ये कार्यशाळेचा हेतू विषद केला. पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान तालुकास्तरीय कार्यशाळेला सरपंच, उपसरपंच तसेच सदस्यांसह ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यशाळेप्रसंगी चंद्रकांत कळंबे बोलत होते. याप्रसंगी सुमन कुंभार, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, गटशिक्षण अधिकारी सुभाष साळुंखे, गोविंद फड, हंबीर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

अभियानांतर्गत लोकाभिमुख पंचायत, नागरी सेवा सुविधा केंद्र चर्चा, तक्रार निवारण, ग्रामपंचायत वेबसाईट, सीसीटीव्ही बसविणे, लेखापरीक्षण करणे, ग्रामविकास समित्या स्थापन करणे, आयुष्मान भारत कार्ड व लाभार्थी, अनिवार्य बाबींवरील तरतूद आणि खर्च, दिव्यांग ओळखपत्र, कर व पाणीपट्टी वसुली, क्यूआर कोड वापर, लोकवर्गणी, स्वच्छ व हरित गांव अंतर्गत पिण्याच्या पाण्याचे स्रोत बळकटीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, अपारंपारिक ऊर्जा व सौर उर्जा वापर, वृक्षलागवड व संवर्धन, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची २ ऑक्टोबरपासून प्रभावीपणे अंमलबजावणी, प्लास्टिक बंदी, जातीचे दाखले, लोकसहभाग व श्रमदानातील कामे, आदी निकषांचे स्पष्टीकरण उपगटविकास अधिकारी हंबीर यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर उतेकर यांनी केले.

> **योजनांचा गावाला लोकसहभागातून सक्रीय करण्याची संधी मिळाली आहे.या संधीचा लाभ घेऊन गावासाठी लोकसहभागातून मोठमोठया रकमेच्या बक्षिसांमधून विकासकामे करण्याची संधी साधावी.**
> **-चंद्रकांत कळंबे रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१३ सप्टेंबर**

१) श्री.पुरूषोत्तम गोविंद पाटील वरसोली, अलिबाग १३-०९-१९२९
२)श्री.कमलाकर लक्ष्मण पाटील मु.झिराड, अलिबाग, १३-०९-१९४२
३)श्रीम.शैला सुहास सबनीस ठिकरूळ नाका, अलिबाग, १३-०९-१९५१

## सुवर्णकण



**विठ्ठल भक्त संत जनाबाई यांच्यावर देवाच्या गळ्यातला हार चोरल्याचा आरोप झाला त्यावेळी तिला शिक्षा म्हणून सुळावर देण्याचे ठरविण्यात आले होते त्यावेळी सुळाचे प्रत्यक्ष पाणी झाले पंढरपूरच्या विठ्ठल यांनी तिची लाज राखली.**

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## 'पोस्ट ऑफिस सुरू करा'

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

शिळफाटा येथील पोस्ट ऑफिस पावसाळ्यात पाण्याच्या गळतीमुळे बंद करण्यात आलेले असून आजूबाजूच्या ग्रामीण भागातील नागरिकांना खोपोली शहरात पोस्टातील कामे करण्याकरिता जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. शिळफाटा येथील पोस्ट ऑफिस सुरू करा अन्यथा आंदोलन करावे लागेल असा इशारा आम आदमी पार्टी पक्षाने निवेदनाद्वारे दिला आहे. शिळफाटा येथील पोस्ट ऑफिस हे मागील चार महिन्यापासून बंद आहे व त्यामुळे सर्व नागरिकांना प्रचंड प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे या पोस्ट ऑफिसमध्ये सर्वासामान्य जनतेची महिना साठवण व अन्य शासनाच्या योजनांचे मिळणारे फायदे याच पोस्ट ऑफिसमध्ये आहेत त्यामुळे सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहेत तरी सदर पोस्ट ऑफिस तातडीने सुरू न झाल्यास आंदोलन केले जाईल असे आम आदमी पार्टी प्रदेश संघटन सचिव डॉ. रियाज पठाण यांनी सांगितले आहे.

## दुकानातून कोरडा गांजा हस्तगत

**पनवेल** : पनवेल तालुका पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत खेरणे गाव कमानी जवळील एका दुकानातून हजारो रुपये किंमतीचा बेकायदेशीररित्या विक्रीसाठी ठेवलेला गांजा हस्तगत केला असून या प्रकरणी दोघा जणांना अटक करण्यात आली आहे. तालुक्यातील खेरणे गाव येथील एका दुकानात बेकायदेशीररित्या गांजा ठेवून त्याची विक्री होत असल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे, सपोनि अनिरुद्ध गिजे, पोउपनि हर्षल राजपूत, सुभाष डिघे, पो.हवा. धुमाळ, तांडेल, कुदळे, बाबर, देवरे, म्हारसे, पो.शि. भगत, खताळ आदींच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून छापा टाकला असता तेथील दुकानात जवळपास २१ हजार रुपये किंमतीचा ११७० ग्रॅम वजनाचा उग्र वासाचा कोरडा गांजा तसेच इतर वस्तू असा मिळून २२ हजार ६३० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून याप्रकरणी अभिषेक शर्मा (२४ रा.वावंजे) व राहूल सावळे (२२ रा.वावंजे) या दोघांना ताब्यात घेतले असता त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या गुन्ह्यात सहभागी असलेल्या एका आरोपीचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

# निवडक

## विमानतळ नामकरणासाठी उपोषण



**पनवेल** : आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बांचे नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्राकडे पाठवला आहे. या ठिकाणी विमान सेवा सुरू होण्याच्या मार्गावर आहे. तरीसुद्धा नाव देण्याबाबत कोणत्याही हालचाली दिसत नसल्याने. ४ ऑक्टोबरपासून शेकापक्षाचे नेते अनिल ढवळे यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम जवळपास पूर्णत्वास आले आहेत. लवकरच याचा ताबा विमानतळ प्राधिकरणाकडे देऊन सर्व सोपस्कार केल्यानंतर विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. या विमानतळाला दि.बांचे नाव देण्यासंदर्भात राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्ताव पाठवला आहे. परंतु अद्यापही याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. यासंदर्भात भिवंडीचे खा. सुरेश उर्फ बाळ्या मामा यांनीही लोकसभेमध्ये आवाज उठवला होता. परंतु याविषयी कार्यवाही झालेली नाही. या मागणीसाठी ४ ऑक्टोबरपासून चिंचपाडा सर्कल येथील मोकळ्या जागेत शेकापक्षाचे नेते अनिल ढवळे आमरण उपोषण करणार आहेत. या आशयाचे पत्र त्यांनी प्रशासनाला दिले आहे.



## माणगाव पतसंस्थेची सभा उत्साहात

**माणगाव** : माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल तालुका माणगाव या पतसंस्थेच्या भागधारकांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड माणगाव याठिकाणी शुक्रवार दि.१२ सप्टेंबर रोजी चेअरमन आनंद यादव यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीस उपस्थित सर्व संचालक मंडळ, भागधारक, मान्यवर मंडळी यांचे संस्थेतर्फे यादव व संचालक यांनी स्वागत करून अहवाल सालात ज्ञात व अज्ञात सभासदांचे, त्यांचे संबंधितांचे निधनाने संस्थेत पोकळी निर्माण झाली आहे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. या सभेला संचालक दिलीप जाधव, नरेश राजपूत, उदय म्हशेलकर, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे, अलीभाई यतिनमनी,जयंत बोडेरे, तुकाराम काळे, सुरेश गायकवाड, अरुण सिंग आदींसह भागधारक, कर्मचारी वृंद, स्वल्पबचत प्रतिनिधी आदी उपस्थित होते. दिलीप जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानत संस्थेच्या प्रगती विषयी माहिती देत संस्थेच्या उन्नतीसाठी सहकार्य करणाऱ्यांचे आभार व्यक्त केले.



## अलिबाग पतपेढीतर्फे विविध स्पर्धा

**अलिबाग** : रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी अलिबागच्या शतक महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा परिषद शाळा कुरूळ, ता. अलिबाग येथे पाककला आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन (दि. ११) सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. सदर स्पर्धांमध्ये विविध पौष्टिक पदार्थांची मांडणी करण्यात आली. तसेच रांगोळी स्पर्धेसाठी म माझी वसुंधरा या विषयावर आधारित रंगछटा साकारण्यात आल्या. पाककलेमध्ये प्रथम क्रमांक सुलभा ठोंबरे यांनी तर द्वितीय क्रमांक समिक्षा पाटील यांनी पटकावला. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक रेखा मलाबदे तर द्वितीय क्रमांक मनिषा अंजर्लेकर यांनी पटकावला. सदर कार्यक्रमासाठी अलिबाग तालुका गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, अलिबाग तालुका शिक्षण विस्तार अधिकारी कृष्णा पिंगळा, नरेंद्र गुरव, नितीन पाटील, दीपक पाटील, निलेश तुरे, विनोद कवळे, प्रतिभा पाटील, रेश्मा धुमाळ, प्रमोद भोपी, राजेंद्र पाटील उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रमोद भोपी व इतर संचालक यांनी खूप मेहनत घेतली. स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून संचालिका रेश्मा धुमाळ, रविंद्र थळे तसेच सुरेखा नित्यनाथ म्हात्रे यांनी उत्तम कामगिरी बजावली.

## रेल्वे फाटकाजवळ उड्डाणपूलाची मागणी

**सुतारवाडी** : कोलाड रेल्वे फटका जवळ उड्डाणपुलाची आवश्यकता असून या ठिकाणी उड्डाणपूल उभारल्यास दोन्ही बाजूंनी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीची कोंडी होणार नाही. कोलाड रेल्वे स्टेशन मधून या अगोदर रेल्वेमधून अवजड सामान घेऊन ट्रक नेण्यासाठी रो-रो हाऊसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे या ठिकाणावरून अनेक अवजड सामान घेऊन जाणारे ट्रक रो-रो हाऊसने जात असतात. काही दिवसापूर्वी येथूनच रेल्वेमधून कार नेण्यासाठी सुद्धा रो-रो हासऊची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कोलाडमार्गे सुतारवाडी येथून पुणेकडे जाण्यासाठी केवळ ११० कि. मी अंतर असल्यामुळे पुणेकडे जाण्यासाठी तसेच तेथून सुतारवाडीमार्गे कोलाडवरून मुरुड, जंजिरा, अलिबाग, मुंबई, ठाणेकडे जाणारे अनेक लहान-मोठी वाहन कोलाड फाटकाजवळ आल्यानंतर त्याचवेळी रेल्वे येत असेल तर फाटक बंद होतो. अशावेळी दोन्ही बाजूंनी वाहनांची रांगच रांग लागते. फाटक उघडल्यानंतर दुचाकी किंवा तीन चाकी वाहन मधूनच पर्यायी मार्ग शोधत मार्गक्रमण करताना दोन्ही बाजूंनी रस्ता जाम होतो. या सर्व गोष्टींचा विचार करून कोलाड येथील रेल्वे फाटकाजवळ उड्डाणपूलाची मागणी जोर धरत आहे.

## अशोक सराफ यांचा नागरी सत्कार



**चिरनेर** : मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजविणारे तथा पद्मश्री पुरस्कार प्राप्त अभिनेते अशोक सराफ यांचा उलवे येथील भूमिपुत्र भवन येथे २८ सप्टेंबरला यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या वतीने भव्य दिव्य नागरिक सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती कामगार नेते महेंद्र घरत यांनी दिली. चित्रपट सृष्टीतील पद्मश्री पुरस्काराचे मानकरी महाराष्ट्राचे लाडके अभिनेते अशोक सराफ आणि सहचारिणी अभिनेत्री निवेदिता सराफ यांची घरत यांनी रविवारी (दि.७) रोजी भेट घेतली. यावेळी सोबत रंगभूमी व चित्रपटसृष्टीशी नाते असणारे नरेंद्र बेडेकर उपस्थित होते. यावेळी घरत यांनी शाल पुष्पगुच्छ आणि सुखकर्ता, परदेश प्रवासाची पंचविशी, जय शिवराय ही पुस्तके सराफ यांना भेट देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. तर सराफ यांनी त्यांच्या जीवनावरील बहुरूपी हे पुस्तक आपल्या स्वाक्षरीने घरत यांना भेट म्हणून दिले.

# ई-पीक पाहणी ठरतेय डोकेदुखी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेतात पेरलेल्या पिकाची नोंद शासन दरबारी अचूक व्हावी, यासाठी ई-पीक पाहणी प सुरू करण्यात आले आहे. शेतकरी स्वतः शेतावर जाऊन पीक पेऱ्याची नोंद ऑनलाईनद्वारे करू शकतात. मात्र या ई-पीक पाहणीच्या ॲपमध्ये वारंवार बदल होत असल्यामुळे ऑनलाईन पीक पाहणी शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी बनू लागली आहे. ॲपमधील वेगवेगळे कॉलम भरताना सर्वसामान्य शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत असताना, ई-पीक पाहणीच्या नोंदीची मुदतही संपत आलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे. संबंधित महसूल खात्याने याची दखल घेऊन, ई-पीक पाहणी




बाबत उपाययोजना कराव्यात तसेच ई-पीक पाहणीची मुदत वाढविण्यात यावी. अशी मागणी कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांच्यासह येथील शेतकऱ्यांनी केली आहे. पूर्वी पीक पेऱ्याची नोंद तलाठ्यांमार्फत केली जात होती. शेतकऱ्यांना भेटून त्यांच्या पीक पेऱ्याची माहिती घेतली जात होती. त्याचा परिणाम पीक पेऱ्यांच्या नोंदीवर होऊ लागला आहे. दरम्यान शासनाच्या सुविधा व नुकसान भरपाईचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्यास अडथळे निर्माण होतील. त्यामुळे शेतकरी ही धास्तावले आहेत. केंद्र सरकारने ऑनलाईन पद्धतीचा आधार घेत स्वतःहून पीक पेऱ्याची नोंद करण्याची सुविधा शेतकऱ्यांना सोपवली आहे. त्यासाठी ई-पीक पाहणी ॲप सुरू करण्यात आले आहे. या पद्वारे शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात शेतावर जाऊन पवर शेताचे छायाचित्र अपलोड करणे, दुबार पीक व अन्य पिकांची माहिती त्यात भरणे, सिंचन नोंद करणे असे अनेक प्रकारचे कॉलम त्यामध्ये उपलब्ध करण्यात आले आहेत. मात्र सरकारी भाषेमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना हे कॉलम भरताना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या ई-पीक पाहणीला पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे.

## मृताच्या नातेवाईकाच्या शोधात पोलीस

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागच्या कुलाबा किल्ल्याच्या तटबंदीच्या बाजूला एका ५५ वर्षीय इसमाचा मृतदेह सापडला होता. या मृताची ओळख अद्याप पटली नाही. त्यामुळे अलिबाग पोलिसांमार्फत मृताच्या नातेवाइकांचा शोध सुरु करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागमधील कुलाबा किल्ल्याच्या तटबंदी येथील मागील बाजूला एका इसमाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत २० ऑगस्ट रोजी दुपारी सापडला. पोलिसांनी तो मृतदेह ताब्यात घेऊन तपासणी करण्यात आली. अनोळखी इसमाचे अंदाजे वय ५५ वर्षे असून त्याच्या अंगात हिरव्या रंगाचा टी शर्ट होता. हातामध्ये राखी होती. परंतु ओळखीचे कोणताही पुरावा सापडला नाही. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश दाभाडे यांनी नातेवाईकांचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. वेगवेगळ्या माध्यमातून मृत व्यक्तीच्या नातेवाईकांची माहिती घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.मृताची ओळख पटवून घेण्यासाठी अलिबाग पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक १) श्री. कैलास रामचंद्र ताम्हाणे २) सौ. मिनाक्षी लक्ष्मण ताम्हाणे ३) कु. रोशन जगदिश हरपुडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| १४० | १७ | २-२१-०० | २२-१० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १३/०९/२०२५

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफिस -कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सी एस परमेश्वर अय्यर व मिना परमेश्वर अय्यर यांचेकडून खरेदी घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. वर नमूद व्यक्तींनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १६३ | ००-९४-०० | ५.७५ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-    /०९/२०२५

**ॲड. रविंद्र वि. ओक**
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.



# प्रवाशांची बॅग पोलिसांच्या स्वाधीन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतयेथूनउपनगरीयलोकलने वांगणी येथे जात असलेल्या हालिवली ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच प्रमिला बोराडे यांना एक बॅग आढळून आली. त्यांनी ती बॅग वांगणी स्थनाकात उतरून तेथील स्थानक प्रबंधक यांच्या कार्यालयात जमा केली आहे. प्रवाशाची लोकलमध्ये विसरलेल्या त्या बॅग मध्ये काही कागदपत्र आणि साहित्य होते.

कर्जत रेल्वे स्टेशन येथून उपनगरीय लोकलने वांगणीकडे जात होते. त्यावेळी त्यांना उपनगरीय लोकलमधील प्रवासा दरम्यान एक बॅग आढळून आली. त्यावेळी त्यांनी लोकलमधील प्रवाशांना त्या बॅग बद्दल विचारले असता तकोणत्याही प्रवाशाने ती बॅग आपली नाही असे सूचित केले. त्यानंतर बोराडे यांनी वांगणी स्थानकात उतरताना ती बॅग स्थानकातील स्टेशन प्रबंधक यांच्या कार्यालयात जमा केली. त्यावेळी रेल सुरक्षा दलाचे महिला जवान तेथे पोहचल्यावर सदर बॅग त्यांच्या स्वाधीन करण्यात आली. महिला सुरक्षा रक्षकानी ती बॅग उघडून पाहिली असता त्या बॅगमध्ये काही फॉरैन करन्सी तसेच काही पैसे, आधार कार्ड, पॅन कार्ड तसेच इतर महत्त्वाचे ओरिजनल कार्ड, रेनकोट होते. त्यावेळी संबंधित व्यक्तीला पोलिसांकडून संपर्क करण्यात आल्यावर ती बॅग स्थानक प्रबंधक कार्यालयात सुपूर्द करून बोराडे स्थानकाच्या बाहेर पडले. दरम्यान संबंधित बॅगचे मालक असलेले प्रवासी यांनी वांगणी स्थानकात येऊन आपली ओळख पटवून आणि कागदपत्र दाखवून बॅग वांगणी स्टेशन प्रबंधक यांच्याकडून ताब्यात घेतली. तसेच त्या प्रवाशाने बोराडे यांनी संपर्क करून आभार मानले.

अलिबाग गोंधळपाडा येथे ऑफीस कामासाठी अर्जंट कॉम्प्युटर ज्ञान असणारी मुलगी हवी आहे तसेच तीला मराठी/इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक आणि हिंदी बोलता आले पाहिजे तसेच ग्राहकांचे कॉल रिसीव्ह करता आले पाहिजे. ऑफीस टाईम ९.३० ते ५.३० पगार ८ ते १० हजार पर्यंत मिळेल.
**ऑफीस पत्ता :** बेवूड गोंधळपाडा शॉप नं ५ स्वरीन अलिबाग **फोन नं ८४३३८७७४४९**

दिनांक : १३/०९/२०२५

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अशोक सखाराम विरकुड यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे टेंभोर्डे, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| टेंभोर्डे ता.मुरुड | ५१ | क्षेत्र ०-४९-००<br>पो.ख. ०-१२-००<br>**एकूण क्षेत्र ०-६१-००** | ०.३९ |
| टेंभोर्डे ता.मुरुड | ८५ | क्षेत्र ०-३२-००<br>पो.ख. ०-०८-००<br>**एकूण क्षेत्र ०-४०-००** | ०.२५ |

दिनांक :- १३/०९/२०२५

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता:-फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ
अलिबाग-रायगड, मोबा.९७६७०१०९०२

अशिलांची सही

**THE RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD; ALIBAG:**

RDCC Bank
Let's grow together

**TENDER NOTICE**

Sealed Tenders are invited hereby from Computer Dealers / buyers in this trade and registered dealers under E-Waste Management with concerned authorities for the disposal of Computer Hardware and allied peripherals " As is where is basis" and no guarantee of certificate of its worthiness. Interested vendors should submit their proposal to The Manager, EST Dept; Head Office, RDCC Bank Ltd; Alibag, till 22 Sept. 2025. Detailed specification RFP can be obtained from EST Dept; RDCC Bank Ltd; Head Office, Alibag.

Place: Head Office Alibag

Date: 13.09.2025

Deputy Chief Executive Officer

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.२१०/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. यशवंत दगडू मांडवकर
वय : ८४ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा.पाणोसे, पो.कोस्ते खुर्द,
ता.माणगांव, जि.रायगड

**विरुद्ध**

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत साळवे,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२.गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री.यशवंत दगडू मांडवकर यांची मुलगी श्रीम.मीनाकुमारी यशवंत मांडवकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम.सुवर्णा सुभाष शेलार लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे पाणोसे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०४/०४/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. अर्जदार यांची मुलगी श्रीम. मीनाकुमारी यशवंत मांडवकर लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सुवर्णा सुभाष शेलार-लग्नानंतरचे नाव हिच्या जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. १२० ने दि. ३१/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची मुलगी श्रीम. मीनाकुमारी यशवंत मांडवकर लग्नापूर्वीचे नाव व श्रीम.सुवर्णा सुभाष शेलार-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे पाणोसे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०४/०४/१९७४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. यशवंत दगडू मांडवकर यांची मुलगी श्रीम.मीनाकुमारी यशवंत मांडवकर लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सुवर्णा सुभाष शेलार-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे पाणोसे, ता.माणगांव, जि.रायगड येथे दि. ०४/०४/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव
ता.०८/०९/२०२५

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नरेंद्र भगवान पाटील, वगैरे २ सर्व रा. पेझारी-आंबेपूर, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली खालील वर्णनाची भातशेती मिळकत आमचे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता. अलिबाग | १५१/२/४ | ०-२०-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-२१-०० | ०.३६ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०९/२०२५

सही/-
**श्री. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८९००७९३०२

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई यांच्या वाशी परिमंडळाच्या वतीने (दि. ८) सप्टेंबर रोजी जे. एम. म्हात्रे प्राथमिक शाळा मोरा ता. उरण व न्यू इंग्लिश स्कूल, मोरा उरण येथील पहिली ते दहावी पर्यंतच्या २०० गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या प्रसंगी संजय ठाकूर, लक्ष्मण राठोड, नारायण चकोर, श्रीनिवास बोबडे, कोकण रिजन, दादासाहेब दाईंगडे, दिनेश बागुल, जितेंद्र साबळे, निखिल पाटील, आशिष इंगळे, संजित करांडे, कुलदीपसिंग राजपूत, वाशी परिमंडळ सर्व पदाधिकारी उपस्थित होते. शाळेच्या माजी विद्यार्थिनी रूपाली रुमडे व अनिल पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. सदर कार्यक्रमास पी.एम कोळी, चंद्रकांत कोळी, सुधीर मुंबईकर, साईनाथ गावंड, सुगिंद्र म्हात्रे, मनोज म्हात्रे, स्वप्नील नागमोती,रोहिणी घरत, सुनिता पाटील, सुप्रिया मुंबईकर, सत्यवान मर्चंडे, रुपाली चौधरी, कोल्हे, राणी कदम,विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,
अलिबाग-रायगड जिल्हाधिकारी कार्यालय
इमारत, दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ,
अलिबाग, जिल्हा:- रायगड ४०२ २०१
कार्यालय फो.नं. ०२१४१/२२४२२५

RAIGAD DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM
RAIGAD-ALIBAG. COLLECTOR OFFICE BUILDING, 2nd FLOOR, NEAR HIRACOTE TALAV, ALIBAG,
DIST- RAIGAD 402201
Office Tel. No. 02141/224225

E-MAIL ID :- confo-rg-mh@nic.in — Website:- www.confonet.nic.in

जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जाहिर नोटीस/२०२५/१०६४ — दिनांक : ११/०९/२०२५

तक्रार क्रमांक. १३४/२०२३

श्री. अंकुश गजानन भोईर — तक्रारदार
विरुद्ध
मे. शिवकिर्ती बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा
अ. श्री. प्रमोद तुकाराम म्हात्रे
ब. श्री. विश्वनाथ मधुकर म्हात्रे
दोघांचा पत्ता:- शॉप नंबर २, नित्यानंद अपार्टमेंट
प्रभु आळी, पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड ४१०२०६ — सामनेवाला

**जाहिर नोटीस**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा २०१९ कलम ३५ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत/पत्ता बदलला/ मिळून येत नाही. म्हणून या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि. १५/१०/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल यांची दखल घ्यावी.

मे. अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार.

ठिकाण:- अलिबाग-रायगड
दिनांक :- ११/०९/२०२५

सही/-
प्र. प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,
अलिबाग-रायगड

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. अभिषेक कृपाराम लोवंशी, रा. म्हाडा कॉलनी, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ यांनी मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकतीचे मालक १. श्री. महेश सुरेश पावशे, आणि २. श्री. विनोद सुरेश पावशे, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र आर.चौरस मीटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| दहिवली तर्फे निड, | १२५/५ | ५.६०.०० | १०.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, २१ (एकवीस) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड,
पिन ४१०२०१.

कर्जत दि. १३/०९/२०२५ — मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

### पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण

नोंदणी क्रमांक ४४४९/४.८.१९२४ — जावक क्र. ८१६

**फक्त सभासदांसाठी सभेची नोटीस**

१०१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा
सन २०२४-२०२५

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण, या संस्थेची सन २०२४-२०२५ सालची १०१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८/०९/२०२५ रोजी शेळके बंधू मंगल कार्यालय, किरवली, ता. कर्जत, जि.रायगड येथे सकाळी ११.०० वाजता श्री. मोहन यशवंत पाटील, चेअरमन-पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण, यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सदर सभेस सर्व सन्माननीय सभासदांनी उपस्थित रहावे. ही नम्र विनंती

**सभेपुढील कामे**

१) मागील दि. ०४/०८/२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२४-२०२५ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
३) सन २०२४-२०२५ सालचा व्यवस्थापक मंडळाने शिफारस केलेला अहवाल, तेरीज, ताळेबंद, नफा तोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
४) सन २०२४-२०२५ सालचा हिशेब तपासणी अहवालाचे वाचन करुन नोंद घेणे.
५) नवीन पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे (पोटनियमांची शब्द योजना अहवालात समाविष्ट आहे.)
६) सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
७) सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता अंतर्गत ऑडीटरची नेमणूक करणे व मानधन ठरवणे.
८) सन २०२४-२०२५ या सालातील नफा वाटणीस मंजुरी देणे.
९) सन २०२५-२०२६ या सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
१०) सन २०२४-२०२५ सालांत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.
११) संस्थेच्या सन २०२५-२०२६ सालांतील पेण व शाखांसह इतर खर्चाच्या पुढील वर्षासाठीच्या अर्थसंकल्पास मंजूरी देणे.
१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**विशेष सूचना**

१) सभेस आवश्यक ती गणपूर्ती न झाल्यास अर्धा तास सभा तहकूब ठेवण्यात येईल व त्या नंतर उपस्थितांच्या हजेरीतच त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल, त्यावेळी गणपूर्तिची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना काही माहिती हवी असेल अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या लेखी स्वरुपात दि. २१/०९/२०२५ पर्यंत संस्थेच्या पेण येथील मुख्य कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात. त्यानंतर येणाऱ्या सूचना स्विकारल्या जाणार नाहीत.
३) संस्थेच्या या सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासदांना प्रवास खर्च, अल्पोपहार व चहापाना करीता रोख रक्कम १०००/- रु. देण्यात येईल
४) दिनांक २७ व २९ सप्टेंबर या दिवशी शाखांसह कार्यालयीन कामकाज बंद राहील.
५) ज्या शिक्षण सेवक सभासदांचा कायमनिधी पगारातून येत नाही त्यांना उपस्थिती भत्ता दिला जाणार नाही.
६) ओळखपत्राशिवाय उपस्थिती भत्ता दिला जाणार नाही. (फोटो असणारे कोणतेही ओळखपत्र आवश्यक)

दिनांक :१३/०९/२०२५

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**

| श्री.नितीन वसंत वर्तक | श्री.विनोद हसुराम जोशी | सौ.सुमित्रा विलास खेडेकर | श्री मोहन यशवंत पाटील |
|---|---|---|---|
| (सेक्रेटरी) | (मानद सचिव) | (व्हा. चेअरमन) | (चेअरमन) |

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**जाहिर फेर ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/२३२५/प्र.क्र.१२/३४६४/२०२५ — दिनांक :१२/०९/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government/ State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहिर फेर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST ) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/६५/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क, कामोठे, सेक्टर- ११, भुखंड क्र.१ बी, प्रभाग कार्यालय (Ward Office) येथे फर्निचर, ३ बाजूचे कुंपन भिंत, फसाडचे काम व इतर उर्वरीत अनुषंगिक कामे करणे. (२nd Call ) | २,८१,५१,१०७/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१५/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नरेंद्र भगवान पाटील, वगैरे २ सर्व रा. पेझारी-आंबेपूर, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली खालील वर्णनाची भातशेती मिळकत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता. अलिबाग | १५१/२/४ | ०-२०-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-२१-०० | ०.३६ |

सदर मिळकती संदर्भात दिनांक ११/०४/२०२५ रोजी श्री. नरेंद्र भगवान पाटील, वगैरे २ यांनी श्री. राजेश रमेश गुरव, वगैरे २, रा. गुरव आळी, झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्यासोबत बयाणा पावती केली होती. सदर बयाणा पावती आम्ही बयाणा पोटी घेतलेला मोबदला परत करुन रद्द केलेली आहे. तरी सदर मिळकती संदर्भात श्री. राजेश रमेश गुरव, वगैरे २ यांची व इतर कोणाची हरकत असल्यास व सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०९/२०२५

सही/-
**श्री. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८९००७९३०२

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# बालांगण

जिज्ञासा

## कृष्णविवर म्हणजे नेमकं काय?



हे विश्व निर्माण झालं तेव्हा केवळ हायड्रोजन आणि हेलियम ही दोनच मूलद्रव्ये प्रचंड प्रमाणात अवकाशातत तयार झाली असं मानलं जातं. इतर मूलद्रव्यं म्हणजे ऑक्सिजन किंवा नायट्रोजन वगैरे ताऱ्यांमुळे निर्माण झाले. हायड्रोजनच्या अणूकेंद्रकांचं रुपांतर हेलियममध्ये करण्यामुळे ताऱ्यांना त्यांची उर्जा मिळते. तारा कित्येक हजार अब्ज वर्षे प्रकाशाची आणि उर्जेची निर्मिती करीत राहतो. तारे जन्माला येतात तसाच त्यांचा मृत्यूही होतो. अवकाशात एखाद्या ताऱ्याचा जन्म होण्यासाठी कित्येक अब्ज वर्षे लागतात. ताऱ्यांचे आयुष्यही कित्येक अब्ज वर्षांचे असते. आपला सूर्य सुमारे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झाला आणि त्याचा अंत अजून सुमारे ५.५ अब्ज वर्षांनी होईल. ताऱ्याच्या अंतर्भागात असलेल्या हायड्रोजन वायूच्या प्रमाणावर त्याचं आस्तित्व अवलंबून असतं. हायड्रोजनपासून हेलियम तयार होणे त्याची उर्जा अवकाशात फेकली जाणे हे सलुरू आहे तोवर तारा जीवित असतो. त्याच्या अंतर्भागातील हायड्रोजन कमी कमी होतो तसा त्याचा प्रकाश अंधूक होत जातो. अखेर हायड्रोजन पूर्णपणे संपून जातो आणि ता–याचा अंत होतो. तोच ताऱ्याचा मृत्यू. त्याजागी न दिसणारे काळे टिंब उरते तेच कृष्णविवर. कृष्णविवर म्हणजेच ब्लॅकहोल ही ताऱ्याची अंतिम स्थिती आहे.

## जग रेडिओ जॉकींचं



वेगळ्या वाटा

रेडिओ जॉकी म्हणजे आर जे होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आकर्षक आणि स्पष्ट आवाज,लोकांशी संवाद साधण्याची कला आणि हजरजबाबीपणा. या क्षेत्रात करिअर करायचं असल्यास किमान १२ वी उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. त्यानंतर कोणत्याही विषयात पदवी घेता येते. मात्र मीडियामध्ये करिअर करायचं असेल तर मास कम्युनिकेशन, जरनॅलिझम किंवा मीडिया स्टडीज यामध्ये पदवी किंवा डिप्लोमा केल्यास जास्त संधी मिळतात. यासाठी विशेष अभ्यासक्रम जसे की डिप्लोमा इन रेडिओ जॉकींग किंवा ३ ते ६ महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस, डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन किंवा बी. ए. इन मास मीडिया करता येतात. भारतात झेवियर इंस्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, मुंबई , इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, दिल्ली, रेडिओ सिटी स्कूल ऑफ ब्रॉडकास्टिंग, जामिया मिलिया इस्लामिया दिल्ली आणि एफ टी आय आय, पुणे अशा संस्थांमध्ये प्रशिक्षण घेता येते. याशिवाय अनेक प्रायव्हेट ट्रेनिंग इन्स्टिटयूट्स आणि ऑनलाइन कोर्सेस देखील उपलब्ध आहेत. सुरुवातीला कॉलेज फेस्ट, स्टेज अँकरींग किंवा इव्हेंट होस्टिंग करून अनुभव घ्या. तसेच स्वतःचे पॉडकास्ट, युट्यूब किंवा इंस्टा रील्स बनवण्याचा प्रयत्न करून पाहा. रेडिओ चॅनलमध्ये इंटर्नशिप करून व्यावसायिक अनुभव घेतल्यास पुढे रेडिओ जॉकी म्हणून करिअरची सुरुवात सहज करता येते.

## लक्झेंबर्ग युरोपचे हृदय

सफर देशांची

लक्झेंबर्ग हा पश्चिम युरोपमधील एक लहान पण अत्यंत महत्त्वाचा देश आहे. या देशाची राजधानी लक्झेंबर्ग शहर असून येथे ग्रँड ड्यूक हा राज्यप्रमुख असतो. सध्या ग्रँड ड्यूक हेन्री हे राज्यप्रमुख आहेत. लक्झेंबर्ग हे संविधानिक राजेशाही पद्धतीवर चालते. देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ फक्त २५८६ चौ. कि.मी. आहे. पण आर्थिक व राजकीय महत्त्वामुळे या देशाला जागतिक नकाशावर विशेष स्थान आहे. जगभरातील मोठ्या कंपन्यांची मुख्यालये किंवा युरोपियन ऑफिसेस लक्झेंबर्गमध्ये आहेत कारण इथे चांगल्या करसवलती मिळतात आणि इथली बँकिंग प्रणाली सुरक्षित आहे. लोखंड व पोलाद उद्योग हा लक्झेंबर्गचा पूर्वीचा मुख्य व्यवसाय होता. परंतु आता बँकिंग, वित्तीय सेवा, गुंतवणूक, विमा,माहिती तंत्रज्ञान हा लक्झेंबर्गच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारआहे. पर्यटनातूनही या देशाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते.



या देशाची अधिकृत भाषा तीन आहेत. लक्झेंबर्गिश, फ्रेंच आणि जर्मन. शिक्षण व प्रशासकीय कामकाजात सर्व भाषांचा वापर होतो. लोकसंख्या अंदाजे ६.८ लाख आहे.त्यात परदेशी नागरिकांची संख्या जास्त आहे. इथली आरोग्यसेवा, सार्वजनिक सुविधा आणि राहणीमान अत्यंत उच्च दर्जाचे आहे.

जगातील सर्वांत श्रीमंत व विकसित देशांमध्ये लक्झेंबर्गचा समावेश आहे. युरोपियन युनियनच्या अनेक महत्त्वाच्या संस्था इथे आहेत, त्यामुळे लक्झेंबर्गला 'युरोपचे हृदय' म्हटले जाते. लक्झेंबर्ग शहरातील प्राचीन किल्ले आणि किल्ल्याभोवतीची वास्तुकला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट आहे.

## रंजक फुटबॉल

फन टाईम

फुटबॉलपटू लियोनल मेस्सीला जगातल्या सर्वोकृष्ट फुटबॉलपटूचा पुरस्कार मिळाला आहे. त्याने हा पुरस्कार सहाव्यांदा पटकावला आहे. या पुरस्काराला 'बेलॉन डी ओर' (गोल्डन बॉल) असं म्हटलं जातं. हा किताब सहाव्यांदा पटकावणारा मेस्सी हा जगातला पहिलाच फुटबॉलपटू. मेस्सी अर्जेंटिनाकडून फुटबॉल खेळतो. त्याला २००९ मध्ये पहिल्यांदा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर २०१०, २०११, २०१२ आणि २०१५ मध्येही त्याला हा पुरस्कार देण्यात आला.

ख्रिस्तियानो रोनाल्डोने हा पुरस्कार पाच वेळा पटकावला आहे. फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला 'गोल्डन बूट' किंवा 'गोल्डन शूज' हा पुरस्कार दिला जातो. १९८२ पासून या पुरस्काराला सुरूवात झाली. त्यावेळी हा पुरस्कार 'गोल्डन शू' या नावाने ओळखला जायचा. २०१० मध्ये या पुरस्काराचं नाव बदलून 'गोल्डन बूट' असं करण्यात आलं.

फुटबॉल या खेळाचा शोध चीनमध्ये लागल्याचं बोललं जातं. चीनी भाषेत या खेळाला 'कुजू' म्हटलं जायचं. २००२ मध्ये ऑलिव्हर कान या खेळाडूला 'गोल्डन बूट' पुरस्कार देण्यात आला होता. तो हा पुरस्कार मिळवणारा पहिला आणि एकमेव गोलकिपर होता. १९०० मधल्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेपासून फुटबॉलचा समावेश करण्यात आला. १९७३ मध्ये पहिल्यांदा फुटबॉल सामन्याचं थेट प्रक्षेपण करण्यात आलं.



## कोणे एकेकाळी orkut



स्मार्ट ग्यान

दोस्तांनो, जगभरात फेसबुक, व्हॉटस ॲप वापरणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. तुमच्या पिढीला फेसबुक, व्हॉट्स ॲप शिवाय करमतच नाही. यासोबतच ट्विटर, इंस्टाग्रामसारख्या साईट्सही आहेत. या साईट्सच्या लोकप्रियतेमुळे बऱ्याच सोशल नेटवर्किंग साईट्सना गाशा गुंडाळावा लागला. अशाच काही डब्यात गेलेल्या साईट्सविषयी...

■ २०११ मध्ये धूमधडाक्यात सादर करण्यात आलेली गूगल प्लस ही साईट बंद झाली. फेसबुक, व्हॉट्स अपसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सशी स्पर्धा करणं गूगल प्लसला काही जमलं नाही. या साईटची लोकप्रियता घटत गेली. इतकंच नाही, तर ही साईट फार सुरक्षितही नव्हती. त्यामुळे एप्रिल २०१९ मध्ये ती बंद करण्यात आली.



■ साधारण दहा वर्षांपूर्वी तरुणाईमध्ये ऑर्कुट ही साईट खूप लोकप्रिय होती. फेसबुक आल्यानंतर लोकांनी ऑर्कुट वापरणं बंद केलं. यामुळे या कंपनीनेही २०१४ मध्ये गाशा गुंडाळला. ऑर्कुट आता इतिहासजमा झालं आहे.

■ ब्लॅकबेरीने आपली मेसेंजर ही इंस्टंट मेसेजिंग सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला.

■ ट्विटरची वाईन नावाची सेवा होती. कंपनीने ही सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला. ही व्हिडिओ लूप सेवा होती. याद्वारे युजर्स फक्त सहा सेकंदांचा व्हिडिओ बनवू शकत होते. मात्र स्पर्धेत ही सेवा मागे पडली.

■ १९९० मध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर असणाऱ्या याहू मेसेंजरनेही गाशा गुंडाळला. याहू मेसेंजर स्पर्धेत टिकून राहू शकली नाही.

## बना टी टेस्टर

दोस्तांनो, तुमच्या घरातही आई–बाबांना, आजी–आजोबांना उठल्या उठल्या चहा लागतो का? भारतात चहाबाजांची कमतरता नाही. दररोज एकापेक्षा अधिक चहा पिणारेही बरेच आहेत. चहाशिवाय अनेकांचा दिवसही सुरू होत नाही. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे चहा उपलब्ध आहेत. या चहाची चव बघून तुम्ही भरपूर पैसे कमवू शकता, हे माहीत आहे का! यासाठी तुम्ही टी सोमिलियर किंवा टी टेस्टर बनायला हवं. या क्षेत्रात करीअर केल्यानंतर चहाच्या वेगवेगळ्या प्रकारांबद्दल तुम्ही माहिती देऊशकता. तसंच कोणत्या चहासोबत काय खायला हवं हे सुद्धा सांगू शकता. देशातल्या मोठमोठ्या हॉटेल्सना अशा टी टेस्टर्सची गरज असते. तसंच आता कॉफी शॉप्सप्रमाणे टी शॉपही सुरू झाले आहेत. या ठिकाणीसुद्धा तुम्ही काम करू शकता.



कोण होणार?

बॉटनी, फूड सायन्स तसंच हॉर्टिकल्चरचे विद्यार्थी हे क्षेत्र अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात. बिर्ला इन्स्टीट्यूट ऑफ फ्युचरिस्टिक स्टडीज, इंड्यिन इन्स्टीट्यूट ऑफ प्लांटेशन मॅनेजमेंट आणि आसाम ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटीमध्ये या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जातात. हा अभ्यासक्रम सहा महिने ते एक वर्षापर्यंतचा असतो. आसाम, पश्चिम बंगालमध्ये चहाचे मळे आहेत. चहाची लागवड कशी करायची, रोपट्यांची निवड कशी करायची, याबाबतचे सल्ले तुम्ही देऊ शकता. या क्षेत्रात सुरूवातीला ७ हजार ते ५० हजार रूपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकतं. पुरेशा अनुभवानंतर यात वाढ होते. वेगळा पर्याय म्हणून तुम्ही टी टेस्टींगची वाट निवडू शकता.

ठिपके जुळवा



## सियाचिनविषयी...

दोस्तांनो, तुम्ही ग्लेशियर्सबद्दल ऐकलं आहे का? ग्लेशियर्स म्हणजे हिमनदी. आपल्या देशात सियाचिन हे ग्लेशियर आहे. सियाचिनमध्ये आपले सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. इथलं तापमान खूप कमी असतं. मात्र अशा वातावरणातही आपले सैनिक डोळ्यात तेल घालून आपल्या सीमांचं रक्षण करतात. हिमालयातल्या पूर्व काराकोरम पर्वतरांगांमध्ये सियाचिन वसलं आहे. सियाचिन ही जगातली सर्वात उंचावरची युद्धभूमी आहे.

गंमत जंमत



सियाचिनवर पाकिस्तानचा डोळा आहे. त्यामुळे आपल्या सैनिकांना हुडहुडी भरवणाऱ्या थंडीतही तिथे रहावं लागतं. सियाचिन परिसरातलं तापमान उणे साठ अंश सेल्सियसच्या खालीही जाऊ शकतं. आपल्याला थंडी वाजू लागल्यावर आपण लगेच स्वेटर घालतो. आपल्याला थोडी थंडीही सहन होत नाही. पण सैनिक देशासाठी लढत असतात. इतकंच नाही, तर इथे ऑक्सिजनचं प्रमाणही कमी असतं. या भागात फक्त दहा टक्के ऑक्सिजन असल्यामुळे सैनिकांपुढे मोठं आव्हान असतं. सियाचिनमध्ये भारताचे तीन हजार सैनिक नेहमी तैनात असतात. प्रत्येक सैनिक साधारण तीन महिने या भागात रहतो. प्रतिकूल तापमानामुळे कोणीही तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ सियाचिनमध्ये राहू शकत नाही. तिथे एक बादली पाणी गरम करण्यासाठी सुमारे तीन तास लागतात. पाणी पिण्यासाठी सैनिकांना बर्फ स्टोव्हवर वितळून घ्यावा लागतो. मशिन गन्स जाम होऊन नयेत म्हणून उकळत्या पाण्यात बुडवून ठेवल्या जातात!

चित्र रंगवा



जिज्ञासा

## ओळखा पाहू

१) जगातलं पहिलं वर्तमानपत्र कोणत्या देशात सुरू झालं?
२) 'अल खझ्नेह' ही ऐतिहासिक वास्तू कुठे आहे?
३) काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांनी कोणत्या पक्षाची स्थापना केली?
४) 'बुद्ध चरिता' या ग्रंथाचा लेखक कोण?
५) चीनी प्रवासी हियुइन टी सँगने कोणत्या विद्यापीठातून शिक्षण घेतलं?
६) कापड उद्योगासाठी कापसाची लागवड सर्वप्रथम कुठे करण्यात आली?
७) संपूर्ण भारतावर राज्य करणारा पहिला भारतीय राजा कोणता?
८) थोर संस्कृत व्याकरणकार पाणिनी यांचा काळ कोणता?
९) देशात मुघल साम्राज्याची सुरूवात खऱ्या अर्थाने कोणत्या लढाईनंतर झाली?
१०) २०20 मध्ये २०–२० क्रिकेटचा विश्वचषक कोणत्या देशात झाला?

उत्तरं : १) चीन २) पेत्रा ३) फॉरवर्ड ब्लॉक ४) अश्वघोष ५) नालंदा ६) इजिप्त ७) चंद्रगुप्त मौर्य ८) ख्रिस्तपूर्व सहाव्या आणि पाचव्या शतकादरम्यान ९) पानिपतची दुसरी लढाई १०) ऑस्ट्रेलिया

दोस्त हे मस्त

### प्राण्यांची अजब दुनिया

छोट्यांनो, प्राण्यांच्या जगात बरंच काही घडत असतं. प्राण्यांचं जगही अनोखं आहे. आता हत्तीचंच बघा. हत्तीला उडी मारता येत नाही. उडी मारता न येणारा हत्ती हा एकमेव प्राणी आहे. आपल्या आसपास दिसणाऱ्या मुंग्या कधी झोपत नाहीत. शिवाय त्यांना फुफ्फुसही नसतं. ब्लू व्हेलच्या जिभेचं वजन एखाद्या कारएवढं किंवा हत्तीच्या पिल्लाएवढं असतं. गाय आपल्या आयुष्यात जवळपास दोन लाख ग्लास दूध देते.



खादाडी

### स्टफ्ड रोटी

मुलांनो. उरलेल्या पोळीपासून स्टफ्ड रोटी बनवता येईल. यासाठी दोन ते चार पोळ्या, एक वाटी उकडलेल्या भाज्या, एक बारीक चिरलेली काकडी, बारीक चिरलेले दोन टोमॅटो आणि एक कप किसलेले चीज असं साहित्य घ्या. आता एक पोळी घ्या. त्यावर उकडलेल्या भाज्या घाला. त्यावर टोमॅटो आणि काकडी घाला. त्यावर चीज घाला. यानंतर पोळी दुमडून घ्या. आता ही पोळी तव्यावर भाजून घ्या. गरमागरम खा.



स्टडी टिप्स

### गोडी गणिताची

मुलांनो, गणितात चांगले गुण मिळवायचे असतील तर आपल्या आयुष्यातली गणितं सोडवायला सुरुवात करा. आपल्या वाढदिवसापासून सुरुवात करा. वाढदिवसाच्या खर्चाचा हिशेब तुम्हीच मांडा. वाढदिवसाला किती मित्रमैत्रिणी येणार, त्यांच्यासाठी किती वस्तू लागतील, कोणते गेम्स खेळावे लागतील हे सगळं तुम्हीच ठरवा. अशा छोट्या छोट्या गोष्टींमधून तुम्ही गणित शिकत जाल आणि पुढे गणिताची गोडी लागेल.



योगा टाईम

### करा उदानमुद्रा योग

दोस्तांनो, योगासनांमुळे आपलं सर्वांगिण आरोग्य उत्तम राहतं. आपण तंदुरुस्त राहतो. इतकंच नाही, तर आरोग्यविषयक समस्याही दूर होतात. चेहरा तजेलदार दिसण्यासाठी तुम्ही उदानमुद्रा योग करू शकता. मुद्रेमुळे चेहरा खूप छान, उजळ दिसतो. हे आसन करण्यासाठी तुम्हाला पद्मासनात बसावं लागेल.



# कलासक्त

# अभिनेते बाळ कर्वे चि.वि जोशींचे गुंड्याभाऊ

**गुंड्याभाऊ ही मराठी विनोदी लेखक चिं.वि. जोशी यांनी निर्माण केलेली एक काल्पनिक व्यक्तीरेखा आहे. गुंड्याभाऊ हे या कथेतील चिमणरावांचे मावसभाऊ होते. चिं.वि. जोशींनी निर्माण केलेल्या या चिमणराव व गुंड्याभाऊ या जोडगोळीच्या विनोदी करामतींवर पुढे अनेक कलाकृती निर्माण झाल्या. १९४० च्या सुमारास या जोडगोळीच्या विनोदांवर प्रथम 'लग्न पहावे करून' व नंतर 'सरकारी पाहुणे' हे मराठी चित्रपट तयार झाले. या दोन्हीही चित्रपटांत व चिमणरावांचे काम दामूअण्णा मालवणकर करीत असत, तर गुंड्याभाऊंचे काम विष्णूपंत जोग करीत होते. इतकेच नव्हे तर विष्णूपंत जोग यांनी 'मी गुंड्याभाऊ' नावाने आपले आत्मचरित्रही लिहिले.**

रंगबहार

**शरद कोरडे**



मुंबई दूरदर्शनने पुढे १९७८ साली 'चिमणराव गुंड्याभाऊ' ही दूरचित्रवाणी मालिका सुरू केली व चिमणराव गुंड्याभाऊ मराठी माणसांच्या घराघरात पोहोचले. या मालिकेत चिमणरावांचे काम दिलीप प्रभावळकर व गुंड्यांभाऊंचे काम बाळ कर्वे करीत होते. चिमणरावांच्या पत्नी कावेरी उर्फ 'काऊ'चे काम स्मिता पावकर यांनी केले. या मालिकेत गणेश मतकरी सुषमा तेंडूलकर, लक्ष्मीकांत बेर्डे व सुलभो कोराने यांनी भूमिका केल्या होत्या. विजया जोगळेकर धुमाळे या कार्यक्रमाच्या निर्मात्या होत्या. या मालिकेत चिमणराव-गुंड्याभाऊंच्या अनेक उचापतींवर विनोदी पद्धतीने चिं.वि. जोशी यांनी प्रसंग रेखाटले होते. त्यामुळे या दोन्ही भूमिका जनमानसात अजरामर झाल्या. इतकेच नव्हे तर त्या भूमिका करणारे कलावंतही कमालीचे लोकप्रिय झाले. दामूअण्णा पालवणकर व विष्णूपंत जोग यांना चित्रपटात व नाटकात पाहिलेले प्रेक्षकही आता दुर्मिळ झाले असतील. पण दिलीप प्रभावळकर व बाळ कर्वे यांना मिळालेली लोकप्रियताही अजून साठून आहे. त्यातील बाळ कर्वे यांनी तर रंगभूमीवर फार उशिरा पदार्पण केले. पुण्यामध्ये २५ ऑगस्ट १९३० मध्ये जन्मलेल्या बाळ कर्वे यांनी पुण्यातच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर 'कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे' या कॉलेजात त्यांनी सिव्हील इंजिनिअरींगची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांना मुंबई महापालिकेत 'स्थापत्य अभियंता' म्हणून नोकरी मिळाली व ते मुंबईत येऊन स्थायिक झाले. मुंबई महापालिकेत त्यांनी तब्बल बत्तीस वर्षे नोकरी केल्यावर त्यांनी निवृत्ती घेतली. या काळात ते विलेपार्ले येथे राहत असत. त्यांच्याच इमारतीमध्ये राहणारे सुमंत वरणगावकर यांच्याशी त्यांची मैत्री होती. त्यांनाही नाटकाची आवड असल्याने दोघांनी मिळून 'किलबिल बालरंगमंच' नावाची नाट्यसंस्था स्थापन केली व त्यामाध्यमांतून त्यांनी अनेक बालनाट्ये सादर केली.

बाळ कर्वे यांच्या शेजारी नाट्यकर्मी माधव वाटवे राहत असत. त्यांचे नाट्यवेड पाहून त्यांनी कर्वेंना गिरगावच्या साहित्य संघात नेले. विजया मेहता ह्या माधव वाटवे यांच्या नाट्यगुरू होत्या. त्यांच्याशी वाटवेंनी कर्वेंची ओळख करून दिली. साहित्य संघाच्या 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या नाट्यप्रयोगाला वाटवेंसोबत कर्वे गेले होते. तेथे 'रंगायन' संस्थेचे खुप कलाकार उपस्थित होते. त्यांच्याशी कर्वेंची ओळख झाली व सर्वांच्या आग्रहामुळे बाळ कर्वे यांनी 'रंगायन' संस्थेत प्रवेश घेतला. 'रंगायन' त्यावेळी राज्य नाट्यस्पर्धेसाठी विजय तेंडुलकर यांचे 'लोभ नसावा ही विनंती' हे नाटक बसवित होती. त्यात बाळ कर्वेंनी प्रथम भूमिका केली. या नाटकाला राज्यस्पर्धेत पारितोषिकही मिळाले. रंगायनच्या चि.त्र्यं. खानोलकर भूमिका केली. या नाटकाला राज्यस्पर्धेत पारितोषिकही मिळाले.

रंगायनच्या चि.त्र्यं. खानोलकर यांनी लिहिलेल्या 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकाचे प्रयोग जर्मनीमध्ये झाले. कारण जर्मन नाटककार ब्रेश्त यांच्या 'कॉकेशियन चॅफ सर्कल' या मूळ जर्मन नाटकावर ते आधारीत होते. या नाटकात 'जमीन वारसाहक्काने जुन्या मालकांना द्यावी की, अधिक चांगल्या रीतीने लागवड करणाऱ्या नव्या मालकांना द्यावी' हा प्रश्न सोडविण्यासाठी सांगितलेली गोष्ट म्हणजेच हे नाटक होते. या नाटकाचे नेपथ्य जर्मनीला विमानांतून नेण्यासाठी त्याचा घडीचा सेट बनवून तो सुलभपणे नेता यावे म्हणून बाळ कर्वेंनी आपले इंजिनिअरींगचे कौशल्य वापरत सेट तयार केला व प्रयोगालाही जर्मनीत गेले व नाटकांतील छोट्या भूमिकाही केल्या. अशाप्रकारे त्यांनी 'शांतता कोर्ट चालू आहे' व 'बॅरिस्टर' या नाटकातूनही छोट्या भूमिका केल्या.

नाटककार जयवंत दळवी यांचे रंगायनने केलेले 'संध्याछाया' हे बाळ कर्वे यांचे पहिले व्यावसायिक नाटक. या नाटकात विजया मेहता व माधव वाटवे यांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या. त्यात शेजाऱ्याची एक छोटी परंतु लक्षात राहील अशी भूमिका बाळ कर्वे यांनी केली. व इथून पुढे बाळ कर्वे यांचा नाट्यप्रवास सुरु झाला.

मुंबई दूरदर्शनवरील 'चिमणराव गुंड्याभाऊ' ही भारतातील पहिली दूरदर्शन मालिका होती ज्याची संकल्पना याकूब सैद व विजया जोगळेकर यांची होती. या मालिकेतील गुंड्याभाऊंची भूमिका प्रथम शरद तळवलकर यांना देण्यात येणार होती. पण मराठी चित्रपटात ते गुंतलेले असल्याने ती भूमिका बाळ कर्वे यांच्याकडे आली; व या मालिकेने इतिहास घडविला. १९७७ मध्येच दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांनी वसंत सबनीस यांच्या कथा पटकथेवर 'बन्याबापू' नावाचा चित्रपट केला. या चित्रपटात उदरनिर्वाहाचे साधन नसलेल्या व नोकरीच्या शोधात असलेल्या दोन तरूणांची गोष्ट विनोदी ढंगाने लिहिली होती. त्यात नवीन अभिनेत्यांना गोविंदरावांनी घेतले. एक होते मोहन गोखले व दुसरे बाळ कर्वे. दोघांचाही हा पहिला चित्रपट होता. यात मोहन गोखलेंसोबत उषा नाईक व बाळ कर्वेंसोबत सरला येवलेकर या नायिका होता. यांतील 'प्रितीचं झुळझुळ पाणी' हे गाणे बाळ कर्वे व सरला यांच्यावर चित्रीत झाले होते. 'लेलो भाई चिवडा लेलो' हे गाणे मोहन गोखले व बाळ कर्वे यांच्यावर चित्रीत झाले होते. ऋषीराज यांनी संगीत दिलेली या चित्रपटांतील पाचही गाणी लोकप्रिय झाली होती. निळू फुले, आशा पाटील, निशा जावळे, मोहन चोटी व मा. भगवान हे कलाकारही या चित्रपटात होते.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे यशवंत नाट्य मंदिराच्या इमारतीचे पुनर्बांधणीचे व नूतनीकरणाचे काम जेव्हा सुरू झाले, तेव्हा या कामाच्यावेळी बाळ कर्वे यांनी स्वतः सर्व बांधकामांचे नियोजन केले व सतत पाहणी करून मार्गदर्शन केले. हे सारे त्यांनी कोणताही मोबदला न घेता केले होते. इतकेच नव्हे तर नाट्यपरिषदेचे एक विश्वस्त म्हणूनही त्यांनी काम केले.बाळ कर्वेंनी त्यानंतर अशोक पाटोळे लिखित 'आई रिटायर होतेय' या १९८९ सालच्या नाटकात एक महत्त्वाची भूमिका भक्ती बर्वे यांच्यासोबत केली. या नाटकाचे दिग्दर्शन दिलीप कोल्हटकर यांनी केले होते. या नाटकातील भूमिकेस बाळ कर्वे यांना महाराष्ट्र शासनाने सर्वोत्तम अभिनयाचे पारितोषिकही मिळाले होते. या नाटकाचे ७५० प्रयोगात त्यांनी काम केले. नंतर त्यांनी 'आम्ही लटके ना बोलू', 'कुसुम मनोहर लेले', 'तांदूळ निवडता निवडता', 'रथचक्र' व 'सूर्याची पिल्ले' या नाटकांतून महत्त्वाच्या भूमिका केल्या. यापैकी 'सूर्याची पिल्ले' या नाटकातील त्यांची शिघ्रकोपी बजरंगाची भूमिका खूप गाजली होती. वसंत कानेटकर लिखित या नाटकाचे दिग्दर्शन सदाशिव अमरापूरकर यांनी केले होते. यात मोहन गोखले, बाळ कर्वे, माधव वाटवे, दिलीप प्रभावळकर, शांता जोग व सदाशिव अमरापूरकर यांनी भूमिका केल्या होत्या. हे नाटक 'दि गोवा हिंदू असोसिएशनने' १९७८ साली प्रथम रंगमंचावर आणले होते.

बाळ कर्वे यांनी काही चित्रपटातून भूमिका केल्या असल्या तरी ते चित्रपटात रमले नाहीत. त्यांचे पहिले प्रेम नाटकावरच होते. काही नाटकात भूमिका नसली तरी ते त्या निर्मितीत सहाय्य करण्यास व मार्गदर्शन करण्यास आनंदाने तयार असत. 'अजब न्याय वर्तुळाचा', 'बॅरिस्टर', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'मनोमनी' अशा नाटकांतून त्यांनी बदली कलाकार म्हणूनही भूमिका केल्या होत्या. जब्बार पटेल यांच्या 'जैत रे जैत' या चित्रपटांतील छोटी भूमिका देखील त्यांनी नकार न देता केली. प्रकाश भेंडे यांच्या 'चटक चांदणी' या चित्रपटांतही त्यांनी नायिकेला (जयश्री टी.) मदत करणाऱ्या गावांतील गृहस्थाची भूमिका केली. व्ही.के. नाईक यांच्या 'गोडी गुलाबी' या १९९० सालच्या चित्रपटात त्यांनी सुधीर जोशी यांच्यासह भूमिका केली. या विनोदी चित्रपटात लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ, सुहास भालेकर, आसावरी जोशी, रेखा राव, जयवंत कुलकर्णी यांच्या भूमिका केल्या. त्यानंतर त्यांनी 'चांदोबा चांदोबा भागलास का' व 'संदेश सातारकर' या चित्रपटात भूमिका केल्या. दूरदर्शन मालिकांत त्यांनी 'चिमणराव गुंड्याभाऊ' नंतर 'उंच माझा झोका', 'प्रपंच', 'महाश्वेता', 'राधा ही बावरी', 'वहिनी साहेब', 'स्वामी' आदी मालिकेत कामे केली.

२८ ऑगस्ट २०२५ रोजी दिर्घ आजाराने त्यांनी गुरूवारी सकाळी १०.१५ वाजता अखेरचा श्वास घेतला. तीनच दिवसापूर्वी कुटुंबियांनी त्यांचा ९५ वा वाढदिवस साजरा केला होता. ●●

---

# एक मखमली जादुई संगीतकार सलील चौधरी



**श्रीराम शेटये**

सलीलदा हिंदी, बंगाली, मल्याळम् संगीतचे बेताज बादशहा होते. बंगाली मातीची अस्सल जादू असलेले आणि भारतीय चित्रपटसंगीतातील नवनिर्मिती दरम्यान मेलोडीचे उस्ताद म्हणून गाजलेले संगीतकार सलिल चौधरी.

भाषा आणि प्रदेशाच्या सीमा ओलांडून आपली संगीत यात्रा गाजविणाऱ्या सलिल चौधरी यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९२२ रोजी पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगण्यातील गाझीपूर गावात झाला. त्यांचे जन्म वर्ष आंतरजालावर शोधले असता, विविध स्रोतांनी ते वेगवेगळे म्हणजे १९२२, १९२३ आणि अगदी १९२५ असे नोंदवलेले आहे. सलील चौधरी यांची बालपणाची वर्षे आसामच्या नयनरम्य चहा बागांमध्ये गेली. त्यांचे वडील ज्ञानेंद्र चौधरी १९३१ ते १९५१ दरम्यान आसाममधील काझीरंगाजवळील हातिकुली चहाच्या मळ्यात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करत असत. येथेच सलील चौधरी यांच्या जीवनात संगीताची आवड रुजली. वडील संगीतप्रेमी होते त्यामुळे चहाच्या बागेत काम करणाऱ्या आदिवासी समुदायातील लोकांसोबत विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असत. याच वेळी सलील चौधरी चहाच्या मळ्यातील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. मालोनी यांच्या संपर्कात आले. डॉ. मालोनी आयरिश नागरिक होते, त्यांच्याकडे पाश्चात्य शास्त्रीय ध्वनिमुद्रणांचा विशाल संग्रह होता, त्यांच्या घरी पाश्चात्य संगीत ऐकत असतांना लहानग्या सलील यांच्या मनातील संगीत संवेदनांना आकार मिळाला. वडीलांमुळे सलिल चौधरींची आसाम आणि बंगालच्या लोकसंगीताशी ओळख झाली होती. त्यांनी आवडीने बासरी, पियानो आणि व्हायोलिन वाजवायला देखील शिकले.

सलिल चौधरी हरिनवी डी. व्ही.ए.एस. विद्यालयात शालेय शिक्षण घेतल्यानंतर, कलकत्त्याच्या बंगबासी महाविद्यालयात त्यांनी पदवी प्राप्त केली. तत्कालीन काळातील बंगालमध्ये पडलेले भयानक दुष्काळ आणि बदलत्या राजकीय वातावरणाचा प्रभाव तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा त्यांच्या मनावर परिणाम होवून ते डाव्या विचारसरणीच्या विचारधारेकडे वळू लागले. महाविद्यालयीन काळात झालेल्या या राजकीय जागृतीमुळे त्यांनी इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनमध्ये (इप्टा) सामील होत, त्यांनी वंचितांच्या समस्या मांडण्यासाठी कलेचा वापर केला. इप्टामधूनच सलील चौधरी यांनी स्वातंत्र्यलढ्याने प्रेरित होवून राष्ट्रभावना जागृत करणारी गाणी लिहिली व संगीतबद्धही केली.

सलील चौधरी यांच्या 'बेचारपोटी तोमर बिचार', 'हे शामलो धन हो', 'ओ मोडेर देशोबाशी रे', 'कोनो एक गेयर बोधु', 'रनर', 'धेउ उथचे करा तुचे', 'अबाक प्रिथिबी' या त्या काळातील गाण्यांमध्ये क्रांतिकारी आणि राजकीय क्षेत्रात लोकप्रिय झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संगीताची आवड त्यांना चित्रपटक्षेत्राकडे घेऊन गेली. सलील चौधरी यांनी परिवर्तन (१९४९) या बंगाली चित्रपटापासून आपली संगीत कारकिर्द सुरु केली. त्यानंतर 'बरयात्री' (१९५१), 'पाश्चारबारी' (१९५२), 'बंशेर केला' (१९५३), 'भोरे होय एलो' (१९५३), 'आज सोंध्याय' (१९५४), 'महिला महल' (१९५४), 'एक दिन राते' (१९५५), 'रिक्शावाला' (१९५५), 'रात भोरे' (१९५५), 'बारी थेके पालीये' (१९५८), 'गंगा' (१९६०), 'कोमोल गांधार' (१९६१), 'अयानंतो' (१९६४), 'परी' (१९६४), 'मरजिना अबदुल्ला' (१९७२), 'अकलेर संधानी' (१९८१), 'प्रतिज्ञा' (१९८५), 'महाभारत' (१९९४) या चित्रपटातून त्यांची कारकिर्द बहरत राहिली.

त्यांच्या कारकिर्दीत ७५ हून अधिक हिंदी चित्रपट, ४१ बंगाली चित्रपट आणि २७ मल्याळम चित्रपटांसाठी त्यांनी संगीत दिले. पाश्चात्य वाद्यवृंदाचा वापर करुन भारतीय शास्त्रीय संगीतात करुन त्यांनी तयार केलेल्या मेलोडीने देशभरातील कानसेनांना वेड लावले होते. १९५० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी जमीन गमावल्यानंतर रिक्शाचालक म्हणून काम करणाऱ्या शेतकऱ्याची पटकथा लिहिली, हृषिकेश मुखर्जी यांनी बिमल रॉय यांना या पटकथेबद्दल सांगितले, या पटकथेवर चित्रपट बनविण्याचा निर्णय होवून 'दो बिघा जमीन' (१९५३) हा चित्रपट आला. या चित्रपटात सलील चौधरीची कथा, रिक्शावाला आणि रवींद्रनाथ टागोर यांची कविता, दोई बिघा जोमी यांचा समावेश करत, इटालियन नव-वास्तववादी चित्रपटापासून प्रेरित होवून केलेला भारतीय चित्रपटसृष्टीतील एक महत्त्वाचा चित्रपट ठरला. तत्कालीन काळातील कलात्मकता आणि व्यवसाय यांचे योग्य मिश्रण असणारा हा पहिला चित्रपट होता. १९५४ च्या कान्स चित्रपट महोत्सवात आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकून हा चित्रपट यशस्वी ठरला. सलील चौधरी यांनी संगीत दिलेला हा पहिला हिंदी चित्रपटही होता. 'आजा री आ, निंदीया तू आ', 'धरती कहे पुकार के', 'हरियाला सावन ढोल बजाता आया' ''आणि' अजब तोरी दुनिया हो मेरे राजा' ही या चित्रपटातील गाणी हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिजात गाणी मानली जातात. हृषिकेश मुखर्जी, बासू चॅटर्जी आणि गुलजार यांच्यासह सलील चौधरी या ग्रुपचे कॅप्टन बिमल रॉय यांच्या प्रदीर्घ नात्याची व कलात्मकतेची मुहूर्तमेढ या चित्रपटापासून सुरु झाली. दो बिघा जमीन नंतर त्यांनी 'परख' (१९६०), 'प्रेम पात्र' (१९६२), 'नौकरी' (१९७६), 'मीनू' (१९७७) आणि 'पिंजरे के पंछी' (१९६६) या चित्रपटांच्या कथा लिहून त्यांचे दिग्दर्शनही केले.

१९५६ मध्ये त्यांनी राज कपूर यांच्या 'जगते रहो' या चित्रपटाला संगीत दिले, हिंदी चित्रपटांमध्ये आतापर्यंत चित्रित झालेली सर्वोत्तम भांगडा गाणी आहेत. मनोहर दीपक, मौजी सिंग आणि कर्तार सिंग यांनी उत्कृष्ट अभिनय केलेले 'मैं कोई झूट बोलेया, कोई ना' या गाण्याचा सलिल चौधरी यांनी संगीत दिले आहे आणि प्रेम धवन यांनी त्याचे उत्कृष्ट लेखन केले आहे. 'जागो मोहन प्यारे'या चित्रपटातील इतर गाणी आणि मोतीलाल यांच्यावर चित्रित केलेल्या शैलेंद्र यांच्या 'जिंदगी ख्वाब है, ख्वाब में झूठ क्या और भला सच है क्या' या गाण्यांनी जागते रहो मधील संदेशाला प्रभावशाली केले.

१९५८ मध्ये त्यांनी 'मधुमति' या चित्रपटासाठी संगीतात वेगळा प्रयोग करत हिंदी चित्रपटसृष्टीच्या रसिकांना मंत्रमुग्ध केले. या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शकाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. 'दिल तडप तडप के कह रहा', 'सुहाना सफर और ये मौसम', 'चढ्ढ गयो पापी बिच्छू', 'घडी घडी मेरा दिल धडके', 'टूटे हुए ख्वाबों ने 'आणि' जुलमी संग आँख लडी रे' ही गाणी आजही संस्मरणीय आहेत. १९५७ मध्ये हृषिकेश मुखर्जी यांनी 'मुसाफिर ''या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनात पदार्पण केले. यात दिलीप कुमार यांनी लता मंगेशकर यांच्यासोबत गायलेले 'लागी नहीं छुटे राम, चाहे जिया जाये' हे युगलगीत आहे. सलील चौधरी यांच्या गाजलेल्या महत्त्वाच्या चित्रपटांपैकी एक म्हणजे १९६१ मध्ये आलेला बिमल रॉय निर्मित 'काबुलीवाला', यात हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट देशभक्तीपर गाणे 'ऐ मेरे प्यारे वतन' सलीलजींनी संगीतबध्द केले आहे.

या काळातील त्यांच्या इतर काही उल्लेखनीय चित्रपटांमध्ये बिराज बहू (१९५४) नौकरी (१९५४) अमानत (१९५५) परिवार (१९५६) अपराधी कौन (१९५७) हीरा मोती (१९५९) परख (१९६०) उसने कहा था (१९६०) छाया (१९६१) माया (१९६१) मेम दीदी (१९६१) हाफ तिकीट (१९६२) झूला (१९६२) प्रेम पात्र (१९६२) चांद और सूरज (१९६५) पूनम की रात (१९६५) आणि पिंजरे की पंछी (१९६६) यांचा समावेश आहे. या चित्रपटातील त्यांच्या प्रसिद्ध गाण्यांमध्ये 'झूम झूम मनमोहन रे', 'छोटा सा घर होगा', 'मजबूर-ए-मोहब्बत ने फिर हमको पुकार है', 'चले ठुमक ठुमक तारे', 'मुन्ना बडा प्यारा अम्मी का दुलारा', 'जा रे, जा रे उड़े जा रे पंछी', 'इतने बड़े जहाँ में', 'मेरे ख्वाबों में ख्यालों में', 'ओ सजना बरखा बहार आई', 'आह रिम झिम के ये प्यारे प्यारे', 'चलते ही जन हो जहान तक', 'आंसू समाज के क्यों मुझे', 'आंखों में मस्ती शरब की', 'इतना ना मुझसे तू प्यार बढ़ा', 'गंगा आए कहां से', 'ओ सबा कहना मेरे दिलदार को', 'तसवीर तेरी दिल में', 'चांद रात तुम हो साथ', 'आंखों से काजल की ले कर श्याही', 'आके सीधी लगी दिल पे जैसे कटारिया', 'दो अंखियां झुकी झुकी सी', आणि 'ये मेरे इधर उजाले ना होते' ही सदाबहार गाणी होती.

१९६४ मध्ये, सलील चौधरी यांनी राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'चेम्मीन' या चित्रपटाद्वारे मल्याळम चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटात 'कडलिनाक्करे पोनोर', 'मानसामैने वरु', 'पेन्नाले पेन्नाले' आणि 'पुथान वलक्करे' ही लोकप्रिय गाणी होती. मल्याळम चित्रपटरसिकांनी या गाण्यांचे खुल्या मनाने स्वागत केले. आजही सलील दा मल्याळम चित्रपटसृष्टीतील सर्वात आवडत्या संगीत दिग्दर्शकांपैकी एक मानले जातात. मल्याळममधील त्यांच्या उल्लेखनीय चित्रपटांमध्ये एझुराथ्रीकल (१९६८), अभयम (१९७०), स्वप्नम (१९७३), नेल्लू (१९७४), नीलपोन्मन (१९७५), थुलवर्षम (१९७६), मदनोलसवम (१९७८), प्रतीक्षा (१९७९), पुथिया वेलिचम (१९७९), अँथिविलीले पोन्नू (१९८२), थुंबोली कडप्पुरम (१९९४) या चित्रपटांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. १९७१ मध्ये आलेला हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'आनंद' हा हिंदी चित्रपट इतिहासातील सर्वात संस्मरणीय चित्रपट. या चित्रपटाला सलिलदा यांनी संगीत दिले होते. राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन यांच्या अभिनयाने सजलेल्या या चित्रपटात जीवनाचे क्षणभंगूरत्व आणि मृत्यूचे शाश्वत रुप मांडणाऱ्या 'कहीं दूर जब', 'मैंने तेरे लिए', 'जिंदगी कैसी है पहेली', 'ना जिया लगे ना' आणि 'मौत तू एक कविता है' या गाण्यांनी या चित्रपटाचा संदेश प्रभावशाली करण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. पार्श्वसंगीतासह कॅम्पलिंग कथात्मक रचना करण्याच्या क्षमतेसाठीही सलिल दा ओळखले जातात. चित्रपटाच्या कथेइतकेच महत्त्वाचे पार्श्वसंगीत देत त्यांनी अनेक गाजलेल्या चित्रपटांसाठी संस्मरणीय संगीत दिले आहे.

बी. आर. चोप्रा यांचा गाणेरहित चित्रपट 'कानून' (१९६०), 'अनोखी रात' (१९६८), 'इत्तेफाक' (१९६९), 'सारा आकाश' (१९६९), 'अचानक' (१९७३), 'मौसम' (१९७५), 'नौकरी' (१९७८), 'काला पत्थर' (१९७९), 'चेहरे पे चेहरा' (१९८१) आणि 'कमला की मौत' (१९८९) या चित्रपटांना त्यांनी अविस्मरणीय पार्श्वसंगीत दिले होते. १९७० आणि ८० च्या दशकातील त्यांच्या चित्रपटांमध्ये मेरे अपने (१९७१), अन्नदाता (१९७२), अनोखा मिलन (१९७२), सबसे बडा सुख (१९७२), रजनीगंधा (१९७४), छोटी सी बात (१९७५), जीवन ज्योती (१९७६), मृगया (१९७६), उडन छू (१९७९), आनंद महल (१९७७), चेहरे पे चेहरा (१९७५), अग्नि परीक्षा (१९८१), जेवर (१९८६), कमला की मौत (१९८९) आणि स्वामी विवेकानंद (१९९४) या चित्रपटांचा समावेश आहे. स्वामी विवेकानंद हा त्यांचा शेवटचा हिंदी चित्रपट होता.

या काळातील त्यांच्या चित्रपटांमधील 'हाल चाल ठीक ठाक है', 'कोई होता जिसको अपना', 'रोज अकेली आये रोज अकेली जाये', 'नैन हमारे सांझ सारे', 'ओ मेरी प्राण साजनी चंपावती आजा', 'कई बार यू भी देखा है', 'रजनीगंधा फूल तुम्हारे', 'जानेमन जानेमन तेरे दो नयन', 'ना जाने क्यू होता है ये', 'दुनिया रंग बदली जाये', 'सपना देखो मेरे खोए खोए नैना', 'मिल गई अचानक मुझे हर खुशी' यासह अनेक गाणी आजही संस्मरणीय व श्रवणीय आहेत.त्यांच्या संगीतरचनांमध्ये, अनेकदा भारतीय शास्त्रीय रागांवर आधारित लोकगीते आणि धून वापरण्यासह यासाठी पाश्चात्य वाद्यवृंदाचा प्रभावशाली वापर करणेच त्यांना इतर संगीत दिग्दर्शकांपेक्षा वेगळा ठरवतो. त्यांनी अनेक वाद्यांच्या आवाजांची ओळख सिनेरसिकांना करून दिली, गाण्यात प्रत्येक वाद्याने केवळ सुरांचे अनुसरण करण्याऐवजी स्वतःचीएकअद्वितीयभूमिकाबजावण्याची कामगिरी त्यांच्या संगीत दिग्दर्शनात होती. ओब्लिगटो, काउंटरपॉईंट आणि हार्मनी यांचा परिचयही त्यांनी भारतीय चित्रपटसंगीताला करुन दिला.

सलील चौधरी यांनी १९५८ मध्ये बॉम्बे युथ कॉयरची स्थापना केली होती. भारतातील या पहिल्या धर्मनिरपेक्ष गायकवृंदात त्यांनी संगीतकार आणि संचालक म्हणून काम केले. त्यांच्या कार्याने भारतभरातील अनेक धर्मनिरपेक्ष गायकवृंदांच्या निर्मितीला प्रेरणा दिली. भारतीय लोकसंगीत आणि समकालीन संगीताशी स्वरसंयोजनांचे मिश्रण असलेल्या एका नवीन संगीत शैलीची ओळख करून दिली.वैयक्तिक आयुष्यात १९५२ मध्ये सलिल दा यांनी चित्रकार ज्योती चौधरी यांच्याशी विवाह केला होता. त्यांना अलोका, तुलिका आणि लिपिका चौधरी या तीन मुली होत्या. त्यानंतर त्यांनी गायिका सबिता बॅनर्जी यांच्याशीही लग्न केले आणि त्यांना सुकांता आणि संजॉय हे दोन मुलं आणि अंतरा व संचारी या दोन मुली होत्या. १९७० च्या दशकात सलील चौधरी यांनी कलकत्त्याला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. तिथे त्यांनी 'साउंड ऑन साउंड' या ध्वनिमुद्रण स्टुडिओसह संगीत संशोधन केंद्राची स्थापना केली. सलील चौधरी यांनी आपली संस्मरणीय गाणी व सूर मागे ठेवत ५ सप्टेंबर १९९५ या इहलोकाचा निरोप घेतला. ●●




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील. विद्यार्थ्यांना सुयश प्राप्त होईल.
- **वृषभ** : उपजत कला–गुणांना संधी लाभतील. गैरसमजांपासून दूर रहावं. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.
- **मिथुन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. नोकरीत कामाचा ताण वाढेल. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कर्क** : भावंडांचं उत्तम सहकार्य राहील. कार्यक्षेत्रात नव्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **सिंह** : महत्त्वाची कामं विलंबानं होतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. चोरी अथवा नुकसान संभवतं.
- **कन्या** : प्रलंबित कामं मनासारखी होतील. महत्त्वाचे करार तुर्तास नको. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल.
- **तूळ** : उगाच चिंता करू नका. ग्रहमानाची अनुकूलता लाभणार आहे. आवडीच्या क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृश्चिक** : दिलासादायक घटना घडतील. आर्थिक प्रश्नातून मार्ग निघेल. कलाकारांचा उत्साह वाढता राहील.
- **धनु** : महत्त्वाची कामं हातावेगळी होतील. व्यवसायात नव्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **मकर** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. व्यवसायात उलाढाल वाढेल. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : मनात निराशा दाटून येईल. नको त्या विचारांनी चिंता वाढीस लागेल. कुलदेवतेची उपासना करावी.
- **मीन** : प्रियजनांच्या भेटीगाठी होतील. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. नव्या ओळखी कामी येतील.

## सुगरणीचा सल्ला

### गव्हाचा टेस्टी हलवा

**साहित्य:** अर्धी वाटी गहू (भिजवलेले), पाऊण वाटी तूप, एक वाटी साखर, पाव वाटी काजूचे काप, वेलदोड्यांची पूड ईत्यादी.

**कृती:** गहू स्वच्छ निवडून बारा तास भिजवावेत. त्यानंतर अतिरिक्त पाणी काढून हे भिजलेले गहू मिक्सरमध्ये वाटून घ्यावेत. वाटताना अर्धी वाटी पाणी घालावं. तयार होणारं द्रावण चाळणीतून गाळून घ्यावं. यामुळे शिल्लक फायबर आणि दूध वेगळं होण्यास मदत होईल. कढई गॅसवर ठेवून गरम करावी. यात एक चमचा तूप टाकावं. त्यात काजूचे काप टाकून मध्यम आचेवर परतावेत. परतून झाल्यावर बाजूला काढून ठेवावेत. त्यानंतर कढईत एक चमचा तूप टाकावं. त्यात साखर आणि पाणी टाकून पाक करून घ्यावा. पाक चांगला तयार झाल्यानंतर त्यात हळूहळू गव्हाचं दूध सोडावं. त्यानंतर चमचाभर तूप वरून घालावं. कढईतलं मिश्रण सतत हलवत रहावं. थोड्या वेळाने हलव्याला तूप सुटू लागेल. आता त्यात काजूचे काप आणि वेलदोड्याची पावडर टाकावी. त्यानंतर मिश्रण एकजीव करून घ्यावं. हा हलवा थंड करून काप केल्यास बर्फीही करता येऊ शकते.

## दिनविशेष

### १३ सप्टेंबर

- **१९२९** : लाहोर कटातील आरोपी जतींद्रनाथ दास यांचा तुरुंगातील जुलमाचा निषेध म्हणून केलेल्या उपोषणात त्रेसष्ठाव्या दिवशी मृत्यू.
- **१९९९** : मॉस्कोमध्ये बॉंबस्फोट. ११९ ठार.
- **२००३** : ज्येष्ठ गायक पं. दिनकर कैकिणी यांना तानसेन पुरस्कार तर मेंडोलिनवादक यू. श्रीनिवास यांना कुमार गंधर्व राष्ट्रीय पुरस्कार जाहीर.
- **२०१७** : कुलभूषण जाधव प्रकरणात भारत सरकारने आंतरराष्ट्रीय न्यायालयात लेखी स्वरुपात बाजू मांडली.

## सफर देशांची

### बर्फाच्छादित आईसलॅंड

आईसलॅंड हा युरोप खंडातला अगदी छोटा देश आहे. हा देश युरोपचं पश्चिमेचं टोक आहे. आईसलॅंड हे एक बेट आहे. रेकजाविक ही आईसलॅंडची राजधानी. आईसलॅंडच्या ११ टक्के भागात हिमनग आहेत. हा देश ज्वालामुखीवर वसला आहे. २०१० मध्ये इथे एका ज्वालामुखीचा उद्रेक होताच संपूर्ण युरोपमधल्या हवाई वाहतुकीवर परिणाम झाला होता. ग्रीनलॅंड समुद्र आणि उत्तर अटलांटिक महासागर यांच्या मध्ये आईसलॅंड आहे. सुरूवातीच्या काळात आईसलॅंडमध्ये फक्त कोल्हे होते. बाहेरून आलेल्या लोकांनी पाळीव प्राणी आणि रेनडिअर आणले. इथली जंगलं संरक्षित आहेत तसंच प्राण्यांचंही रक्षण केलं जातं. आईसलॅंडमध्ये चार राष्ट्रीय उद्यानं आहेत तर ८० पेक्षा जास्त निसर्ग उद्यानं आहेत. आईसलॅंडमध्ये पाहण्यासारखं बरंच काही आहे. इथे गरम पाण्याचे नैसर्गिक झरे आहेत. हिमनगांमुळे तयार झालेले गार पाण्याचे धबधबे आहेत. इथल्या समुद्रात व्हेल मासे पाहता येतात. या देशातल्या मुलांना मोफत शिक्षण दिलं जातं. डॅनिश आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषा इथे शिकवल्या जातात.

## पंचांग

**शनिवार, १३ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, भाद्रपद कृ. ६/७, नक्षत्र : कृत्तिका
चंद्रराशी : वृषभ, योग : हर्षण,
सूर्योदय : ६.२८, सूर्यास्त : ६.४१

## फॉरवर्डस

**बातों पे भरोसा क़रते थें पहलें...**

**हक़ीक़तों पे अब शक़ होनें लगा हैं...!**

## आरोग्यमंत्र

### सांध्यांची कुरकुर

वयोवृद्ध माणसांना जिना चढणं, उतरणं ,खाली मांडी घालून बसणं व उठणं , गुडघे दुखत असल्याने अनेकदा नको वाटतं. शरीरात असंख्य सांधे आहेत. पण मुख्य भार पडतो तो गुडघ्यांवरच. वयोपरत्वे सांधे कुरकुरु लागतात आणि दुखतात. सांधा म्हणजे दोन हाडं एकत्र येऊन हालचाल होते ती जागा. तिथं दोन्ही हाडांच्या टोकांना कुर्चा नावाच्या मऊ श्लेष्मल पदार्थाने झाकलेलं असतं. या कुर्चा जिथं संपतात तिथून हाडाचा प्रत्यक्ष भाग स्नायूंनी झाकला जातो. दोन्ही हाडांच्या कुर्च्यांनी बनलेला हालचाल करणारा जोड एका आवरणानं संपूर्ण झाकला जातो. या आवरणाच्या आत एक मऊ वंगण सतत स्रवत असतं. त्यामुळे कोणतीही हालचाल करताना सांधा कुरकुरत नाही. वयानुसार अन्य काही कारणाने कुर्चा झिजतात. कुर्चांची झीज झाल्यामुळं ज्या सहजपणं सांध्याची हालचाल व्हायला पाहिजे ती होईनाशी होते. हाडांच्या टोकांशी घर्षण होऊन सूज धरू लागते. या सुजेमुळे व घर्षणामुळे सांधेदुखी सुरू होते. काही आजारात सांध्यातील वंगण कमी होतं. परंतु न वापरला गेल्यानेच सांधा निकामी होत जातो हेही प्रयोगाने सिद्ध झालेले आहे. ज्यांनी आयुष्यभर नियमित हालचाल आणि व्यायाम केला आहे. सर्व सांध्यांचा वापर होईल अशी काळजी घेतली आहे त्यांचे साधे क्वचितच त्रास देतात. शरीरात सांधे आहेत म्हणूनच हालचाल शक्य आहे. ते शक्यतो पूर्ण निरोगी रहावेत, याची निगा राखणं त्यासाठीच आवश्यक आहे.



## फॅशन पॅशन

✻ रॉम्पर्स हा प्रकार मुलांसाठी नाही हे लक्षात ठेवा. रॉम्पर्स घालून तुम्ही अजिबात चांगले दिसणार नाही. तेव्हा कधीही हा ट्रेंड फॉलो करू नका.

✻ घराबाहेर पडल्यावर गॉगल घालायचे असतात. खोलीत किंवा घरात गॉगल घालून फिरण्याला काहीच अर्थ नसतो. डोळे आले असतील तरच घरात गॉगल घालून फिरा. तुम्ही बप्पी लहिरी नाही हे लक्षात ठेवा. उन्हाव्यतिरिक्त इतर ठिकाणी गॉगल घालून फिरल्याने तुम्हाला कूल लूक मिळणार नाही. उलट तुमच्याकडे विचित्र नजरेने पाहिलं जाईल. त्यामुळे ही स्टाईल अजिबात फॉलो करू नका.

## करिअरवाटा

### हमखास मिळेल यश

स्पर्धा परीक्षांची तयारी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला प्रचंड तणावाचा काळ असतो. त्यामुळे या काळातील तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी काही पथ्यं पाळली पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्यावर फार मोठा तणाव नाही हे मनाला समजावलं पाहिजे. काही विद्यार्थ्यांना गरज नसताना तणाव ओढवून घेण्याची सवय असते. मात्र आता कारकिर्दीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे थोडे कमी–जास्त मार्क मिळाले म्हणून सगळं गमावलं असं होत नाही. अर्थात तयारी मनापासून करायला हवी. पण फार तणावाखाली राहण्याची आवश्यकता नाही. बऱ्याच वेळा अशा परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना मित्रमैत्रिणींच्या अभ्यासाशी आपल्या अभ्यासाची तुलना करण्याची सवय असते. तेव्हा अशी तुलना न करता आपण आपल्या पध्दतीने अभ्यास केला पाहिजे. आपण तणावमुक्त मनस्थितीत अभ्यास करू तेवढा तो चांगला होतो. तेव्हा विनाकारण ओढवून घेतलेला तणाव सोडून दिला पाहिजे आणि तणावमुक्त अवस्थेत तसंच ताज्यातवान्या मनाने अभ्यास केला पाहिजे. तसं झाल्यास कोणत्याही परीक्षेत यश मिळवणं शक्य होईल.



## खेचाखेची

### बाहुबली

लग्नाआधी छान, सुंदर, नाजूक असलेली बाहुली...
.
.
.
.
लग्नानंतर हळूहळू बाहुबली कधी होते ते लक्षातच येत नाही.

**– थोर विचारवंत**

## वेगळं काही

जपानमधल्या ‘हेन ना’ या रेस्तराँमध्ये ग्राहकांच्या स्वागताला डायनासोअर उभा असतो. जपानची राजधानी टोकियोमध्ये हे हॉटेल आहे. हा डायनासोर म्हणजे एक रोबो असून त्याला सेंसर बसवण्यात आले आहेत. हॉटेलमध्ये येणारे पाहुणे रिसेप्शनवर पोहोचल्यावर हे सेंसर कार्यरत होतात आणि कोणीतरी आल्याची सूचना डायनासोरना मिळते. यानंतर डायनासोर आपलं काम करू लागतात. हे रोबो तीन ते चार भाषांमध्ये ग्राहकांशी संपर्क साधतात. जपानीसह, चीनी, कोरियन, इंग्रजी या भाषांसह इतर काही भाषाही या डायनासोरना येतात. या हॉटेल्या खोल्यांमध्येही मिनी रोबोही आहेत. हे रोबो टीव्हीचं चॅनेल बदलण्यापासून ग्राहकांची इतर कामं करतात.

## स्मार्ट शॉपिंग

### फर्निचरची ऑनलाईन खरेदी

फर्निचर घ्यायचं ठरलं असेल आणि त्यातही ऑनलाईन शॉपिंग करणार असाल तर काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्या.

✻ सोफा किंवा बेड घ्यायचा असेल आणि शॉपिंग साईटवरची वस्तू आवडली असेल तर सर्वात आधी घरातल्या जागेचं मोजमाप करा. फर्निचर वेगवेगळ्या आकारामध्ये उपलब्ध असतं. त्यामुळे आधी आकाराबद्दलची माहिती नीट वाचून घ्या. ते फर्निचर तुमच्या घरात नीट बसायला हवं. ऑनलाईन खरेदी करायचं निश्चित झाल्यावर नियम आणि अटी जाणून घ्या. ✻ फर्निचरची निवड केल्यानंतर त्याबद्दलची माहिती नीट वाचून घ्या. संबंधित उत्पादनाचा रंग, मटेरियल, मेटेंनन्स याबद्दलची सगळी माहिती वाचून घ्यायला हवी. ✻ वजनदार फर्निचर ग्राहकाच्या घरापर्यंत पोहोचवण्यासाठी येणारा खर्च दुकानदार ग्राहकांकडूनच वसूल करतात. हा खर्च किती आहे याची माहिती करून घ्या. दुकानदार अव्वाच्या सव्वा शुल्क आकारात असतील तर खरेदीबाबत विचार करा. ✻ रिटर्न पॉलिसी जाणून घ्या.



## सुडोकू ३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ७ | | | १ | | ४ | ६ |
| | | ४ | ७ | | | | | |
| ९ | | | | | ३ | १ | ८ | |
| २ | | ६ | | ९ | ७ | | | ३ |
| | | | | १ | | | | |
| ५ | | | ६ | ३ | | २ | | १ |
| | ९ | २ | ३ | | | | | ५ |
| | | | | | ८ | ७ | | |
| ३ | ५ | | १ | | | ६ | २ | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | २ | ४ | ६ | ८ | ९ | ५ | ७ |
| ८ | ९ | ६ | ३ | ७ | ५ | १ | ४ | २ |
| ५ | ७ | ४ | १ | ९ | २ | ८ | ३ | ६ |
| २ | १ | ८ | ६ | ३ | ७ | ४ | ९ | ५ |
| ९ | ५ | ३ | ८ | २ | ४ | ७ | ६ | १ |
| ६ | ४ | ७ | ५ | १ | ९ | ३ | २ | ८ |
| ३ | २ | १ | ९ | ८ | ६ | ५ | ७ | ४ |
| ४ | ६ | ९ | ७ | ५ | १ | २ | ८ | ३ |
| ७ | ८ | ५ | २ | ४ | ३ | ६ | १ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ३



**आडवे शब्द :–**
१) पळून गेलेला
४) माणशी प्रमाण
८) पहिला ऋतू
११) ही पृथ्वी जणू आई आहे या अर्थाचा शब्द
१२) नाक
१५) अंत:करण
१६) बेदाणा
१८) लक्ष्मीचे एक नाव
१९) भाऊबीजेची तिथी
२१) कुलूप अडकविण्याचे जोडसाधन
२५) सदन
२७) त्या प्रमाणे
२८) कितीही उगाळला तरी काळा तो काळाच असणारे खनिज
२९) धमनी
३०) मातृभाषा
३२) माणूसकी
३४) मार्ग,रस्ता
३६) मध्यस्थ
३७) च्या सह
३९) हालचालीवर ठेवलेली नजर
४०) कर,टॅक्स देणारा
४३) गाणे
४५) धस,आचळ
४६) जास्तीतजास्त
४८) रमापती
४९) सोने
५२) समुद्र
५४) थापा मारणारा
५७) मनाची घालमेल,तडफड
५९) प्रतिष्ठा
६१) यम,जमाना
६२) संपूर्ण
६३) वितुष्ठ,बेबेनाव
६७) दिवस
६८) गुणांची कदर करणारा
७१) संधी
७२) च्या पुढे
७४) दोस्त
७५) विशेष
७६) वस्ती
७७) च्या करिता
७९) खोडण्याचे साधन
८०) युक्ती
८१) लिंबाच्या रसाचे पेय
८२) गाडीचे छत
८३) रात्रीचा पाऊस

**उभे शब्द:–**
१) उच्च,श्रेष्ठ
२) कपाळावर गंध लावण्याची काडी
३) दरवाजा
४) एक श्वासरोग
५) उपवासाचा कंद
६) देव
७) अवयव,गात्र
९) मान्यता,अनुमती
१०) मुलगी
१३) संतोष,आनंद
१४) मृत्युदाता
१७) हानी
२०) दुसरा
२२) विळा
२३) त्वरेने,हातोहात
२४) छोटी विश्रांती
२६) चर्चा
२७) तमाशातील कलाकार
३०) नशा आणणारा,कैफी
३१) डोंगर खोडून काढलेला रस्ता
३३) रंग
३५) डाक
३७) रस्ता
३८) रायगडाचा एक कडा
४१) धपाटा
४२) कलाक
४४) लोकनाट्य
४५) आठवण
४७) द्रव्य,पैसा
५०) कहाणी
५१) हेळसांड
५२) सुसर
५३) खूप (ग्रा.)
५५) कंबर
५६) अफूचे बीज
५७) समशेर
५८) घट्ट मारलेला विळखा
६०) एक पवित्र नदी
६४) फक्त,केवळ
६५) संथ,हळू
६६) आयातकर
६८) व्यायाम
६९) पाणी उकळताना होणारा आवाज
७०) आश्चर्य
७१) प्रेम (हिं.)
७३) एक पांढरे सुगंधी फूल
७७) सप्त
७८) वजन

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# क्रिकेटप्रेमींचा बॉयकॉट

## ■ भारत-पाकिस्तान सामना ■ सामन्याची तिकीट फुकटात वाटली

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|

**आशिया कपमधील सर्वात हायव्होल्टेज ड्रामा १४ सप्टेंबरला खेळविला जाणार आहे. पहलगामचा क्रूर दहशतवादी हल्ला आणि भारताने राबविलेले ऑपरेशन सिंदूर यानंतर भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी एकमेकांसमोर पहिल्यांदाच उभे ठाकणार आहेत. अशातच या सामन्याची तिकिटे काळ्या बाजारातही मिळेनासी व्हायला हवी होती, परंतू या सामन्याची तिकिटेच खपत नाहीत. भारत आणि पाकिस्तान सामन्यावर पहिल्यांदाच अशी वेळ आली आहे. ११ सप्टेंबरच्या सायंकाळपर्यंत या सामन्याची ५० टक्क्यांहून अधिक तिकिटे उपलब्ध होती.**




क्रिकेट रसीक तिकीटेच खरेदी करत नाहीत. दुबईच्या इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडिअमवर हा सामना होत आहे. याच स्टेडिअमवर झालेल्या २०२३ च्या चॅम्पिअन्स ट्रॉफी सामन्याची तिकीटे अवघ्या ४ मिनिटांत संपली होती. या सामन्याच्या उपलब्ध असलेल्या तिकिटांमध्ये सुरुवातीची किंमत ९९ अमेरिकन डॉलर ते प्रीमियम सीट्सची किंमत ४,५३४ अमेरिकन डॉलर सर्वच प्रकारातील तिकीटे रिक्त आहेत. महत्वाचे म्हणजे २९ ऑगस्टला या तिकिटांच्या विक्रीला सुरुवात झाली आहे. आज याला १५ दिवस झाले तरी देखील ५० टक्क्यांहून अधिक तिकिटे विकली गेलेली नाहीत. भारत पाकिस्तान सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी जोर धरत आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर काही भारतीय क्रिकेटरांसह अनेकांनी या सामन्यावर भारतीय संघाने बहिष्कार टाकावा अशी मागणी केली होती. यानंतर भारत सरकारने भारत-पाकिस्तान यांच्यात स्पर्धा होणार नाही परंतु आंतरराष्ट्रीय स्पर्धांत खेळू शकतील अशी स्पष्टोक्ती दिली होती. बीसीसीआयच्या पथ्थ्यावर पडणारा निर्णय घेण्यात आला होता. तरीही भारतीय क्रिकेटरसिकांना हे फारसे रुचलेले दिसत नाही.

दुबईतील एका व्यावसायिकाने आशिया कप स्पर्धेसाठी ७०० तिकिटं विकत घेतली आहे. अर्थात पॅकेज पॅटर्न असल्याने सात सामन्यांची तिकीटे आहेत. ही तिकिटे त्यांनी कर्मचाऱ्यांना फुकट दिली. डॅन्यूब ग्रुपचे उपाध्यक्ष अनीस साजन यांनी सांगितलं की, ब्लू-कॉलर कर्मचाऱ्यांमध्ये ही तिकिटे वाटली जात आहेत. त्यामुळे या कर्माचाऱ्यांना थेट मैदानात सामन्यांचा अनुभव घेता येणार आहे. पॅकेजमधील १०० तिकिटे ही भारत पाकिस्तान सामन्यांची आहेत.

# ज्वाला गुट्टाकडून ३० लीटर ब्रेस्ट मिल्क दान

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|

भारताची स्टार बॅडमिंटनपटू ज्वाला गुट्टाने एक उपक्रम सुरु केलाय. हा उपक्रम खरच कौतुकास्पद आहे. नुकतीच आई बनलेली ज्वाला गुट्टा दररोज ६०० मिलीलीटर दूध सरकारी रुग्णालयांमध्ये दान करत आहे. बॅडमिंटन कोर्टवर देशासाठी अनेक मेडल जिंकणारी ज्वाला आता लहान निरागस बाळांचे प्राण वाचवत आहे. ज्या नवजात बालकांना आई नाही, ज्वाला त्या बाळांच्या मदतीसाठी पुढे आली आहे. रिपोर्टसनुसार, तिने आतापार्यंत ३० लीटर ब्रेस्ट मिल्क दान केल आहे. मागच्या चार महिन्यांपासून ज्वाला गुट्ट दररोज निरागस बाळांसाठी बरच काही करत आहे.



ज्वाला गुट्टा नुकतीच आई बनलीय. २२ एप्रिल २०२१ रोजी तिचं लग्न अभिनेता विष्णू विनोदसोबत झालं. चार वर्षानंतर ती आई बनली. ज्वाला आपल्या मुलीला दूध पाजल्यानंतर सर्व दूध दान करते. भारतात पहिल्यांदा कुठल्यातरी एथलीटने असं पाऊल उचललं आहे. आईच्या दूधात बाळाच्या विकासासाठी सर्व पोषकतत्व असतात.यामुळे बाळांचा एलर्जी, अस्थमा आणि लठ्ठपणाचा धोका कमी होतो.

ज्वाला गुट्टाने आपल्या करिअरमध्ये बरच काही मिळवल आहे. तिने २०१० आणि २०१४ साली भारतासाठी कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकलं होतं. बॅडमिंटनच्या महिला दुहेरीत भारताची ओळख बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अश्विनी पोनप्पासोबत मिळून अनेक सामने जिंकले. पोनप्पा सोबत तिची जोडी टॉप १० रँकमध्ये होती. गुट्टाने श्रुति कुरियन सोबत मिळून अनेकदा नॅशनल चॅम्पियन बनण्याचा गौरव प्राप्त केला आहे.

# हाँगकाँग ओपन बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक-चिराग उपांत्य फेरीत

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी हाँगकाँग ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे, तर लक्ष्य सेनने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.भारतीय जोडीने तीन गेमच्या रोमांचक सामन्यात जुनैद आरिफ आणि रॉय किंग याप या मलेशियन जोडीचा पराभव केला.

पहिल्या गेममध्ये सात्विक-चिरागने मलेशियन जोडीचा २१-१४ असा सहज पराभव केला. पण दुसऱ्या गेममध्ये त्यांची थोडीशी चूक झाली आणि २०-२२ असा पराभव पत्करावा लागला, ज्यामुळे गुण १-१ असे झाले. त्यानंतर तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्ये भारतीय जोडीने शानदार पुनरागमन केले. त्यांनी २१-१६ असा विजय मिळवला आणि स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले. हा सामना एका तासापेक्षा जास्त काळ चालला. सुरुवातीपासूनच सात्विक-चिरागने सामन्यावर आपली पकड कायम ठेवली. आता उपांत्य फेरीत सात्विक-चिरागचा सामना चायनीज तैपेईच्या चेन चेंग कुआन आणि लिन बिंग-वेई यांच्याशी होईल. थाई जोडीला हरवून क्वार्टर फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले. गुरुवारी, सात्विक-चिराग यांनी थायलंडच्या पीरातचाई सुकफुन आणि पक्कापोन तीरत्सकुल यांना पराभूत करून क्वार्टर फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले होते. एक तास आणि तीन मिनिटे चाललेल्या सामन्यात एका गेमने पिछाडीवर राहिल्यानंतर त्यांनी १८-२१, २१-१५, २१-११ असा पराभव करून अंतिम ८ मध्ये प्रवेश केला.

भारतीय एकेरी खेळाडू आणि जागतिक क्रमवारीत २० व्या स्थानावर असलेला लक्ष्य सेननेही शानदार खेळ करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्याने त्याचाच देशबांधव एचएस प्रणॉय याचा असा पराभव केला.

राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा

# पुणे संघाची उस्मानाबादवर मात

**पुणे :** ५०व्या सब-ज्युनिअर गटाच्या राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात पुणे संघाने उस्मानाबादला हरवून आपली आगेकूच कायम राखली आहे. अन्य लढतीत मुलींच्या गटात ठाणे आणि मुलांच्या गटात सोलापुर, व कोल्हापुर या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले.

केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या बास्केटबॉल कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात पुणे संघाने उस्मानाबादवर ३८ गुणांनी सहज मात केली. मध्यतरांस त्यांनी आघाडी मिळवली होती. पुणे संघाकडून आरुषी आपटे, बिनत चुग यांनी चमक दाखवली. दुसऱ्या लढतीत शर्वरी व खुशीने केलेल्या जोरदार खेळाच्या जोरावर ठाणे संघाने चंद्रपूरवर २३ गुणांनी मात केली मध्यतरांस त्यांनी सतरा गुणांची आघाडी संपादली होती.

# बांगलादेशची विजयी सुरुवात

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

बांगलादेश क्रिकेट टीमने अफगाणिस्तान, टीम इंडियानंतर आशिया कप स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे. आशिया कप स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात बांगलादेशने हाँगकाँगवर ७ विकेट्सने मात केली. हाँगकाँगने बांगलादेशसमोर १४४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. बांगलादेशने हे आव्हान १४ बॉल आधी आणि ३ विकेट्स गमावून पूर्ण केलं. बांगलादेशने १७.४ ओव्हरमध्ये १४४ धावा केल्या आणि विजय मिळवला. बांगलादेशच्या या विजयात कॅप्टन लिटन दास याने प्रमुख भूमिका बजावली. लिटन दास याने सर्वाधिक ५९ धावा केल्या. तॉहिद हृदॉय याने लिटनला चांगली साथ दिली.




बांगलादेशची विजयी धावांचा पाठलाग करता ठिकठाक सुरुवात झाली. मात्र हाँगकाँगने बांगलादेशला ठराविक अंतराने २ झटके दिले. परवेझ इमोन १९ आणि तांझिज तमिम याने १४ धावा करुन मैदानाबाहेरचा रस्ता धरला. त्यामुळे बांगलादेशचा स्कोअर २ आऊट ४७ असा झाला. त्यानंतर दास आणि हृदॉय या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी करत बांगलादेशचा विजय निश्चित केला. हाँगकाँगने या भागीदारी दरम्यान जोडीला चांगलाच घाम फोडला. मात्र त्याचा फार परिणाम झाला नाही. बांगलादेश विजयाच्या उंबरठ्यावर असताना लिटन आणि तॉहिद ही जोडी हाँगकाँगने फोडली. लिटन आऊट झाला.

लिटन दास याने ३९ बॉलमध्ये १५१.२८ च्या स्ट्राईक रेटने ५९ रन्स केल्या. लिटनने या खेळीत १ सिक्स आणि ६ फोर लगावले. त्यानंतर तॉहिदने उर्वरित २ धावा करुन बांगलादेशला विजयी केलं. तॉहिदने ३६ बॉलमध्ये १ फोरसह नॉट आऊट ३५ रन्स केल्या. हाँगकाँगसाठी आतिक इक्बाल याने २ विकेट्स मिळवल्या. तर आयुष शुक्ला याने १ विकेट मिळवली. बांगलादेशने या विजयासह ११ वर्षांपूर्वीचा एक हिशोब बरोबर केला. बांगलादेश विरुद्ध हाँगकाँग या दोन्ही संघांची टी २० क्रिकेटमध्ये आमनेसामने येण्याची ही दुसरी वेळ होती.

# जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेला प्रतिसाद

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

क्रीडा व युवक संचालनालय, पुणे जिल्हा क्रीडा परिषद व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागधील नेहूली येथील जिल्हा क्रीडा संकुलमध्ये जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पाच दिवसीय क्रीडा स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



शालेय जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा १४, १७ व १९ वर्षाखालील मुला मुलींसाठी आहे. नऊ ते १४ सप्टेंबर या कालावधीत या स्पर्धा होणार आहेत. सुरुवातीला १९ वर्षाखालील मुलांची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले होते. त्यामध्ये खोपोली, लोधीवली व पनवेलमधील महाविद्यालयातील संघाने अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. मूलींच्या स्पर्धेत दोन संघाने सहभाग घेतला होता. त्यात उरणने प्रथम व पनवेल शाळा, महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षाखालील मुलींची फुटबॉल स्पर्धेत सहा संघाने सहभाग घेतला. त्यात उरणने प्रथम, तर पनवेलमधील संघाने द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. १४ वर्षाखालील मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत चार संघाने सहभाग घेतला. त्यात पनवेल संघाने प्रथम, मुरूडमधील संघाने द्वितीय व अलिबाग मधील संघाने तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवारी (दि.१३) व रविवारी (दि.१४) अशी दोन दिवस १४ वर्षाखालील मुलांची फुटबॉल स्पर्धा होणार असल्याची माहिती क्रीडा अधिकारी यांनी दिली.

नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलमध्ये जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत खेळताना दुखापत होणाऱ्या खेळाडूंवर तातडीने उपचार करण्यासाठी जिल्हा सामान्य विभागामार्फत आरोग्य यंत्रणा वैद्यकीय पथक उपलब्ध करण्यात आले आहेत.१०८ रुग्णवाहिकेसह एक डॉक्टर, अधिपरिचारक, कक्षसेवक, वाहन चालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# रजत पाटीदारचे खणखणीत शतक

**नवी दिल्ली :** दुलीप ट्रॉफी फायनलमध्ये दक्षिण विभागाचा डाव १४९ धावांवर गुंडाळल्यानंतर मध्य विभागाने सामन्यावरील पकड मजबूत केली आहे. कर्णधार रजत पाटीदारने ११२ चेंडूंत १२ चौकार व २ षटकारासह शतक झळकावले. मध्य विभागाचा कर्णधार असलेल्या रजतने दुलीप ट्रॉफीत सातत्याने धावा केल्या आहेत. त्याने मागील तीन डावांत ७७, १२५ व ६६ अशी खेळी केली आहे. भारतीय संघ पुढील महिन्यात घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरुद्ध दोन कसोटी सामने खेळणार आहे. त्यासाठीचा संघ लवकरच जाहीर केला जाईल आणि निवड समितीच्या सदस्यांनी दुलीप ट्रॉफीवरही लक्ष ठेवले आहे. त्यामुळे रजतची ही खेळी महत्त्वाची ठरत आहे.

# महिला वन डे विश्वचषकाचे अंपायर्स-रेफरी जाहीर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने महिला एकदिवसीय विश्वचषकासाठी १८ सामनाधिकारी नियुक्त केले आहेत. स्पर्धेच्या ५२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच सर्व सामनाधिकारी आणि पंच महिला असतील.




पंच लॉरेन एजेनबॅग, कॅंडेसला बोर्डे, किम कॉटन, सारा डंबनेवाना, शथिरा झाकीर जेसी, करिन क्लास्ते, ॲन जननी, निमाली परेरा, क्लेअर पोलोसेक, वृंदा राठी, स्यू रेडफर्न, एलॉइस शेरीडन, गायत्री वेणुगोपालन, जॅकलीन विल्यम्स, सामनाधिकारी ट्रुडी अँडरसन, शँड्रे फ्रिट्झ, जीएस लक्ष्मी, मिशेल परेरा यांचा समावेश आहे. पंचांच्या पॅनेलमध्ये तीन भारतीय माजी भारतीय खेळाडू वृंदा राठी, एन जनानी आणि गायत्री वेणुगोपालन यांचाही पंच पॅनेलमध्ये समावेश करण्यात आला आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू आणि पहिल्या महिला सामनाधिकारी जीएस लक्ष्मी या सामनाधिकारी पॅनेलचा भाग असतील. या पॅनेलमध्ये चार सदस्य आहेत.

आयसीसीचे अध्यक्ष जय शहा म्हणालेकी, सामना अधिकाऱ्यांच्या पॅनेलमध्ये सर्व महिला असणे हे महिला क्रिकेटमधील एक ऐतिहासिक पाऊल आहे.

## कर्जत तालुका क्रीडा महोत्सव | ९० शाळांमधील ११३० विद्यार्थ्यांचा सहभाग

# कबड्डी स्पर्धेत १५० शाळांचा सहभाग

| नेरळ | प्रतिनिधी|

कर्जत तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा सुरू असून मुलींच्या कबड्डी स्पर्धेत तब्बल ६० शाळांमधील मुली स्पर्धेत उतरल्या तर मुलांमध्ये तब्बल ९० शाळा स्पर्धेत उतरल्या होत्या. या कबड्डी स्पर्धेत तीन वयोगटात खेळविली गेली ९३० तर मुलींमध्ये ११३० मुली या विविध स्पर्धेत उतरल्या होत्या.

तालुका क्रीडा महोत्सवात मुलींची कबड्डी स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी आणि नेरळ जवळील ममदापूर येथील दिलकॅप इंटरनॅशनल स्कूलमध्ये कर्जत तालुकास्तर शालेय कबड्डी स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे, केंद्रप्रमुख मोहन पाटील, तालुका समन्वयक किशोर पाटील आणि समीर येरूनकर यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेला जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी भेट देऊन स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले. स्पर्धेचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका विजया भट्राजु आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शशांक दिवगी यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष दिलीप कपूर आणि अर्जुन कपूर यांनीदेखील भेट देऊन शुभेच्छा दिल्या.मुलांच्या गटातील स्पर्धेत सुमारे ९० शाळांमधील ११३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मुलींच्या स्पर्धेत ६० शाळांमधील जवळपास ९३० विद्यार्थिनींनी आपली ताकद आजमावली.



### स्पर्धेचे निकाल

मुली

**१४वर्षाखालील वयोगट**
प्रथम वीर हुतात्मा कोतवाल नगरपरिषद शाळा माथेरान
द्वितीय जिल्हा परिषद शाळा शेलू

**१७वर्षाखालील वयोगट**
प्रथमभाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसल
द्वितीयअभिनव ज्ञान मंदिर कर्जत

**१९ वर्षाखालील वयोगट**
प्रथम अभिनव ज्ञान मंदिर कर्जत
द्वितीय भाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसळ

मुले

**१४ वर्षाखालील वयोगट**
प्रथम माथेरान व्हॅली स्कूल वंजार पाडा
द्वितीयशारदा मंदिर इंग्लिश कर्जत

**१७ वर्षाखालील वयोगट**
प्रथम अभिनव ज्ञान मंदिर कर्जत
द्वितीय भाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसळ

**१९ वर्षाखालील वयोगट**
प्रथम नेरळ विद्या मंदिर नेरळ
द्वितीय भाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसळ

## निवडक

# तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा जांभूळपाडा येथे संपन्न



**पाली/गोमाशी :** :रायगड जिल्हा क्रीडा परिषद अलिबाग यांच्यावतीने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा सुरू झाल्या आहेत. सुधागड तालुक्यातील खो-खो स्पर्धा ता.१० व ११ सप्टेंबर रोजी आत्मोन्नती विद्यामंदिर जांभूळपाडा येथे खेळी मेळीच्या वातावरणात संपन्न झाली. तालुका स्तरीय खो खो स्पर्धेत १४ व १७ वर्ष वयोगट आत्मोन्नती जांभूळपाडा तर १९ वर्ष ग. बा. वडेर पाली या विद्यालयातील मुलांनी प्रथम पारितोषिकांची कमाई केली. १४ वर्ष वयोगट नांदगाव विद्यालय, १७ आणि १९ वर्ष वयोगट ग. बा. वडेर पाली येथील मुलींने प्रथम क्रमांकाला गवसणी घालून आपल्या विद्यालयाचे नाव तालुक्यात अव्वल ठेले.

# माजी क्रिकेटपटू हरभजनचे पूरग्रस्तांसाठी आवाहन

**मुंबई :** आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार आणि माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग यांनी पंजाबमधील पुराबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की पंजाबमधील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. लोक आणि सरकार मदत कार्यासाठी एकत्र काम करत आहेत, परंतु त्यासाठी वेळ लागेल. त्यांनी मुंबईत हे विधान केले.माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग म्हणाले- पाणी ओसरल्यावर खरे चित्र समोर येईल. त्यानंतरच शेतकरी आणि सामान्य लोकांचे किती नुकसान झाले आहे हे स्पष्ट होईल. ते म्हणाले की, हजारो हेक्टर शेतकऱ्यांची जमीन पाण्याखाली गेली आहे, ज्यावरील पिके पूर्णपणे नष्ट झाली आहेत. याशिवाय, पुराच्या पाण्यात अनेक लोकांची घरेही वाहून गेली आहेत. हरभजन म्हणाले की, मोठ्या प्रमाणात वाळू काढणे सोपे होणार नाही. सर्वात मोठे आव्हान ओळखून ते म्हणाले की, पाण्यासोबत शेतात आलेली प्रचंड वाळू काढून टाकणे सोपे होणार नाही. जर ही वाळू वेळेवर साफ केली नाही तर शेतकऱ्यांना पुढील पीक पेरणे कठीण होईल.

# आयुषचा जागतिक पदक विजेत्याला धक्का

**नवी दिल्ली :** भारताचा युवा खेळाडू आयुष शेट्टी याने हाँगकाँग ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेमध्ये रोमहर्षक विजयाची नोंद केली. आयुष याने पुरुषांच्या एकेरीमध्ये जागतिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या कोडाय नाराओका याला पराभूत करताना उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. कर्नाटकच्या २० वर्षीय आयुष शेट्टी याने पाचव्या मानांकित कोडाय नाराओका याचे कडवे आव्हान २१-१९, १२-२१, २१-१४ असे तीन गेममध्ये परतवून लावले. आयुष याने एक तास व १२ मिनिटांमध्ये प्रतिस्पर्धी खेळाडूला नमवण्याची किमया करून दाखवली. आता त्याच्यासमोर भारताच्याच लक्ष्य सेन याचे आव्हान असणार आहे. प्रकाश पदुकोण बॅडमिंटन अकादमीत हे दोघेही एकत्रितपणे प्रशिक्षण घेत आहेत. आयुष शेट्टी याने २०२३मधील ओडिशा मास्टर्स या स्पर्धेमध्ये अंतिम फेरीत प्रवेश केला होता. २०२३मधील बहरीन व २०२४मधील नेदरलँड्स या स्पर्धांमध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. आयुष याने गेल्या काही काळात टप्प्याटप्प्याने प्रगती केली आहे. हाँगकाँग ओपन या स्पर्धेतील त्याची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे.



# पाकिस्तानविरुद्ध अर्शदीप सिंगला खेळण्याची संधी फिक्स

**नवी दिल्ली :** गतविजेत्या टीम इंडियाने सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात यंदा टी २० आशिया कप २०२५ स्पर्धेत विजयी सुरुवात करत आपला दबदबा कायम ठेवला आहे. भारताने यूएईला त्यांच्याच घरात निच्चांकी धावसंख्येवर गुंडाळत पावरप्लेमध्येच विजय मिळवला. भारताने यूएईला ५७ रन्सवर ऑलआऊट केलं. त्यानंतर अभिषेक शर्मा याने केलेल्या ३० धावांच्या जोरावर भारताने ५८ हे आव्हान ४.३ ओव्हरमध्ये १ विकेट गमावून सहज पूर्ण केलं.भारताने पहिलाच सामना हा ९३ चेंडू आणि ९ विकेट्स राखून जिंकला. आता टीम इंडिया आशिया कप मोहिमेतील आपल्या दुसऱ्या सामन्यात पारंपरिक आणि कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तान विरुद्ध भिडणार आहे. उभयसंघातील हा सामना १४ सप्टेंबरला होणार आहे. या सामन्यासाठी टीम इंडिया प्लेइंग ईलेव्हनमध्ये १ बदल होणार असल्याची चर्चा आहे. धक्कादायक बाब म्हणजे यूएई विरुद्ध सर्वाधिक ४ विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजाला प्लेइंग ईलेव्हनमधून बाहेर केलं जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# बलवान पुनिया यांचे निधन

**नवी दिल्ली :** ऑलिपिक कांस्यपदक विजेता बजरंग पुनियाच्या वडिलांचे निधन झाले आहे. भारतीय कुस्तीपटूचे वडील बलवान सिंग पुनिया यांनी आज, गुरुवारी (दि. ११) संध्याकाळी ६:१५ वाजता अखेरचा श्वास घेतला. बजरंग पुनियाने त्याच्या एक्स अकाउंटवरून ही माहिती शेअर केली. बजरंग पुनियाने त्यांच्या वडिलांच्या निधनाबद्दल एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. भारतीय कुस्तीपटूने लिहिले आहे की त्यांनी आम्हाला खूप मेहनतीने येथे आणले होते. ते आमच्या संपूर्ण कुटुंबाचा कणा होते. त्यांच्याशिवाय आयुष्य कसे असेल हे मला समजत नाही. त्यांच्या पोस्टमध्ये बजरंग पुनियाने पुढे माहिती दिली की त्यांच्या वडिलांचे अंतिम संस्कार शुक्रवार, १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या वडिलोपार्जित गावी खुदान येथे होतील. बजरंग पुनियाचे वडील बलवान पुनिया हे स्वतःही एक कुस्तीगीर होते. त्यांनी त्यांच्या मुलाला लहानपणापासूनच कुस्ती शिकवली. वडिलांकडून शिकलेल्या कुस्तीने बजरंग पुनियाने जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)